CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | शनिवार, २८ फेब्रुवारी २०२६ । युगाब्द ५१२७ । वर्ष ४२ वे अंक ९३ । पाने १२ । किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



राष्ट्र म्हणजे अशा लोकांचा समूह जो 'एक लक्ष्य', 'एक आदर्श', 'एक ध्येय' यानुसार जगतो आणि भूमीच्या एका विशिष्ट भागाला आपली मातृभूमी मानतो. जर आदर्श किंवा मातृभूमी या दोन्हीपैकी एकही नसेल तर राष्ट्राचे कोणतेही अस्तित्व राहणार नाही.

**- पं. दीनदयाल उपाध्याय**
पूर्व अध्यक्ष, भारतीय जनसंघ

# केजरीवाल, सिसोदिया निर्दोष

**● मद्यघोटाळा प्रकरणी दिल्ली न्यायालयाचा निर्णय ● सीबीआयची उच्च न्यायालयात धाव**

**◆ नवी दिल्ली, २७ फेब्रुवारी**

मद्यधोरण प्रकरणातील कथित भ्रष्टाचार प्रकरणातून दिल्लीतील न्यायालयाने शुक्रवारी माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल, उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांच्यासह २१ जणांची निर्दोष मुक्तता केली. सीबीआयचे प्रकरण न्यायालयीन सुनावणीत टिकू शकले नाही आणि पूर्णपणे बदनाम झाले, असा संताप न्यायालयाने सीबीआयवर व्यक्त केला. या निर्णयाविरोधात सीबीआयने उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. निकाल जाहीर झाल्यावर केजरीवाल भावुक झाले होते.

या प्रकरणात क्लीन चिट मिळालेल्या २१ जणांमध्ये तेलंगणा जागृतीच्या अध्यक्ष के. कविता यांचा समावेश आहे. अगदी गंभीर संशय दूर, पण रेकॉर्डवर सादर केलेली सामुग्री कोणत्याही आरोपीविरुद्ध प्रथमदर्शनी खटला उघड करती नाही. त्यामुळे न्यायालयाला हा निर्णय देताना कोणताही संकोच नाही. त्यानुसार आरोपी क्रमांक १ ते २३ यांना या प्रकरणात त्यांच्यावर आरोप असलेल्या सर्व गुन्ह्यांमधून निर्दोष मुक्त करण्यात येत आहे, असे विशेष न्यायाधीश जितेंद्रसिंह यांनी स्पष्ट केले.

पूर्वीच्या आप सरकारच्या आता रद्द केलेल्या उत्पादन शुल्क धोरणाची निर्मिती आणि अंमलबजावणीत झालेल्या कथित भ्रष्टाचाराची चौकशी सीबीआयने केली. या प्रकरणाचा तपास पूर्वनिर्धारित मार्गावर चालला आहे, असे दिसते. यात धोरण तयार करणे किंवा अंमलबजावणीशी संबंधित जवळजवळ प्रत्येक व्यक्तीला यात गुंतविले आहे, असे न्यायालयाने म्हटले आहे. या नोंदींचे एकत्रित मूल्यांकन केल्यास, एका व्यापक आणि गुंतागुंतीच्या कटाची छाप निर्माण करण्यासाठी, कायदेशीररीत्या स्वीकार्य सामुग्री नसलेले वेगवेगळे तुकडे जोडण्याचा प्रयत्न केल्याने तपासाचा दृष्टिकोन उघडकीस येतो, असे सिंह यांनी निकालात म्हटले.

गोवा विधानसभा निवडणुकीशी हे आरोप जोडण्याचा प्रयत्न, गुन्ह्यातून मिळालेल्या कथित रकमेचा प्रकल्प, अशा प्रकारची बांधणी करणे आणि वापर करणे, कायदेशीरदृष्ट्या शाश्वत सामुग्रीपेक्षा अंदाज आणि गृहीतांवर अधिक अवलंबून आहे, असे न्यायाधीशांनी म्हटले. ◂(वृत्तसंस्था)



न्यायालयाच्या निर्णयानंतर अरविंद केजरीवाल यांनी रॅली काढली

> हा एक सर्वांत मोठा राजकीय कट होता. मी भ्रष्ट नाही. केजरीवाल आणि मनीष सिसोदिया प्रामाणिक असल्याचे न्यायालयाने म्हटले. सर्व आरोपींनी दोषमुक्त केले. सत्याचा विजय होतो, असे आम्ही नेहमीच म्हटले. भारतीय न्याय व्यवस्थेवर आम्हाला पूर्ण विश्वास आहे.
>
> **अरविंद केजरीवाल**
> दिल्लीचे माजी मुख्यमंत्री

> कनिष्ठ न्यायालयाने पुराव्याअभावी त्यांना निर्दोष सोडले. ही एक तांत्रिक समस्या आहे. पण, निराधार होते तर, सुरुवातीला आरोप कसे निश्चित करण्यात आले, याची विचारणा व्हायला पाहिजे. निकालाचा सखोल अभ्यास केल्यानंतर पक्ष सविस्तर प्रतिसाद देईल.
>
> **सुधांशू त्रिवेदी**
> भाजपाचे राष्ट्रीय प्रवक्ते

**अनेक मुद्यांकडे केले दुर्लक्ष : सीबीआय**

आम्ही अधोरेखित केलेल्या अनेक मुद्यांकडे विशेष न्यायालयाने आरोप निश्चित करताना दुर्लक्ष केले. त्यांचा विचारच केला नाही. आमच्या अनेक पैलूंचा विचारच न केल्याने सीबीआयने कनिष्ठ न्यायालयाच्या निकालाविरुद्ध तत्काळ उच्च न्यायालयात अपील दाखल केले आहे.

# समृद्ध मराठी पुढील पिढीपर्यंत पोहोचवू

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन**



### विधानभवनात मराठी भाषा गौरव दिन साजरा

**◆ मुंबई, २७ फेब्रुवारी**

जगात ज्या भाषा ज्ञानभाषा बनतात त्या पुढे प्रवाहित होतात. ज्या भाषेतून व्यवहार, शिक्षण आणि रोजगाराची संधी निर्माण होते, तीच भाषा समाजात प्रगतीचा भाव जागृत करते. त्यामुळे अभिजात मराठीला ज्ञानभाषेत रूपांतरित करून समृद्ध मराठी पुढील पिढीपर्यंत पोहोचवूया, असा निर्धार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.



मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आयोजित 'जावे विनोदाच्या गावा' या विशेष कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी राम शिंदे, राहुल नार्वेकर, एकनाथ शिंदे, सुनेत्रा अजित पवार, नीलम गोऱ्हे, चंद्रकांत पाटील, आशिष शेलार आदी उपस्थित होते.

छत्रपती शिवाजी महाराज यांनी प्रशासनात मराठीचा वापर रूजवताना भाषेचे शुद्धीकरण करण्यासाठी शब्दकोश तयार केला. फारशी व अरबी भाषेच्या प्रभावातून मराठीला स्वाभिमानाने उभे करण्याचे कार्य त्यांनी केले. मराठी भाषेचा अभिमान याच परंपरेतून पुढे आला असल्याचे मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. ◂(तभा वृत्तसेवा)

### मराठीला जागतिक व्यवहाराची भाषा बनवू



मराठी ही केवळ संस्कृतीची नव्हे तर अर्थकारण, रोजगार आणि जागतिक व्यवहाराचीही भाषा व्हावी, यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट केले. माझ्या रक्तात मराठी, माझ्या श्वासात मराठी, असे भावनिक उद्गार काढत उपमुख्यमंत्री शिंदे यांनी मराठी भाषा गौरव दिनी माय मराठीचा वारसा अधिक जोमाने पुढे नेण्याचा संकल्प व्यक्त केला.

### डिजिटल माध्यमांत मराठीचा वापर वाढवूया



तंत्रज्ञानाच्या युगात डिजिटल माध्यमांवर मराठीचा अधिकाधिक वापर करण्याची गरज अधोरेखित केली. लंडनमध्ये प्रस्तावित महाराष्ट्र भवनासाठी निधी उपलब्ध करून देण्यात आल्याचे सांगत त्यांनी मराठीच्या जागतिक प्रसारासाठी प्रयत्न सुरू असल्याचे नमूद केले. सार्वजनिक ग्रंथालयांना वाढीव अनुदान देण्यात आल्याची माहितीही उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी यावेळी दिली.

## महत्त्वाचे

### कोलंबिया निवडणुकीसाठी जिल्हाधिकारी आशीर्वाद आंतरराष्ट्रीय निरीक्षक

**सोलापूर :** कोलंबिया येथील निवडणुकीसाठी आंतरराष्ट्रीय निरीक्षक म्हणून सोलापूरचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांची निवड करण्यात आली. महाराष्ट्राचे मुख्य निवडणूक अधिकारी चोकलिंगम सेथुरामन यांच्या नेतृत्वाखालील



पाच सदस्यीय शिष्टमंडळ ६ ते १० मार्च दरम्यान कोलंबिया प्रजासत्ताकात अधिकृत दौऱ्यावर जाणार आहे. कोलंबिया येथे ८ मार्च रोजी होणाऱ्या काँग्रेस निवडणुकीसाठी भारताच्या निवडणूक आयोगाच्या उपक्रमांतर्गत ही नियुक्ती करण्यात आली. महाराष्ट्र राज्याला कोलंबियाशी विशेष संवाद व अनुभव विनिमयाची जबाबदारी देण्यात आली आहे. या शिष्टमंडळामध्ये सोलापूरचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्यासह संयुक्त मुख्य निवडणूक अधिकारी मनोहर पारकर, निवडणूक नोंदणी अधिकारी प्रीयेश महाजन, बुथ लेव्हल अधिकारी सागर शिर्के यांचाही समावेश आहे. भारतीय निवडणूक व्यवस्थेचा अनुभव जागतिक स्तरावर पोहोचविणे, तसेच कोलंबियातील निवडणूक प्रक्रियेचे निरीक्षण करून सर्वोत्तम पद्धतींचा अभ्यास करणे हे उद्दिष्ट आहे. या आंतरराष्ट्रीय मोहिमेसाठी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांची झालेली निवड सोलापूरच्या दृष्टीने अभिमानाची बाब आहे. यामुळे भारतीय निवडणूक व्यवस्थेतील पारदर्शकता व विश्वासार्हतेला जागतिक मान्यता मिळत आहे.

### इंग्लंडची न्यूझीलंडवर मात; पाकिस्तानच्या आशा कायम

**कोलंबो :** आयसीसी टी-२० विश्वचषकाच्या 'सुपर ८' फेरीतील ९ व्या सामन्यात इंग्लंडने न्यूझीलंडचा पराभव करत स्पर्धेत आपले वर्चस्व कायम राखले आहे. या विजयामुळे केवळ इंग्लंडचाच फायदा झाला नाही, तर स्पर्धेतून बाहेर पडण्याच्या उंबरठ्यावर असलेल्या पाकिस्तानसाठी देखील सेमीफायनलचे दरवाजे पुन्हा एकदा उघडले आहेत. १६० धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना इंग्लंडची सुरुवात खराब झाली होती, मात्र मधल्या फळीतील फलंदाजांनी संयमी खेळी करत सामना शेवटच्या षटकापर्यंत नेला आणि विजय खेचून आणला. पाकिस्तानला त्यांच्या शेवटच्या सुपर ८ सामन्यात श्रीलंकेचा मोठ्या फरकाने पराभव करावा लागेल.

# अफगाण-पाकमध्ये युद्धाचा भडका

**● दोन्ही देशांचे एकमेकांवर हल्ले ● शेकडो सैनिक ठार; चौक्यांवर ताबा**



तोखराम सीमेवर तैनात असलेले तालिबानी सैनिक

**◆ इस्लामाबाद, २७ फेब्रुवारी**

२२ फेब्रुवारीला पाकिस्तानी हवाई दलाने केलेल्या हल्ल्याचा सूड घेताना अफगाणिस्तानी सैन्याने शुक्रवारी पहाटे पाकिस्तानवर जोरदार हल्ले चढविले. या संघर्षाचे रुपांतर खुल्या युद्धात झाले असून दोन्ही बाजूंचे शेकडो सैनिक ठार तर कित्येक जखमी झाले आहेत. सीमेवर दोन्ही बाजूंनी गोळीबार, बॉम्बहल्ले केले जात असून पाकिस्तानी लष्कराचे ५५ पेक्षा अधिक सैनिक मारले गेले, तर १५ तालिबानी लष्कराच्या ताब्यात आहे. दुसरीकडे १३३ पेक्षा तालिबान्यांना मारल्याचा दावा पाकिस्तानने केला आहे.

आमच्या संयमाची सीमा संपली. आता खुले युद्ध सुरू झाल्याची अधिकृत घोषणा पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा आसिफ यांनी केली. अफगाणिस्तानच्या तालिबान सैन्याने शुक्रवारी पहाटे पाकिस्तानच्या सीमा चौक्यांवर हल्ला केला. यात त्यांनी पाकिस्तानच्या १५ हून अधिक सीमा चौक्यांवर ताबा मिळवला, तर ५५ पाकिस्तानी सैनिकांना ठार केले. अफगाणिस्तानच्या हल्ल्याला प्रत्युत्तर देण्यासाठी वायुदलाने हवाई हल्ले चढवले आणि लष्कराने सीमेवरील १९ चौक्यांवर ताबा मिळविल्याचा दावा आसिफ यांनी एक्सवरील पोस्टमधून केला. पाकिस्तानी वायुदलाने गजब लिल हक अंतर्गत अफगाणिस्तानमधील दहशतवादी तळांवर हल्ले केले असेही त्यांनी म्हटले आहे. अमेरिकेच्या शस्त्रांचा तालिबानी लष्कराकडून वापर केला जात आहे. दुसरीकडे तालिबान सरकारच्या प्रवक्त्याने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, पाकिस्तानच्या हल्ल्यात आठ सैनिक मारले गेले आणि ११ जखमी आहेत. ◂(वृत्तसंस्था)

### एफ-१६ विमान पाडल्याचा दावा

हवाई हल्ल्यासाठी अफगाणिस्तान सीमेत प्रवेश केलेल्या पाकिस्तानच्या एफ-१६ लढाऊ विमानाला पाडल्याचा दावा तालिबानी सरकारचे प्रवक्ते तबीहुल्लाह मुजाहीद यांनी केला. त्यांनी विमान पाडल्याची चित्रफीत जारी केली. मात्र पाकिस्तानने या दाव्यावर कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया दिलेली नाही.

### पाकिस्तानी नागरिकांकडून टीकेची झोड

अफगाणिस्तावर केलेल्या हल्ल्यानंतर पाकिस्तानी नागरिकांनी समाज माध्यमांवर पंतप्रधान शाहबाज आणि लष्करप्रमुख असीम मुनीरवर टीकेची झोड उठवली आहे. त्यांनी म्हटले की, रमजान महिन्यात अफगाणिस्तानवर हल्ला करणे लज्जास्पद आहे.

# शेअर बाजारांत मोठी घसरण

### निर्देशांक ९६१ अंकांनी कोसळला

**◆ मुंबई, २७ फेब्रुवारी**

आठवड्याच्या शेवटच्या सत्रात म्हणजेच शुक्रवारी शेअर बाजार मोठ्या घसरणीसह बंद झाला. निर्देशांक आणि निफ्टीत एक टक्क्यापेक्षा जास्त घसरण नोंदवण्यात आली. मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक ९६१ अंकांनी कोसळून ८१,१५९ या पातळीवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी ३१७ अंकांच्या घसरणीसह २५,१७८ या पातळीवर बंद झाला.

बाजारातील घसरणीमुळे मुंबई शेअर बाजारातील कंपन्यांचे बाजार भांडवल ४६८.४९ लाख कोटींवरून घसरून ४६३.५१ लाख कोटी रुपयांवर आले. याचाच अर्थ कंपन्यांच्या भांडवलात पाच लाख कोटी रुपयांची घट झाली. सन फार्मा, भारती एअरटेल, बजाज फिनसर्व्ह, इंटरग्लोब एव्हिएशनची घसरण झाली.




तुमच्या कुटुंबासाठी हे सर्व मिळवा

एलआयसीची जीवन लक्ष्य
Plan No.:733 UIN No: 512N297V03

तुमच्या कुटुंबाच्या निश्चित भविष्यासाठी नियोजन

मुख्य वैशिष्ट्ये:
- **किमान विमा रक्कम:** ₹2,00,000
- **कमाल विमा रक्कम:** मर्यादा नाही
- **वयाची पात्रता:** 18 ते 50 वर्षे
- **कमाल मुदतपूर्ती वय:** 65 वर्षे
- **पॉलिसीची मुदत:** 13 ते 25 वर्षे
- **प्रीमियम भरण्याची मुदत:** पॉलिसी मुदती पेक्षा 3 वर्षे कमी
- **मुदतपूर्ती लाभ:** विमा रक्कम + बोनस
- **मृत्यू लाभ:** वार्षिक उत्पन्न लाभ आणि मुदतपूर्ती तारखेला विमा रकमेचा परतावा + लागू होणारा बोनस
- **वैकल्पिक रायडर्स:** 1) एलआयसीचा अपघाती मृत्यू व अपंगत्व हितलाभ रायडर 2) एलआयसीचा अपघाती मृत्यू हितलाभ रायडर 3) एलआयसीचा न्यू टर्म ॲश्युरन्स रायडर

पार, नॉन-लिंक्ड, जीवन, वैयक्तिक, बचत योजना

आमचा व्हाट्सअ‍ॅप नं. 8976862090 बोला 'Hi'
अधिक माहितीसाठी तुमच्या एजंटशी/जवळच्या एलआयसीच्या शाखेशी संपर्क साधा/भेट द्या www.licindia.in
एलआयसी मोबाईल अ‍ॅप डाऊनलोड करा LIC digital | भेट द्या: licindia.in | कॉल सेंटर सेवा (022) 6827 6827
आम्हाला फॉलो करा: LIC India Forever | IRDAI Regn No.: 512

LIC भारतीय आयुर्विमा महामंडळ भारतीय जीवन बीमा निगम LIFE INSURANCE CORPORATION OF INDIA
प्रत्येक क्षणी तुमच्या सोबत
LIC/P1/2025 – 2026/33/Mar

भ्रामक फोन कॉल्स आणि बनावट/फसव्या ऑफर्सपासून सावध रहा. आयआरडीएआय किंवा त्यांचे अधिकारी विमा पॉलिसीज्ची विक्री, बोनस जाहीर करणे किंवा प्रिमियम्सची गुंतवणूक, रकमा परत करणे यासारख्या विमा व्यवसायाशी संबंधित कोणत्याही कामकाजात सहभाग घेत नाहीत. अशा प्रकारचे दुरध्वनी येणाऱ्या पॉलिसीधारकांनी अथवा संभाव्य ग्राहकांनी पोलिसांकडे तक्रार नोंदवावी. **कृपया विक्रीचा व्यवहार पूर्ण करण्यापुर्वी अधिक माहितीसाठी तसेच जोखमींचे घटक, नियम व अटी यासंबंधीच्या माहितीसाठी, विक्री माहिती पुस्तिका काळजी पूर्वक वाचा.**



# कुसळंब गोळीबार प्रकरणी तिघांना अटक

### पिस्तूल, जिवंत काडतुसे जप्त; पाच तासांच्या पाठलागातून ठोकल्या बेड्या

**वैराग, दि.२७ फेब्रुवारी-**

कुसळंब (ता. बार्शी) येथे क्षुल्लक कारणावरून एका व्यक्तीवर गोळीबार करून जीवे मारण्याचा प्रयत्न करणाऱ्या आणि परिसरात दहशत माजवणाऱ्या सराईत गुन्हेगारांच्या टोळीला बार्शी तालुका पोलिसांनी अवघ्या ५ तासांत सिनेस्टाईल पाठलाग करून बेड्या ठोकल्या.

या कारवाईत पोलिसांनी तीन आरोपींसह एक देशी बनावटीचे पिस्तूल, जिवंत काडतूस, धारदार शस्त्रे आणि गुन्ह्यात वापरलेली महागडी कार जप्त केली. कुसळंब येथे तीन इसमांनी किरकोळ कारणावरून एका व्यक्तीला बेदम मारहाण केली. केवळ मारहाणीवर न थांबता, दहशत निर्माण करण्याच्या उद्देशाने त्यांनी पिस्तूलमधून गोळीबार केला आणि संबंधित व्यक्तीला जीवे मारण्याचा प्रयत्न केला. घटनेनंतर आरोपी फरार झाले होते. पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी आणि अप्पर पोलीस अधीक्षक प्रितम यावलकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक दिलीप ढेरे व त्यांच्या पथकाने तांत्रिक विश्लेषण आणि गुप्त बातमीदारांमार्फत आरोपींचा शोध सुरू केला. तपासादरम्यान ही टोळी करमाळा परिसरात असल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी तातडीने दोन पथके तैनात करून सापळा रचला. तब्बल ५ तास पाठलाग केल्यानंतर, पोलिसांनी आरोपींना शिताफीने ताब्यात घेतले. २७ फेब्रुवारी रोजी पहाटे ३:२० च्या सुमारास तिघांना अटक करण्यात आली. योगेश भास्कर मोरे (वय २९ वर्षे, रा. कुसळंब, ता. बार्शी, सध्या रा. हडपसर, पुणे), राहुल दत्ता गायकवाड (वय २६ वर्षे, रा. कुंभारगाव, ता. करमाळा, सध्या रा. हडपसर, पुणे) व रोशन दत्तात्रय पिसाळ (वय ३२ वर्षे, रा. बागलानीनगर, हडपसर, पुणे) यांना अटक केली आहे. त्यांच्याकडून देशी बनावटीचे पिस्तूल आणि १ जिवंत काडतूस, लोखंडी रॉड, लाकडी दांडका आणि कोयता तसेच गुन्ह्यात वापरलेली 'ह्युंदाई ऑरा' कंपनीची चारचाकी कार जप्त करण्यात आली. सर्व आरोपींना न्यायाधीशांसमोर हजर केले असता, त्यांना २ मार्च २०२६ पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

# रेल्वे पुलाच्या कामाबाबत पालकमंत्री गोरे यांचा थेट रेल्वे अधिकाऱ्यांना फोन

## पुढील आठवड्यात लावणार बैठक

## आ. देवेंद्र कोठे यांचा पाठपुरावा





**तभा वृत्तसेवा, सोलापूर, दि. २७ फेब्रुवारी-**

अण्णाभाऊ साठे चौक येथील रेल्वे पुलाच्या कामाबाबत पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी शुक्रवारी थेट विधानभवनातून रेल्वे अधिकाऱ्यांना फोन करून विचारणा करत सूचना दिल्या. आमदार देवेंद्र कोठे यांनी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे याबाबत पाठपुरावा केला होता.

अण्णाभाऊ साठे चौक ते मरिआई चौक दरम्यान असलेल्या ब्रिटिशकालीन रेल्वे पुलाची कालमर्यादा संपल्यामुळे हा पूल पाडून नव्याने बांधण्याचे काम सुरू आहे. परंतु तांत्रिक कारणांमुळे या कामाला उशीर होत आहे. परिणामी, या रस्त्यावरून रोज ये जा करणाऱ्या नागरिकांना नाहक त्रास सामोरे जावे लागत आहे. याबाबत आमदार देवेंद्र कोठे यांनी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे पाठपुरावा करत या पुलाचे काम लवकरात लवकर व्हावे, अशी मागणी केली होती.

यानंतर पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी त्वरित थेट विधानभवनातून रेल्वे अधिकाऱ्यांना फोन करून याबाबत विचारणा केली. पालकमंत्री जयकुमार गोरे म्हणाले, अण्णाभाऊ साठे चौकातील रेल्वे पूल बांधणीचे काम लवकरात लवकर होणे आवश्यक आहे. हजारो नागरिक दररोज ये - जा असणारा रस्ता बंद झाल्यामुळे पर्यायी मार्गांवर मोठी गर्दी होत आहे. तसेच वाहतूक खोळंबत आहे. त्यामुळे नागरिकांच्या अडचणी दूर करण्यासाठी या पुलाचे काम त्वरित पूर्ण करावे. मी पुढील आठवड्यात याबाबत बैठक घेणार आहे, असेही पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी रेल्वे अधिकाऱ्यांना याप्रसंगी सांगितले. त्यानुसार पुढील आठवड्यात रेल्वे अधिकाऱ्यांसमवेत बैठक घेण्यात येणार असून, यावेळी पुलाच्या कामाचा आढावा घेण्यात येणार आहे, असे आमदार देवेंद्र कोठे यांनी सांगितले.

# अनेक शाळांना धमक्यांच्या ई-मेलमुळे खळबळ; अर्थसंकल्पीय अधिवेशनातही चर्चा



**मुंबई :-** मुंबईतील दहिसर परिसरातील गइछउ इंटरनॅशनल स्कूलला स्फोटाची धमकी देणारा ई-मेल मिळाल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. सकाळच्या सुमारास शाळा प्रशासनाला हा संदेश प्राप्त होताच त्यांनी तत्काळ पोलिसांशी संपर्क साधला. घटनेची माहिती समोर येताच पालकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले, तर परिसरात तणाव जाणवू लागला. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत शाळा प्रशासनाने तातडीने आवश्यक ती खबरदारी घेतली. दरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधिमंडळातही या प्रकाराची माहिती दिली.

पोलिसांनी माहिती मिळताच घटनास्थळी धाव घेत संपूर्ण परिसर बंदिस्त केला. शाळेभोवती कडेकोट सुरक्षा व्यवस्था उभी करण्यात आली. तपास पथकांनी शाळेची इमारत तसेच आसपासचा परिसर सखोलपणे तपासण्यास सुरुवात केली. कोणतीही संशयास्पद वस्तू आढळू नये यासाठी बारकाईने पाहणी करण्यात आली. परिस्थितीवर नियंत्रण ठेवण्यासाठी अतिरिक्त बंदोबस्त तैनात करण्यात आला असून तपास यंत्रणा सतर्क ठेवण्यात आली आहे.

दरम्यान, विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने शाळा प्रशासनाने तत्काळ सुट्टी जाहीर केली. पालकांना आपल्या मुलांना सुरक्षितरित्या घरी घेऊन जाण्याचे आवाहन करण्यात आले. शाळा रिकामी करून तपास पूर्ण होईपर्यंत सर्व हालचालींवर निर्बंध ठेवण्यात आले.

मुंबई उपनगरातील सुमारे बावीस ते पंचवीस शाळांना अशाच प्रकारचे धमकीचे ई-मेल मिळाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. त्यामुळे हा प्रकार केवळ खोडसाळपणा आहे की, यामागे काही मोठा कट आहे, याचा तपास सुरू आहे. सध्याची परिस्थिती नियंत्रणात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. शहरातील इतर शाळांभोवतीही सुरक्षा व्यवस्था अधिक कडक करण्यात आली आहे.

# विजय वडेट्टीवारांविरोधात हक्कभंगाचा प्रस्ताव

## शेतकऱ्यांनी किडन्या विकल्यावर सभागृहाची दिशाभूल केल्याचा आरोप

**मुंबई :-** राज्य विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात आज अनेक महत्त्वाच्या मुद्यांवर चर्चा झाली. यात चंद्रपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या कथित किडन्या विकण्याच्या घटनेप्रकरणी भाजप आमदार योगेश सागर यांनी काँग्रेस आमदार विजय वडेट्टीवार यांच्याविरोधात हक्कभंगाचा प्रस्ताव सादर केला. विजय वडेट्टीवार यांनी या प्रकरणी खोटी माहिती देऊन सभागृहाची दिशाभूल केल्याचा आरोप त्यांनी केला. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर या हक्कभंगावर योग्य तो निर्णय घेणार आहेत.



### कृत्रिम फुलांच्या वापरावर बंदी आहेच : मुख्यमंत्री

कृत्रिम फुलांच्या वापरावर बंदी आहेच, त्याचबरोबर दादर फुल मार्केट व्यवस्थित सुरू राहिल यासाठी महापालिकेला आदेश दिले जातील, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज सभागृहात बोलताना दिली. हा मुद्दा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जयंत पाटील यांनी उपस्थित केला होता. त्यात मंत्री पंकजा मुंडे यांनीही हस्तक्षेप केला. मुंबईतील काही शाळांना ईमेलद्वारे धमकी देण्यात आल्याचा मुद्दा आज भाजपच्या दहिसरच्या आमदार मनिषा चौधरी यांनी उपस्थित केला. त्याला उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शाळांना मिळालेल्या धमकीच्या ई-मेलची तपासणी करून ई-मेल पाठवणाऱ्यांविरुद्ध कारवाई केली जाईल, असे स्पष्ट केले.मराठी शाळांच्या पटसंख्या, गुणवत्तापूर्ण शिक्षण, भौतिक सुविधा आदींबाबत सभागृहात प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. मूळ प्रश्न विक्रम पाचपुते यांनी उपस्थित केला. त्यावर संजय केळकर, प्रवीण दटके, अस्लम शेख, अमित देशमुख, कैलास पाटील, राहुल कुल यांनी उपप्रश्न विचारले.



### राज्यात मराठीची हेळसांड : सतेज पाटील

राज्यात मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळूनही आवश्यक निधी दिला जात नाही, अनेक मराठी शाळा बंद पडत आहेत, तसेच मराठी भाषा भवन उभारण्याऐवजी इतर राज्यांच्या नावाने इमारती उभारल्या जात आहेत, असा आरोप काँग्रेस आमदार सतेज पाटील यांनी आज केला.

### लाडकी बहीण योजनेुळे इतर खात्यांवर ताण?

विधानपरिषदेत काँग्रेसचे आमदार सतेज पाटील यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नावर उत्तर देताना वनमंत्री गणेश नाईक यांनी केलेले वक्तव्य सध्या चर्चेचा विषय ठरले आहे. 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेचा उल्लेख करताना नाईक यांनी सांगितले की, राज्य शासनाने गेल्या वर्षभरात अनेक प्रकल्प सुरू केले असून त्यामध्ये या योजनेलाही मान्यता देण्यात आली आहे. मात्र या योजनेमुळे इतर खात्यांवर ताण निर्माण होण्याची परिस्थिती तयार होत असली तरी ती योजना बंद होणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. त्यांच्या या वक्तव्यामुळे सभागृहात चर्चा रंगली.

### शेतकऱ्यांना पिळण्यात महायुती सरकारचा हात कुणीच धरू शकत नाही : दानवे

शेतकऱ्यांना पिळण्यात या महायुती सरकारचा हात देशात कोणी धरू शकत नाही. प्रशासनाच्या चुकीमुळे शेतकऱ्यांच्या खात्यात गेलेल्या पैशांच्या वसुलीसाठी सरकार अशा 'पठाणी' पद्धतीने 'फरमान' काढत सुटले आहे. चूक करणारे मोकाट सोडले आहेत आणि शेतकऱ्यांना या चुकांची शिक्षा दिली जात आहे, अशी टीका ठाकरे गटाच्या अंबादास दानवे यांनी केली आहे.

### विधिमंडळातील मराठी गौरव दिनाच्या कार्यक्रमाला आमदारांची दांडी

मराठी गौरव दिनाच्या कार्यक्रमाच्या निमित्ताने विधिमंडळातील आयोजित कार्यक्रमाला आमदारांनी दांडी मारली. मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री या क्रार्यक्रमाला हजर असताना सर्वपक्षीय आमदारांनी या कार्यक्रमाकडे पाठ फिरवली.



### विधिमंडळाच्या पायऱ्यांवर विरोधकांची घोषणाबाजी

मराठी भाषा दिनी महाविकास आघाडीच्या आमदारांनी विधिमंडळाच्या पायऱ्यांवर मराठी भाषेसाठी आंदोलन केले. महाराष्ट्र आमचा स्वाभिमान मराठी आमचा अभिमान, मराठी भाषेवर अन्याय करणाऱ्या सरकारचा धिक्कार असो, मराठी शाळा बंद करणाऱ्या सरकारचा धिक्कार असो अशा घोषणा त्यांनी यावेळी दिल्या. राज्यात मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देऊन निधी दिला जात नाही, मराठी शाळा बंद पडत आहेत, मुंबईत मराठी भाषा भवन न बांधता बिहार भवन बांधण्यात येत आहे या मुद्यांवरही महाविकास आघाडीच्या आमदारांनी पायऱ्यांवर आपला रोष व्यक्त केला.

### विधिमंडळात 'जावे विनोदाच्या गावा'

महाराष्ट्र विधान मंडळातील मध्यवर्ती सभागृहात मराठी भाषा गौरव दिनानिमित्त जावे विनोदाच्या गावा या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे संयोजन प्रा. राम शिंदे, सभापती महाराष्ट्र विधानपरिषद, ड. राहुल नार्वेकर, अध्यक्ष महाराष्ट्र विधानसभा, डॉ. नीलम गोऱ्हे, उप सभापती महाराष्ट्र विधानपरिषद आणि अण्णा बनसोडे, उपाध्यक्ष महाराष्ट्र विधानसभा यांच्या संकल्पनेनुसार करण्यात आले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी आपले मनोगत व्यक्त केले.

### सावरकरांना भारतरत्न देण्याचा प्रस्ताव

भाजप आमदार सुधीर मुनगंटीवार आज आपला अशासकीय ठराव सादर करणार आहे. त्याद्वारे ते स्वातंत्र्यवीर सावरकर यांना भारतरत्न पुरस्कार देण्याची मागणी करणार आहेत. देशाला स्वातंत्र्य मिळण्याकरिता लढा देऊन त्यासाठी काळ्या पाण्याची शिक्षा भोगून जनतेला मातृभूमी प्रेमाची ज्वलंत विचारसरणी देणारे व क्रांतीकारकांचे प्रेरणास्थान असलेले स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांना मरणोत्तर भारतरत्न प्रदान करण्याबाबत राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे, असे त्यांनी आपल्या प्रस्तावात म्हटले आहे.




### समन्वय आणि एकोप्याचा अभाव

राज्यसभेच्या जागेसाठी मविआने कुणाला राज्यसभेचा उमेदवारी द्यावी हा त्यांचा प्रश्न आहे. त्यांच्यामध्ये समन्वय नाही, एकोपा नाही, एकमत नाही हे काही आजचे नाही तर पूर्वीपासून हे सुरू आहे. केवळ महायुतीच्या विरोधात आम्ही विरोधक म्हणून उभे राहिलो असा अभास त्यांनी तयार केला आहे, असे मंत्री उदय सामंत यांनी म्हटले आहे.

## कांद्याला प्रति क्विंटल ५०० रुपये अनुदान द्या : भुजबळ

मंत्री छगन भुजबळ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना एक पत्र लिहिले आहे. या पत्राद्वारे त्यांनी कांदा उत्पादक शेतकऱ्यांना एकही प्रति क्विंटल ५०० रुपये अनुदान देण्याची मागणी केली आहे. महाराष्ट्रातील कांदा उत्पादक शेतकरी सध्या अत्यंत बिकट परिस्थितीचा सामना करत आहेत. कांदा पिकासाठी प्रति क्विंटल सुमारे १,५०० रुपये उत्पादन खर्च येत असताना बाजारभाव मात्र ५०० रुपयांखाली घसरले आहेत. जानेवारीपासून सुमारे १,००० रुपयांवर स्थिर असलेले दर अचानक कोसळल्यामुळे आणि बेमोसमी पावसामुळे बळीराजा गंभीर आर्थिक संकटात सापडला आहे. उत्पादन खर्चापेक्षा कमी दर मिळत असल्याने शेतकरी कर्जबाजारी झाला असून त्यांच्या उपजीविकेचा प्रश्न अधिकच गंभीर बनला आहे. सन २०२३ मध्ये शासनाने कांदा उत्पादकांना प्रति क्विंटल ३५० रुपये अनुदान दिले होते; मात्र सध्याची परिस्थिती त्यापेक्षाही अधिक चिंताजनक आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना तात्काळ दिलासा मिळावा यासाठी किमान प्रति क्विंटल ५०० रुपये अनुदान जाहीर करावे, अशी ठाम मागणी सविस्तर पत्राद्वारे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. तथापि, केवळ अनुदान देऊन हा प्रश्न कायमस्वरूपी सुटणार नाही. इतर पिकांप्रमाणे कांद्यालाही उत्पादन खर्चावर आधारित निश्चित आधारभूत किंमत मिळणे अत्यावश्यक आहे. यासाठी किमान २,२५० रुपये प्रति क्विंटल हमीभाव निश्चित करून त्यासंदर्भात दीर्घकालीन व शाश्वत धोरण ठरविण्याची गरज आहे. केंद्र सरकारकडून अचानकपणे लादल्या जाणाऱ्या निर्यातबंदीमुळे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत भारतीय कांद्याची विश्वासार्हता कमी होत आहे. परिणामी, परदेशी आयातदार इतर देशांकडे वळत असून भारतीय शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे, असेही ना.छगन भुजबळ म्हणाले.




## अजित पवारांच्या मृत्यूप्रकरणी सरकारला सभागृहात उत्तर द्यावे लागेल : शशिकांत शिंदे

अजित पवार यांच्या विमान अपघात प्रकरणी बंदी घातलेल्या कंपनीवर गुन्हा दाखल करण्यात यावा, यासाठी कालही मी सभागृहात चर्चा केली, तरीही जर गुन्हा दाखल होत नसेल तर त्यांची अल्पकालीन चर्चा आम्ही स्वीकारलेली आहे, त्यावेळी चर्चा करू, तेव्हा सरकारला त्यांचे उत्तर द्यावे लागेल, असे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी म्हटले आहे. काल सीआयडीने सुद्धा सांगितले आहे की, हा घातपात आहे की अपघात या संदर्भात चौकशी करतो आहोत. आता या चौकशीला किती वेळ लागणार त्यातून काय निष्पन्न होणार यावर सभागृहात चर्चा होईल आणि सरकार त्यावर खुलासा करेल अशी माझी अपेक्षा होईल.

## मराठी न शिकवणाऱ्या शाळांवर होणार कारवाई : मंत्री भुसे

काँग्रेस आमदार अमित देशमुख यांनी आज सरकारला राज्यातील हिंदी, गुजराती, उर्दु, पंजाबी, कानडी, तामिळ, बंगाली माध्यमांच्या शाळा आहेत. या माध्यमांच्या शाळांमध्ये मराठी सक्तीची आहे का? आणि नसेल तर ती सक्ती तुम्ही केव्हा करणार असा प्रश्न केला. त्यावर शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी राज्यातील सर्वच शाळांमध्ये मराठी सक्तीची असल्याचे स्पष्ट केले. राज्यातील सर्व माध्यमांच्या व सर्व भाषिकांच्या शाळेमध्ये मराठी भाषा शिकवणे हे बंधनकारक आहे. त्याची प्रभावी अंमलबजावणी झाली पाहिजे यासाठी आपली सर्वांची जबाबदारी आहे. तर एखाद्या शाळेत मराठी भाषा शिकवली जात नसेल, तर त्याची माहिती दिली, तर तत्काळ त्याची चौकशी केली जाईल. विद्यार्थी आधार कार्ड प्रमाणीकरणामुळे बोगस विद्यार्थी शोधून काढले जात आहेत, विद्यार्थ्यांच्या आरोग्यासाठी त्याचं हेल्थ कार्ड तयार केलं जात आहे, असे मंत्री दादा भुसे यांनी सांगितले.



# विमानतळाला अजित पवार यांचे नाव द्या

## आ. रोहित पवार यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**मुंबई :-** अजित पवार गेली बावीस वर्षे मुंबईतील देवगिरी बंगल्यावर वास्तव्यास होते. त्या ठिकाणी त्यांचे स्मारक उभारण्यात यावे, अशी मागणी रोहित पवार यांनी केली आहे. तसेच विधानभवन परिसरातही त्यांचे स्मारक व्हावे, बारामती विमानतळावर रात्रीच्या उड्डाणाची सोय सुरू करून तो अत्याधुनिक करावा आणि त्या विमानतळाला अजित पवार यांचे नाव द्यावे, अशा मागण्या त्यांनी मांडल्या. पुणे रिंग मार्गालाही त्यांचे नाव देण्याची मागणी त्यांनी केली. विमान दुर्घटनेत अजित पवार यांच्यासोबत सुरक्षा रक्षक सुदीप जाधव यांचाही मृत्यू झाला. त्यांच्या पत्नी ठाणे महापालिकेत करार पद्धतीवर कार्यरत आहेत; त्यांना कायम सेवेत घ्यावे, अशी विनंतीही त्यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली.



## अजितदादांना न्याय मिळवून देण्यासाठी राज ठाकरेंचा पाठिंबा


राज ठाकरे यांची भेट घेतल्याबाबत बोलताना रोहित पवार म्हणाले की, राज्यात त्यांना मानणारा मोठा वर्ग आहे. अजित पवार यांच्या संशयास्पद अपघाती मृत्यूबाबत सर्व पुरावे आणि कागदपत्रे त्यांच्या समोर ठेवून चर्चा करण्यात आली. या भेटीत अमित ठाकरे देखील उपस्थित होते. अजित दादांना न्याय मिळवून देण्यासाठी सुरू असलेल्या या लढ्यात राज ठाकरे पूर्ण ताकदीने पाठिंबा देतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. एकूणच या दुर्घटनेच्या चौकशीभोवती राजकीय आणि सामाजिक पातळीवर मोठी हालचाल सुरू झाली असून, येत्या काही दिवसांत या प्रकरणाला आणखी वेग येण्याची चिन्हे दिसत आहेत.

# मी शब्दाशब्दाला 'का बे' 'साल्या' म्हणायचो

## मुख्यमंत्र्यांच्या कोट्यांनी विधानभवनात पिकला हशा

**मुंबई :-** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज मराठी भाषा गौरव दिनाच्या कार्यक्रमात बोलताना मुंबईत आल्यानंतर आपल्याला आलेल्या भाषिक अडचणीची आठवण सांगितली. मी मुंबई आलो तेव्हा सुरुवातीच्या काळात मला फार अडचणी आल्या. तेव्हा मी शब्दाशब्दाला 'का बे', 'साल्या' असे 'सांस्कृतिक' मराठी बोलायचो. पण इथे आल्यानंतर ही संस्कृती मुंबईला पटण्यासारखी नसल्याची बाब माझ्या लक्षात आली आणि मी माझी भाषा बदलली, असे ते म्हणाले.

महाराष्ट्र विधानमंडळातील मध्यवर्ती सभागृहात आज मराठी भाषा गौरव दिनानिमित्त 'जावे विनोदाच्या गावा' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्यासह विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांमधील प्रमुख नेत्यांनी यावेळी आपली भूमिका मांडली. त्यात मुख्यमंत्र्यांनी अगदी विनोदी शैलीत नागपूरहून मुंबईत आल्यानंतर आलेले अनुभव कथन केले. यावेळी त्यांनी आपल्या खास वैदर्भीयन स्टाईलमध्ये केलेल्या कोट्यांमुळे उपस्थितांत एकच हशा पिकला होता. आपली मराठी भाषा दर ५-७ किलोमीटरवर बदलते. मी मुंबईत आलो तेव्हा सुरुवातीच्या काळात मला फार अडचणी आल्या. कारण मी तेव्हा शब्दाशब्दाला 'का बे', 'साल्या' अशी 'सांस्कृतिक' मराठी बोलत होतो. पण इथे आल्यावर मला लक्षात आले की ही संस्कृती मुंबईला पटण्यासारखी नाही. पुण्यात तर आपल्याला बहिष्कृतच केले जाईल असे मला वाटले. त्यामुळे मी हळूहळू स्वत:ला चांगले मराठी कसे बोलता येईल या दिशेने नेले. पण प्रत्येक भागातल्या मराठीचा आपला गोडवा आपल्याला कायम ठेवायचा आहे. ते पुढे म्हणाले, आज आपण मराठी भाषेचा गौरव करत आहोत. या निमित्ताने आपण आपली भाषा अधिकाधिक लोकांपर्यंत कशी पोहोचवता येईल यासाठी प्रयत्न केला पाहिजे. लोकसाहित्य, लोककला, लोकनाट्य, लोकगीते आपल्याला जिवंत कशी ठेवता येतील हे बघावे लागेल. जगात इंग्रजी सर्वात मोठी भाषा आहे. कारण ती राज्यकर्त्यांची भाषा होती. राज्यकर्त्यांची भाषा ही जगाची भाषा होते. त्यामुळे आपणही आपल्या भाषेला ज्ञानभाषेत रुपांतरीत करण्याची गरज आहे. मराठी बोलणाऱ्याला मराठीमुळे प्रगती करता येते असा भाव आपण निर्माण करायला हवा, असे ते म्हणाले.



### हल्ली घाबरत-घाबरत विनोद केले जातात

मुख्यमंत्र्यांनी यावेळी नेतेमंडळी घाबरत - घाबरत विनोद करत असल्याचीही कोपरखळी मारली. पूर्वी विधानमंडळात भाषणांमध्ये विनोद, कोट्या, व्यंग अशा अनेक छटा पाहायला मिळायच्या. मागील २०-२५ वर्षांत विलासराव देशमुख व गोपीनाथ मुंडे यांच्या भाषणांमध्ये एकमेकांवर केलेल्या कोट्या, त्यातून निर्माण होणारे विनोद असायचे. पण दुर्दैवाने अलिकडच्या काळात अनेकदा विनोदाला अस्मितेशी जोडले जाते. त्यामुळे त्या विनोदातील मर्म निघून जाते. आपल्या बोलण्यातून कोणता अर्थ निघेल व त्यातून माध्यमांमध्ये काय चाललेल या भीतीने माणूस घाबरत - घाबरत विनोद करायला लागला आहे. यामुळे आपल्या भाषणांतील निखळ आनंद कमी झाला आहे.


### विधिमंडळ हे विनोदांना जन्म देणारे ठिकाण

मुख्यमंत्र्यांनी यावेळी विधानसभा व विधानपरिषद या दोन्ही सभागृहांत होणारी भाषणे व प्रश्नोत्तरांमध्ये निर्माण होणाऱ्या विनोदांवरही भाष्य केले. ते म्हणाले, विधिमंडळ हे ही एकप्रकारे अनेक विनोदांना जन्म देणारे असते. आपले राजकीय क्षेत्र, तिथे घडणाऱ्या घटना, विनोद कमी केले, तर कदाचित मराठी नाटक व चित्रपट यांच्या कथानकांमध्ये ५० टक्के घट येईल, इतका मसाला आपण सगळे मिळून साहित्यिकांना देत असतो. त्यामुळे आपण देखील साहित्याची निर्मिती करत असतो.

# लोकांना मारहाण करण्यापेक्षा मराठी शिकवण्यावर भर द्या

## उदय सामंत यांचा मनसेला अप्रत्यक्ष टोला

**मुंबई :-** राज्यसभेच्या जागेसाठी मविआने कुणाला राज्यसभेचा उमेदवारी द्यावी हा त्यांचा प्रश्न आहे. त्यांच्यामध्ये समन्वय नाही, एकोपा नाही, एकमत नाही हे काही आजचे नाही तर पूर्वीपासून हे सुरू आहे. केवळ महायुतीच्या विरोधात आम्ही विरोधक म्हणून उभे राहिलो असा अभास त्यांनी तयार केला आहे, असे मंत्री उदय सामंत यांनी म्हटले आहे.



काही लोकं मराठी भाषेचा जाणीवपूर्वक अपमान करत खच्चीकरण करणाऱ्यावर कडक कारवाई केली जाईल. काही लोकं मराठी बोलण्यावर जे राजकारण करतात त्यापेक्षा वेगळ्या तंत्रज्ञानाने त्यांच्यापर्यंत पोहाचण्याचा प्रयत्न करणार आहे. अमराठी लोकं व्यवसायासाठी राज्यात येतात त्यांना मराठी शिकवण्यासाठी मराठी भाषा विभाग पुढाकार घेणार आहे. एखाद्याला मराठी येत नाही म्हणून त्यांच्यावर दबाव आणत मारहाण करण्यापेक्षा त्याला मराठी शिकवली पाहिजे, तरच महाराष्ट्रातील प्रत्येक जण मराठी बोलू शकेल म्हणत अप्रत्यक्ष मनसेवर निशाणा साधला आहे.

**मराठी भाषा भवनसाठी १०० कोटींचा निधी**

मराठी भाषा भवन संदर्भात विरोधकांनी काहीच तयारी केली नव्हती. स्वत:ला काही जमले नाही की दुसऱ्याने खोडा घातला ही त्यांची प्रवृत्ती आहे. आजपण काही जणांनी कोणीही न वाचणाऱ्या वृत्तपत्रातून टीका केली आहे. २०१३-१४ मध्ये मराठी भाषा भवन बांधावे असा ठराव झाला होता, त्यावेळी त्यांची किंमत ११ कोटी रुपये होती.

आता ती १०० कोटी रुपये झाली आहे. पुढच्या २७ फेब्रुवारी त्यांचा एक भाग पूर्ण होईल. काही लोकांना विकास कामे दिसतच नाही, त्यांच्याकडे तो चष्माच नाही, आमच्यावर टीका करणाऱ्यांनी आत्तपरीक्षण करावे, असा टोला शिवसेना उबाठाला लगावला आहे.




काही लोकं मराठी भाषेचा जाणीवपूर्वक अपमान आणि खच्चीकरण करतात. त्यांच्यावर कडक कारवाई केली जाईल. अमराठी लोकं व्यवसायासाठी राज्यात येतात त्यांना मराठी शिकवण्यासाठी मराठी भाषा विभाग पुढाकार घेणार आहे.
**-उदय सामंत**, मंत्री


# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

शनिवार, २८ फेब्रुवारी २०२६ ३

राज्यात हिंदी सक्ती करू नये. त्रिभाषा सूत्रीबाबत केंद्राकडून दबाव आणला जात आहे. सरकारी कागदपत्रांमध्ये काहीही लिहिले असले तरी प्रत्यक्ष अंमलबजावणी मात्र झालेली नाही. मराठी शाळा बंद पडत असताना सरकार काय करत आहे. ?
**-संजय राऊत**, खासदार

# अफगाणिस्तानचा पाकिस्तानी 'पीएमओ'जवळ हल्ला





शुक्रवारी मध्यरात्रीपासून अफगाणिस्तान आणि पाकिस्तान यांच्यात भीषण संघर्ष पेटला. अफगाणींच्या माऱ्यात पाकिस्तानच्या बाजोर जिल्ह्यातील सीमेवरील एका गावात मोठे नुकसान झाले. पर्वताच्या शिखरावर तैनात असलेले तालिबानी सैनिक

## चार लष्करी तळांवरही केला हल्ला

**काबुल, २७ फेब्रुवारी**

भारताची लढाऊ विमाने पाडल्याचा दावा करणाऱ्या पाकिस्तानच्या हवाई संरक्षण यंत्रणेची पोल उघडली आहे. अफगाणिस्तानने ड्रोनच्या माध्यमातून थेट इस्लामाबादेत 'एअर स्ट्राईक' केला. हे ठिकाण पाकिस्तानी पंतप्रधान कार्यालयापासून केवळ पाच किमी दूर आहे. केवळ इतकेच नव्हे, तर चार लष्करी तळांवरही हल्ले करण्यात आले. नॅशनल मिनिस्ट्री ऑफ डिफेन्सशी संबंधित वायुदलाने दिवसाढवळ्या हवाई हल्ले चढवले, असे अफगाणिस्तानच्या संरक्षण मंत्रालयाने म्हटले आहे. दरम्यान, दोन्ही देशांनी शांततेच्या माध्यमातून प्रश्न सोडवावा, असे आवाहन चीनने केले आहे.

शुक्रवारी रात्री सीमेवर हल्ला करून पाकिस्तानच्या ५५ सैनिकांना ठार केल्यानंतर अफगाणिस्तानने त्यांच्या शहरांवर हल्ले सुरू केले आहेत. आज सकाळी ११ वाजता इस्लामाबाद येथे अफगाणी वायुदलाने हवाई हल्ला केला, असे अफगाणिस्तानच्या संरक्षण मंत्रालयाने सांगितले. हे हल्ले दिवसाढवळ्या करण्यात आले.

अफगाणी वायुदलाने पाकिस्तानची राजधानी इस्लामाबादेतील फैजाबाद शहरातील एका लष्करी तळावर हल्ला केला. सोबतच खैबर पख्तुनख्वाच्या नौशेरातील एका लष्करी छावणी आणि जमरूद येथील लष्करी तळाला अचूक लक्ष्य केले. या व्यतिरिक्त अफगाणी वायुदलाने एबटाबाद येथेही हल्ले केले.

सकाळी अकरा वाजताच्या सुमारास इस्लामाबादेतील फैजाबादजवळचा लष्करी तळ, नौशेरा केन्ट, जमरूद लष्करी कॉलनी आणि एबटाबादला लक्ष्य करण्यात आले. या कारवाईत लष्करी ठिकाणे, केंद्र आणि सुविधा केंद्रांना यशस्वीपणे लक्ष्य करण्यात आले. काबुल, कंदहार आणि पक्तिया येथे पाकिस्तानी वायुदलाने रात्रीच्या वेळी केलेल्या हल्ल्यांना उत्तर देण्यासाठी ही कारवाई करण्यात आल्याचे अफगाणी संरक्षण मंत्रालयाने सांगितले. *(वृत्तसंस्था)*

### अफगाणिस्तानात तयार केलेल्या ड्रोनचा वापर

**या ड्रोन हल्ल्यांबाबत पाकिस्तानी सरकारकडून कोणतीही प्रतिक्रिया समोर आलेली नाही. पाकिस्तानी अफगाणी सैन्याने पाकिस्तानी लष्करी तळांवर ड्रोन हल्ले केल्याची माहिती अफगाणिस्तान बॉर्डर फोर्सच्या प्रवक्त्याने दिली. अफगाणिस्तानात तयार करण्यात आलेल्या ड्रोनचा वापर करून पाकिस्तानी लष्करी शासनाशी संबंधित केंद्रांना लक्ष्य केल्याचा दावा अफगाणी संरक्षण मंत्रालयाने केला.**



### शस्त्र वाटताना दिसले अफगाणी सैनिक

ताब्यात घेतलेली पाकिस्तानी शस्त्रास्त्रे अफगाणी मुजाहिद्दीन वाटत असल्याचे एका चित्रफितीत दिसून आले. अफगाणिस्तानने ड्युरांड लाईनवरील कित्येक पाकिस्तानी चौक्यांचा ताबा घेतल्याचे सांगितले जात आहे. या कारवाईत मोठ्या प्रमाणात शस्त्रास्त्रे जप्त करण्यात आली.

### कित्येक सैनिकांना अटक

**अफगाणिस्तानातील वृत्तवाहिन्यांनुसार, केलेल्या कारवाईत पाकिस्तानचे ५५ सैनिक ठार झाले. अफगाणी लष्कराने सैनिकांचे काही मृतदेह तसेच शेकडो हलके आणि जड शस्त्रे जप्त केली. येथे कित्येक पाकिस्तानी सैनिकांना अटक करण्यात आल्याचा दावा करण्यात आला. पाकिस्तानची दोन लष्करी मुख्यालये आणि १९ चौक्या जप्त केल्याचा दावाही अफगाणिस्तानने केला.**

## मणिपूरमध्ये पाच बंडखोरांना अटक

**इम्फाळ, २७ फेब्रुवारी**

मणिपूरच्या खोऱ्यातील जिल्ह्यांमधून सुरक्षा दलांनी विविध बंदी घातलेल्या संघटनांशी संबंधित पाच बंडखोरांना अटक केली, असे पोलिसांनी शुक्रवारी सांगितले. दोन जिल्ह्यांमध्ये वेगवेगळ्या कारवाईत १० बंदुका आणि दारूगोळ्याचा साठा जप्त करण्यात आला.

बुधवारी इम्फाळ पूर्व जिल्ह्यातील कोइरेंगेई मानुंग लायखोन लीकाई भागातून प्रतिबंधित पीपल्स लिबरेशन आर्मीच्या एका सक्रिय कॅडरला अटक करण्यात आली, असे पोलिसांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. त्याच्या ताब्यातून या संघटनेचे तीन बॅनर जप्त करण्यात आले. याच दिवशी इम्फाळ पूर्व जिल्ह्यातील याइंगांगपोक्पी येथून बंदी घातलेल्या संघटनेच्या इतर दोन कार्यकर्त्यांनाही अटक करण्यात आली. त्यांच्याकडून एक हातबॉम्ब, एक डिटोनेटर आणि दारूगोळा जप्त करण्यात आला. इम्फाळ पश्चिम जिल्ह्यातील वाहेंग खुमान भागातूनही या संघटनेच्या आणखी एका सदस्याला अटक करण्यात आली आहे. गुरुवारी इम्फाळ पूर्वेतील लिशम लीरक येथील त्याच्या निवासस्थानातून बंदी घातलेल्या केसीपी (पीएससी)च्या एका सक्रिय कॅडरला अटक करण्यात आली. गुरुवारी इम्फाळ पूर्व जिल्ह्यातील लायरो चिंग परिसरात केलेल्या कारवाईत सुरक्षा दलांनी शस्त्रास्त्रे आणि दारूगोळ्याचा साठा जप्त केला. *(वृत्तसंस्था)*

# ऑपरेशन सिंदूर-२ साठी भारतीय लष्कर सज्ज

## वेस्टर्न कमांडचे लेफ्टनंट जनरल पुष्कर यांचा पाकिस्तानला इशारा

**पठाणकोट, २७ फेब्रुवारी**

भारताने राबविलेल्या ऑपरेशन सिंदूरने पाकिस्तानला गुडघे टेकवण्यास भाग पाडले होते. ही मोहीम केवळ एक नमुना होती. शत्रूच्या एका चुकीची आम्ही वाट पाहत आहोत. त्यांनी हल्ल्याचा प्रयत्न केल्यास भारतीय लष्कर ऑपरेशन सिंदूर-२ सुरू करेल. यावेळी पाकिस्तानला मोठी किंमत चुकवावी लागेल असा इशारा भारतीय लष्कराच्या वेस्टर्न कमांडचे लेफ्टनंट जनरल राजेश पुष्कर यांनी दिला आहे.

पंजाबच्या पठाणकोट येथील लष्करी तळावर सुरू असलेल्या युद्ध सरावाच्या अखेरच्या दिवशी प्रसार माध्यमांशी संवाद साधताना लेफ्टनंट जनरल पुष्कर म्हणाले, भारतीय लष्कराकडून सुरू असलेला सराव ऑपरेशन सिंदूर २.० चा भाग आहे. शत्रूवर कारवाईची वेळ आल्यास हल्ल्याची व्याप्ती मागच्या वेळेपेक्षा खूप जास्त असेल. गेल्या वर्षी राबवलेल्या ऑपरेशन सिंदूरमध्ये मिळालेल्या यशाचा उल्लेख करताना ते म्हणाले, भारताने पाकिस्तानला कठोर संदेश दिला आणि त्यावेळी अवघ्या चारच दिवसांत गुडघे टेकायला भाग पाडले. पाकिस्तानला लहानसा नमुना दाखवला होता. ऑपरेशन सिंदूर- २ साठीची तयारी भारतीय लष्कराने केली आहे. ही मोहीम कशा प्रकारे पार पडेल याबद्दल मी तुम्हाला आता सांगू शकत नाही, कारण ते आपल्याला शत्रूचे किती नुकसान करायचे, यावर अवलंबून असेल. आम्ही तिन्ही मार्गांनी कारवाई करण्यासाठी आम्ही सज्ज आहोत. भारताला कमकुवत समजणे ही त्यांची चूक असेल. *(वृत्तसंस्था)*



### अण्वस्त्र धमक्यांना घाबरत नाही -लेफ्टनंट जनरल कटियार

'वेस्टर्न कमांड'चे प्रमुख लेफ्टनंट जनरल मनोज कुमार कटियार यांनी सांगितले की, लष्कर भविष्यातील कोणत्याही परिस्थितीसाठी पूर्णपणे तयार असून अण्वस्त्रांच्या धमक्यांना घाबरणार नाही. भविष्यातील कोणत्याही संघर्षाचा निकाल निर्णायक असेल. या वेळी आम्ही पूर्वीपेक्षा अधिक चांगल्या प्रकारे तयार आहोत आणि आमच्याकडे भविष्यासाठी स्पष्ट योजना आहे.

# एपस्टीन प्रकरणात क्लिंटन दाम्पत्याची चौकशी

## अमेरिकेच्या बड्या नेत्यांचे धाबे दणाणले

**वॉशिंग्टन, २७ फेब्रुवारी**

मानवी तस्कर जेफ्री एपस्टीनचा मृत्यू होऊन अनेक वर्षे झाली असली तरी, एपस्टीन फाइल्सने पुन्हा एकदा अमेरिकेच्या राजकारणात भूकंप आणला आहे. या प्रकरणात आता अमेरिकेच्या माजी परराष्ट्र मंत्री हिलेरी क्लिंटन आणि त्यांचे पती माजी राष्ट्राध्यक्ष बिल क्लिंटन यांच्या अडचणी वाढल्या आहेत. रिपब्लिकन पक्षाच्या नेतृत्वाखालील हाऊस ओव्हरसाइट कमिटी त्यांची चौकशी करणार आहे.



हिलेरी यांचे पती आणि माजी राष्ट्राध्यक्ष बिल क्लिंटन यांचीही चौकशी होणार असून, यामुळे अनेक बड्या नेत्यांचे धाबे दणाणले आहेत. जेफ्री एपस्टीन आणि त्याची साथीदार गिलेन मॅक्सवेल यांच्या लैंगिक गुन्ह्यांची चौकशी सध्या सुरू आहे. २०१९ मध्ये न्यूयॉर्कच्या तुरुंगात एपस्टीनचा संशयास्पद मृत्यू झाला होता.

मात्र, अलीकडेच समोर आलेल्या सरकारी कागदपत्रांमध्ये (एपस्टीन फाइल्स)अनेक दिग्गज नेत्यांची नावे समोर आली. हाऊस ओव्हरसाइट कमिटी आता क्लिंटन दाम्पत्याची चौकशी करणार आहे. सुरुवातीला क्लिंटन दाम्पत्याने या कमिटीसमोर हजर राहण्यास नकार दिला होता. मात्र, रिपब्लिकन खासदारांनी कॉँग्रेसचा अवमान केल्याप्रकरणी कारवाई करण्याची धमकी दिल्यानंतर त्यांनी चौकशीला सामोरे जाण्याची तयारी दर्शवली. बिल क्लिंटन यांनी या चौकशीला राजकीय सूडबुद्धी आणि कांगारू कोर्ट असे संबोधले असून, ही सर्व प्रक्रिया केवळ राजकारणाने प्रेरित असल्याचे म्हटले आहे. *(वृत्तसंस्था)*

# एसआयआरसाठी गेलेल्या अधिकाऱ्यांवर जीवघेणा हल्ला

## मुले चोरणारे असल्याचा झाला समज

**कोलकाता, २७ फेब्रुवारी**

पश्चिम बंगालमधील मतदार याद्यांचे पुनरीक्षण अर्थात् एसआयआर प्रक्रियेत सहभागी असलेले दोन अधिकारी चुकून ओडिशाच्या बालासोर जिल्ह्यातील एका गावात पोहोचले. त्यांनी नागरिकांना माहिती मागायला सुरुवात केली असता, गावकऱ्यांनी त्यांना मुले चोरणारे समजून जबर मारहाण केली.

दोन्ही अधिकारी पश्चिम बंगालच्या सीमेला लागून असलेल्या बालासोर जिल्ह्यातील रायबानिया पोलिस ठाणे परिसरातील एका गावात पोहोचले. त्यांना पश्चिम बंगालच्या नयाग्राम ब्लॉकमधील एका गावात जायचे होते. तथापि, त्यांनी भाड्याने घेतलेल्या ऑटो-रिक्षाच्या चालकाने त्यांना चुकून ओडिशाच्या एका सीमावर्ती गावात नेले. स्थानिकांना मुले चोरणाऱ्या टोळीचे सदस्य असल्याचा संशय आला आणि त्यांनी त्यांच्यावर हल्ला केल्याची माहिती एका पोलिस अधिकाऱ्याने दिली. माहिती मिळताच स्थानिक पोलिस घटनास्थळी पोहोचले, परंतु जमावाने पोलिसांना अडथळा आणला आणि पोलिस पथकाशी झटापट केली. काही वेळाने पोलिसांनी दोन्ही अधिकाऱ्यांना जमावापासून वाचवले. याप्रकरणी गुन्हा दाखल करून ७२ जणांना अटक केली आहे. *(वृत्तसंस्था)*

# राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचे 'प्रचंड'मधून उड्डाण



जैसलमेर येथील हवाई तळावर 'प्रचंड'मधून उड्डाण करण्यापूर्वी स्वदेशी बनावटीच्या हेलिकॉप्टरसोबत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, हवाईदल प्रमुख एपी सिंग व अधिकाऱ्यांनी छायाचित्र काढले.

**जैसलमेर, २७ फेब्रुवारी**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी शुक्रवारी वायुदलाच्या जैसलमेर तेथील तळावरून स्वदेशी हलक्या लढाऊ हेलिकॉप्टर (एलसीएच) प्रचंडमधून उड्डाण केले. त्या प्रचंड हेलिकॉप्टरमध्ये सह-वैमानिक म्हणून उड्डाण करणाऱ्या देशाच्या पहिल्या राष्ट्रपती आहेत.

द्रौपदी मुर्मू यांनी उड्डाणादरम्यान हेलिकॉप्टरच्या कॉकपिटमधून सॅल्यूट केला. मुर्मू यापूर्वी लढाऊ विमाने सुखोई आणि राफेलमधून उड्डाण करणाऱ्या देशाच्या पहिल्या राष्ट्रपती ठरल्या होत्या.

द्रौपदी मुर्मू सकाळी सव्वानऊ वाजताच्या सुमारास जैसलमेर येथील वायुदलाच्या तळावर पोहोचल्या. लष्करी अधिकाऱ्यांनी त्यांना हेलिकॉप्टरबद्दल माहिती दिली. यानंतर त्या कॉकपिटमध्ये बसल्या. त्यानंतर सव्वाअकरा वाजताच्या सुमारास ग्रुप कॅप्टन एन. एस. बहुआ यांच्यासोबत हेलिकॉप्टरमधून उड्डाण केले. हेलिकॉप्टरमध्ये २५ मिनिटांच्या उड्डाणादरम्यान मुर्मू यांनी सीमावर्ती भाग आणि पोखरण फील्ड फायरिंग रेंजची पाहणी केली.

जैसलमेरच्या सोनार किल्ल्यावरून 'प्रचंड' हेलिकॉप्टरमधून उड्डाण करताना द्रौपदी मुर्मू यांनी रेडिओद्वारे देशाला संदेश दिला. त्या म्हणाल्या, मी आज प्रचंड हेलिकॉप्टरमधून उड्डाण करत आहे. प्रचंड हेलिकॉप्टर आत्मनिर्भरतेचे एक मजबूत प्रतीक आहे. मी सध्या जैसलमेरच्या प्रसिद्ध किल्ल्यावरून उड्डाण करत आहे. मी देशाच्या वीर सैनिकांना अभिमानाने धन्यवाद देते. माझा सर्वांना प्रेमळ नमस्कार. जय हिंद, जय भारत. *(वृत्तसंस्था)*

# दिवाळखोर व्यावसायिक बांगलादेश सेंट्रल बँकेचे गव्हर्नर

- पंतप्रधान रहमान यांना विरोधकांचा इशारा
- झुंडशाही खपवून घेणार नाही

**ढाका, २७ फेब्रुवारी**

बांगलादेशमध्ये सेंट्रल बँकेच्या नवीन गव्हर्नरपदी बँकांनी दिवाळखोर घोषित केलेल्या व्यावसायिकाची नियुक्ती केल्याने विरोधक संतापले. देशात झुंडशाही सुरू झाली असून, गव्हर्नरचा राजीनामा घ्यावा, अशी मागणी त्यांनी पंतप्रधान तारिक रहमान यांच्याकडे केली.

बांगलादेश बँकेचे नवीन गव्हर्नर म्हणून मोस्ताकुर रहमान यांच्या नियुक्तीनंतर राजकीय संघर्ष तीव्र झाला. जमात-ए-इस्लामीचे प्रमुख आणि विरोधी पक्षनेते शफीकुर रहमान यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना म्हटले की, हा निर्णय पंतप्रधानांच्या सांगण्यावरून घेण्यात आला आहे आणि तो सहन केला जाणार नाही.

सरकारने अहसान हबीब मन्सूर यांना कार्यकाळ संपण्यापूर्वीच पदावरून हटवले आणि रहमान यांची तडकाफडकी नियुक्ती केली. आतापर्यंत बांगलादेशात केंद्रीय बँकेचे गव्हर्नर अनुभवी बँकर, अर्थशास्त्रज्ञ किंवा वरिष्ठ नागरी सेवक असायचे, मात्र पहिल्यांदाच व्यावसायिकाची या पदावर नियुक्ती करण्यात आली, हे नियमांचे उल्लंघन आहे. त्यांची कंपनी ८६ कोटींचे कर्ज फेडण्यात अपयशी ठरली. जो व्यक्ती आपल्याच कंपनीसाठी विशेष अटींवर कर्जाची पुनर्रचना करतो, तो देशाच्या बँकिंग प्रणालीच्या हिताचे रक्षण कसे करेल असा प्रश्न विरोधकांनी उपस्थित केला. *(वृत्तसंस्था)*

# मुलांना पळविण्याचा प्रयत्न करणाऱ्या महिलेला पकडले

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.२७ फेब्रुवारी-**

लहान मुलांना पावडर लावून बेशुध्द करुन पळवून नेणाऱ्या एका संशयित महिलेला अक्कलकोट रोडवरील विनायक नगर जवळील सिध्दरामेश्वर नगर येथील नागरिकांनी पकडून तिला एमआयडीसी पोलिसांच्या ताब्यात दिले.



शुक्रवार, दि.२७ फेब्रुवारी २०२६ रोजी या संशयित महिलेने आपल्या जवळील पांढऱ्या रंगाच्या पावडरने लहान मुलांच्या अंगावर टाकून त्याला बेशुध्द करुन पळवून नेण्याचा प्रयत्न करत असताना या भागातील जागरुक नागरिकांनी एकत्र येत संशयित महिलेला ताब्यात घेतले. महिलेच्या वागणूकीने नागरिक आणि महिला इतक्या संतप्त झाल्या की त्या महिलेला नागरिकांनी चांगलाच चोप दिला. त्या संशयित महिलेने सुरूवातीला ५ जणांची टोळी असल्याचे सांगितले. पोलिस पथक येताच तिने निर्दोष असल्याचा आव आणला. या महिलेच्या ताब्यातून पांढऱ्या रंगाची पावडर महिलांनी हिसकावून घेतली आहे. ती पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. त्या संशयित मुलांना पळवून नेणाऱ्या महिलेला ताब्यात घेऊन चौकशीसाठी पोलिस ठाण्यात नेले आहे.

# शिक्षिकेने अडविली शिक्षणाधिकाऱ्यांची गाडी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.२७ फेब्रुवारी-**

जिल्हा परिषदेतील माध्यमिक शिक्षणाधिकारी कार्यालयात दिवसभर ठाण मांडूनही काम झाले नसल्याने करमाळा तालुक्यातील रहिवासी असलेल्या शिक्षिका शीतल काळे यांनी माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांची गाडी अडवून त्यांना घरी जाण्यापासून रोखल्याने शिक्षणाधिकारी कार्यालयाचा संथ कारभार पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे.

काळे या शिक्षण प्रसारक मंडळ, मंगळवेढा या संस्थेच्या वेळापूर येथील शाळेत या १ जून २०१६ रोजी शिक्षिका म्हणून रुजू झाल्या होत्या. मात्र, २०१८ मध्ये त्यांची सेवा समाप्त (टर्मिनेशन) करण्यात आली. या निर्णयाविरुध्दत्यांनी अपील दाखल केले होते. २०२३ मध्ये या अपिलाचा निकाल त्यांच्या बाजूने लागला. त्यानुसार त्यांना पुन्हा सेवेत रुजू करून घेण्याचे आदेश देण्यात आले. दरम्यान, शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांनी संबंधित शिक्षिकेला टीईटी लागू असल्याचे सांगत सर्वोच्च न्यायालयाचा हवाला देऊन रुजू करून घेण्यास नकार दिला. मात्र, टीईटी लागू नसल्याचा दावा शीतल काळे यांनी केला आहे. शिक्षणमंत्री दादा भुसे, आदिवासी विकास मंत्र्यांचीही त्यांनी भेट घेतली. रुजू करून घेण्याचे आदेश मिळाले असले तरी टीईटी अटीवरुन अडचण कायम राहिली. पोलिसांनी काळे यांना बाजूला करीत असताना महिला पोलीस व शिक्षिका काळे यांच्यात झटापट झाली. न्याय मिळेपर्यंत आपला लढा सुरूच राहील, असा इशारा काळे यांनी दिला.दरम्यान, शिक्षणाधिकारी जगताप यांच्याशी संपर्क साधला असता त्यांच्याकडून प्रतिसाद मिळाला नाही.

# सोन्यावरील कराचे नियम १ एप्रिलपासून बदलणार

## गुंतवणूकदारांना सहन करावा लागेल कराचा बोजा

**नवी दिल्ली, २७ फेब्रुवारी**

भारतातील सोन्याच्या गुंतवणुकीबाबत एक मोठा धोरणात्मक बदल सुरू आहे. सरकारने सॉवरेन गोल्ड बाँड (एसजीबी) योजनेअंतर्गत कर सवलतीच्या नियमांमध्ये सुधारणा केली आहे. ज्याचा थेट परिणाम स्टॉक एक्सचेंजमधून सोने खरेदी करणाऱ्या गुंतवणूकदारांवर होईल. २०२५-२६ च्या अर्थसंकल्पात सादर केलेल्या या बदलांनुसार, दुय्यम बाजारातून खरेदी केलेल्या एसजीबीवरील कर सवलत १ एप्रिल २०२६ पासून बंद करण्यात आली आहे.

**नवीन नियम काय आहे?**

सध्याच्या नियमांनुसार, सॉवरेन गोल्ड बाँड मॅच्युरिटी (आठ वर्षे)पर्यंत धारण केल्याने होणारा भांडवली नफा करमुक्त होता. मग तो थेट सरकारकडून खरेदी केला गेला असेल किंवा स्टॉक एक्सचेंजमधून. तथापि, नवीन नियमांनुसार, करमुक्त मॅच्युरिटीचा लाभ आता फक्त त्या मूळ गुंतवणूकदारांना मिळेल ज्यांनी प्राथमिक इश्यू दरम्यान थेट रिझर्व्ह बँकेच्या माध्यमातून बाँडची सदस्यता घेतली होती. तज्ज्ञांच्या मते, जर एखाद्या गुंतवणूकदाराने १ एप्रिल २०२६ नंतर दुय्यम बाजारातून (एनएसई / बीएसई) एसजीबी खरेदी केले किंवा ते भेट घेतले, तर मॅच्युरिटी नफा आता करमुक्त मानला जाणार नाही.

या बदलाचा थेट गुंतवणूकदारांच्या कमाईवर परिणाम होईल. जर तुम्ही एक्सचेंजमधून ७,००० ला बाँड खरेदी केला आणि त्याची मॅच्युरिटी किंमत ११,००० पर्यंत वाढली, तर ४,००० चा नफा होतो. आता यावर १२.५% दराने दीर्घकालीन भांडवली नफा (एलटीसीजी) कर आकारला जाईल. याचा अर्थ तुम्हाला प्रति बाँड ५०० कर भरावा लागेल. पूर्वी, ही संपूर्ण रक्कम गुंतवणूकदाराकडे जात असे. तज्ज्ञांचा असा विश्वास आहे की ,या निर्णयामुळे दुय्यम बाजारपेठेतील एसजीबीची तरलता आणि आकर्षण कमी होऊ शकते. पूर्वी, गुंतवणूकदार अनेकदा करमुक्त नफा मिळविण्यासाठी एक्सचेंजवर सवलतीच्या दरात बाँड खरेदी करण्याची रणनीती वापरत असत. परंतु, आता हे प्रभावी राहणार नाही. *(वृत्तसंस्था)*





### गुंतवणूकदार दोन श्रेणींमध्ये विभागले

**या नियमाने गोल्ड बॉन्ड गुंतवणूकदारांना दोन श्रेणींमध्ये विभागले आहे.**

- **प्राथमिक गुंतवणूकदार** : त्यांना २.५% वार्षिक व्याज तसेच मॅच्युरिटीवर पूर्णपणे करमुक्त परतावा मिळेल.
- **दुय्यम बाजारातील खरेदीदार** : त्यांना २.५% व्याज मिळेल. परंतु, परिपक्वतेच्या रकमेवर कर आकारला जाईल.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# प्रचार आणि उधळपट्टी

निवडणुका हा लोकशाही व्यवस्थेचा गाभा आहे. लोकशाही शासन व्यवस्थेत निवडणुका अपरिहार्य असतात. मात्र त्याचा सध्या अतिरेक झाल्यासारखे चित्र आहे. आपल्या अवाढव्य अशा देशात प्रत्येक दिवशी कोणती ना कोणती निवडणूक होत असते. मग ती ग्रामपंचायतीपासून राष्ट्रपतिपदापर्यंत कोणतीही राहू शकते. काही निवडणुका प्रत्यक्ष लढवल्या जातात, तर काही अप्रत्यक्षपणे. विधानसभा आणि लोकसभेची निवडणूक प्रत्यक्ष म्हणजे जनतेतून होत असते, तर विधानपरिषद आणि राज्यसभेची निवडणूक अप्रत्यक्षपणे लढवली जाते. काही ठिकाणी नगराध्यक्ष थेट जनतेतून निवडला जातो. नगरसेवक आणि जि. प. सदस्य अनुक्रमे महापौर आणि जिल्हा परिषद अध्यक्षाची निवड करत असतात. यातील काही राज्य निवडणुका आयोगाच्या अखत्यारीत असतात तर विधानसभा, विधानपरिषद, लोकसभा, राज्यसभा, उपराष्ट्रपती आणि राष्ट्रपतिपदाची निवडणूक केंद्रीय निवडणूक आयोगाला घ्यावी लागते.

निवडणुका लढवण्याची एक नशा असते. कारण निवडणूक लढवल्याशिवाय सत्तेचे आणि अधिकाराचे पद मिळत नाही. जनतेच्या सेवेसाठी आम्ही राजकारण करतो, असे सर्व राजकीय पक्ष व त्याचे नेते सतत म्हणत असले, तरी सत्तेशिवाय प्रभावीपणे जनतेची सेवा करता येत नाही, असा समज झाला आहे. हातात सत्ता नसली तर जनतेच्या प्रश्नासाठी तुम्हाला आंदोलन करावे लागते; मात्र सत्ता असली तर जनतेचे प्रश्न सोडविण्याची किल्ली तुमच्या हातात येते आणि सत्तेची किल्ली निवडणुका लढवल्याशिवाय तुमच्या हातात येऊ शकत नाही. तथापि, निवडणुका लढवणे हे आज सोपे राहिले नाही तर अतिशय खर्चिक आणि महागडे झाले आहे. तरीसुद्धा निवडणूक रिंगणात उतरणाऱ्यांची संख्या कमी झाली नाही. हे सारे आठवण्याचे कारण म्हणजे सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेली एक याचिका. 'कॉमन कॉज आणि सेंटर फॉर पब्लिक इंटरेस्ट लिटिगेशन' या गैरसरकारी संस्थेने दाखल केलेल्या याचिकेत निवडणुकीत राजकीय पक्षांकडून होत असलेल्या अमर्याद खर्चावर मर्यादा घालण्याची मागणी करण्यात आली आहे. या याचिकेवर सरन्यायाधीश सूर्यकांत, न्या. जॉयमाल्या बागची आणि न्या. विपुल पंचोली यांच्या खंडपीठाने केंद्र सरकार तसेच निवडणूक आयोगाला नोटीस बजावली आहे. लोकप्रतिनिधी कायद्याच्या कलम ७७(१) नुसार निवडणुकीत उमेदवारांनी प्रचारासाठी खर्च करण्यावर मर्यादा आहे. मात्र ही मर्यादा खरोखर पाळली जाते का? आपण ठरवून दिलेल्या मर्यादेत खर्च होतो का, हे पाहण्याची जबाबदारी निवडणूक आयोगाची असली, तरी निवडणूक आयोग ती जबाबदारी प्रभावीपणे पार पाडते का, हा संशोधनाचा आहे. आयोगाने खर्चाची जी मर्यादा ठरवून दिली, त्याच्या किमान १० पट खर्च निवडणुकीत उमेदवारांकडून होत असतो. उमेदवार आपल्या प्रचारावर करीत असलेला खर्च वेगळा आणि राजकीय पक्ष आपल्या उमेदवारांच्या प्रचारावर करीत असलेला खर्च वेगळा असतो. राजकीय पक्षांसाठी खर्चाची कोणतीच मर्यादा ठरविण्यात आलेली नाही, याकडेच याचिकेतून लक्ष वेधण्यात आले आहे. निवडणुकीच्या प्रचारात पैशाची उधळपट्टी केली जाते, पाण्यासारखा पैसा खर्च केला जातो, ते पाहून सर्वसामान्य माणसाचे डोळे फाटू शकतात. त्यामुळे आज निवडणूक लढवणे हे सर्वसामान्य माणसाचे नाही, तर ते धनाढ्यांचे झाले आहे. देशातील निवडणूक प्रणालीला तत्कालीन मुख्य निवडणूक आयुक्त टी. एस. शेषन यांनी वळण लावले. त्याआधी निवडणुका म्हणजे नुसता सावळागोंधळ होता, कोणत्याही प्रकारचे निर्बंध राजकीय पक्ष आणि त्यांच्या उमेदवारांवर नव्हते. प्रचाराची वेळ निश्चित नव्हती, रात्रभर प्रचार सुरू राहायचा. मात्र, शेषन यांनी प्रचारासाठी रात्री १० पर्यंतची वेळ निश्चित केली. रात्री १० नंतर प्रचारावर बंदी आणली. निवडणूक खर्चाची मर्यादाही त्यांनी तेव्हा ठरवून दिली. आपण प्रचारात दररोज काय खर्च करतो, याचा अहवाल आयोगाला सादर करणे उमेदवारांवर बंधनकारक केले. त्यानुसार आपल्या देशातील निवडणूक प्रणालीला शिस्त आणि काहीसे वळण लागले, असे म्हणायला हरकत नाही. आपल्या देशात मुख्य निवडणूक आयुक्त हे पद आहे. त्या व्यक्तीला काही अधिकारही असतात आणि मनात आणले तर तो देशातील सर्व राजकीय पक्षांचे कान पिरगाळू शकतो, हे शेषन मुख्य निवडणूक आयुक्त झाल्यानंतरच देशातील जनतेला समजले.

निवडणूक आयोग आज प्रचारातील खर्चाचे दर निश्चित करून देते. यात चहा, कॉफी, नाश्ता, दोन्ही वेळचे जेवण, मांसाहारी जेवण, प्रचारातील गाडीचा प्रतिकिमी दर, मंडप, लाऊडस्पीकर, झेंडे, पोस्टर आणि पत्रक याचा दर ठरविला जातो. एक काळ असा होता, जेव्हा कार्यकर्ते आपले घरचे खाऊन लष्कराच्या भाकऱ्या भाजत होते, म्हणजे राजकीय पक्षांचे काम करीत होते. आता परिस्थिती बदलली आहे. आपण उमेदवाराचा प्रचार करतो, म्हणजे त्याच्यावर उपकार करतो असे मानत, त्यामुळे त्याने आपला दिवसभराचा सगळा खर्च केला पाहिजे, अशी कार्यकर्त्यांची मानसिकता झाली आहे. आता दारू आणि मांसाहारी जेवणाशिवाय कार्यकर्ते कामच करत नाही. याशिवाय त्यांच्या खिशातही काही टाकावे लागते. कोणत्याही निवडणुकीत दोन प्रकारचे खर्च होत असतात. एक म्हणजे उमेदवार करतो तो खर्च आणि राजकीय पक्ष आपल्या उमेदवारांच्या प्रचारावर खर्च करतो तो खर्च. पक्षाचा सामायिक खर्च असतो, तो उमेदवाराच्या प्रचार खर्चात धरला जात नाही. आज छोटे पक्ष वगळले तर बहुतांश मोठ्या पक्षाचे सर्वच नेते प्रचारासाठी हेलिकॉप्टर आणि चार्टर्ड विमानातून फिरत असतात. कमीत कमी वेळात जास्त प्रचारसभा घेता याव्या म्हणून हे करावे लागते. आज निवडणुकीच्या प्रचारात असणारी सर्वच नेते आणि कार्यकर्ते चार्टर्ड विमानातून फिरतात आणि पंचतारांकित हॉटेलात राहात असतात. हा खर्च पक्षाचा खर्च मानला जातो.

आज नगरसेवकपदाचा एक उमेदवारही काही लाख रुपये प्रचारावर खर्च करीत असतो. जिल्हा परिषद, नगर परिषद, पंचायती निवडणूकही तशीच. विधानसभा आणि लोकसभेच्या उमेदवाराचे खर्चाचे आकडे पाहिले तर डोळे फिरतील. निवडणुकीत जो पैसा खर्च केला जातो, तो बहुतांश काळा पैसा असतो. कारण या पैशाचा काही हिशेब नसतो. गेल्या काही वर्षांत आपल्या देशातील निवडणूक प्रणालीत एका अनिष्ट परंपरेचा शिरकाव झाला आहे, ती म्हणजे मतदारांना भेटवस्तू वा रोख रक्कम देणे. खरं म्हणजे ही एक प्रकारची लाचच झाली. मतदारांना आपल्या पक्षाची विचारधारा सांगून त्यांचे मत परिवर्तन करण्यापेक्षा त्यांचे मत विकत घेण्याकडे आज सर्व राजकीय पक्षांच्या उमेदवारांचा कल झाला आहे. विशेष म्हणजे यात काही गैर आहे, हे जसे उमेदवारांना वाटत नाही; तसेच उमेदवारांकडून पैसे घेण्यात आपण काही चूक करतो, असे मतदारांना वाटेनासे झाले आहे. मतदान करणे हा आता दोन्ही बाजूने सरळसरळ व्यवहार झाला आहे. सरकारी कार्यालयात लाच देऊन कामे केली जातात. निवडणुकीत पैसे वाटून मतं विकत घेतली जातात. निवडणुकीत जो पैसा वापरला जातो, तो बहुतांश काळा पैसा असतो. काळ्या पैशाचा प्रभाव रोखण्यासाठी निवडणुका लढवण्यासाठी सर्व राजकीय पक्षांना सरकारने पैसे उपलब्ध करून द्यावेत, अशी मागणी अजूनही केली जात आहे. काही देशात असा प्रकार केला जातो. त्यामुळे सरकारने या मागणीवर गांभीर्याने विचार करायला हरकत नाही.

सर्व प्रकारच्या निवडणुकीच्या प्रचारावर होणारा खर्च काही हजार कोटींचा असतो. एवढ्या पैशात देशात कितीतरी विकास कामे होऊ शकतात, देशाचा चेहरामोहरा बदलू शकतो. आपल्या देशात वर्षभर निवडणुका सुरू असतात, निवडणुकांसाठी आचारसंहिताही लागू होत असते. त्यामुळे विकास कामे ठप्प होऊन जातात, सरकारला काही काम करता येत नाही. नोकरशाहीला काम न करण्याचे निमित्तच हवे असते. याला आळा घालण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी 'एक देश एक निवडणूक' या संकल्पनेचा आग्रह धरून आहेत. ही संकल्पना व्यापक समाजहित आणि देशहिताचीही आहेत. राजकीय पक्षांच्या निवडणुकीतील खर्चावर मर्यादा आणण्याबाबत सर्वोच्च न्यायालयाने योग्य तो निर्णय घेतला पाहिजे, सद्यस्थितीची ती गरज म्हटली पाहिजे. ▮

---

## विशेष

# विज्ञान शिक्षण संस्थेची वाटचाल

### २८ फेब्रुवारी; राष्ट्रीय विज्ञान दिन विशेष

**डॉ. राजकुमार अवसरे**

२१ व्या शतकात विज्ञान व तंत्रज्ञान हे केवळ शिक्षणाचे विषय न राहता मानवी जीवनाची दिशा ठरवणारे मूलभूत घटक बनले आहेत. समाजाचा बौद्धिक विकास, आर्थिक प्रगती, पर्यावरणीय समतोल आणि सामाजिक परिवर्तन विज्ञानाधारित विचारसरणीवर अवलंबून आहेत. राज्य विज्ञान शिक्षण संस्थेचा उद्देश केवळ माहिती देणं नसून विद्यार्थ्यांमध्ये जिज्ञासा निर्माण करणे, प्रश्न विचारण्याची सवय लावणे, तर्कशुद्ध विचार विकसित करणे आणि समस्यांकडे वैज्ञानिक दृष्टीने पाहण्याची क्षमता घडविणे हा असतो. विज्ञान शिक्षण समाजघडणीचे प्रभावी साधन म्हणून विकसित करण्यासाठीराज्य विज्ञान शिक्षण संस्था महत्त्वाची भूमिका बजावत आहे. विज्ञान शिक्षणाला दिशा देणारी, धोरण ठरवणारी व प्रत्यक्ष अंमलबजावणी करणारी ही एक अग्रगण्य शैक्षणिक यंत्रणा असून शालेय स्तरावर विज्ञान शिक्षण अधिक प्रयोगशील, जीवनोपयोगी आणि समाजाभिमुख बनवणे तसेच विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवून जबाबदार नागरिक घडवणे, हे मूलभूत कार्य आहे. त्यामुळे राज्य विज्ञान शिक्षण संस्था विज्ञानाधारित समाजनिर्मितीची एक सशक्त चळवळ म्हणून ओळखली जाते.

१९६८ मध्ये पुणे येथे राज्य विज्ञान शिक्षण संस्थेची स्थापना करण्यात आली. प्रारंभी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद अंतर्गत कार्यरत होती. १९८० पासून विज्ञान शिक्षण अधिक व्यापकपणे राज्याच्या विविध भागांपर्यंत पोहोचावे या उद्देशाने संस्थेचे विकेंद्रीकरण करण्यात आले. त्यानुसार संस्थेचे नागपूर येथे स्थलांतर करण्यात आले. या बदलामुळे विदर्भ, मराठवाडा, खानदेश व ग्रामीण भागातील विज्ञान शिक्षणाला विशेष चालना मिळाली. पुढे १७ ऑक्टोबर २०१४ च्या शासन निर्णयानुसार राज्यातील शैक्षणिक प्रशासन अधिक प्रभावी करण्यासाठी पाच प्रादेशिक विद्या प्राधिकरणांची स्थापना करण्यात आली. त्यामध्ये नागपूर येथील राज्य विज्ञान शिक्षण संस्था प्रादेशिक विद्या प्राधिकरण (विज्ञान) म्हणून घोषित करण्यात आली.

या टप्प्यापासून संस्थेची भूमिका अधिक व्यापक, धोरणात्मक व परिणामकारक झाली. राज्यातील विज्ञान शिक्षणाचे नियोजन, समन्वय, अंमलबजावणी व मूल्यांकन करण्याची जबाबदारी या संस्थेकडे आली. काळानुरूप बदल स्वीकारून विज्ञान शिक्षणाला नवी दिशा देणारी गतिमान



आणि परिवर्तनशील संस्था म्हणून विकसित झाली. संस्थेची दृष्टी ही पारंपरिक, परीक्षा केंद्रित शिक्षणाच्या चौकटीपलीकडे जाणारी असून ती समाजपरिवर्तनाभिमुख विज्ञान शिक्षण घडवण्यावर केंद्रित आहे. विज्ञान शिक्षण अधिक अनुभवाधारित, प्रयोगशील, जीवनाशी निगडित आणि समाजोपयोगी बनवण्यावर भर दिला जातो. दैनंदिन जीवनातील प्रश्न, पर्यावरणीय आव्हाने, आरोग्यविषयक समस्या आणि तंत्रज्ञानाचा विवेकपूर्ण वापर यांच्याशी जोडले जावे, ही संस्थेची प्रमुख भूमिका आहे. संस्थेची उद्दिष्टे व्यापक, बहुआयामी आणि दीर्घकालीन स्वरूपाची असून ती शैक्षणिक व सामाजिक गरजांशी सुसंगत आहेत. राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावर विज्ञान शिक्षणाचा दर्जा उंचावणे, अध्यापन-अध्ययन प्रक्रिया अधिक परिणामकारक बनवणे आणि विज्ञान शिक्षणाला व्यवहार्य व जीवनोपयोगी स्वरूप देणे, हे या संस्थेचे उद्दिष्ट आहे. यासोबतच शिक्षकांचे विषयज्ञान, अध्यापन कौशल्य, मूल्यमापन तंत्र आणि व्यावसायिक आत्मविश्वास वृद्धिंगत करणे हेही ध्येय आहे. विज्ञान शिक्षणाची गुणवत्ता ही शिक्षकांच्या गुणवत्तेवर अवलंबून असते, या भूमिकेतून शिक्षक प्रशिक्षण, शैक्षणिक नवोपक्रम आणि कृती संशोधनाला चालना दिली जाते तसेच समाजामध्ये विज्ञान व तंत्रज्ञानाविषयी सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करणे, अंधश्रद्धा व अवैज्ञानिक समजुतींना तर्कशुद्ध विचारांनी आव्हान देणे आणि विज्ञान शिक्षणाला सामाजिक विकासाशी जोडणे केंद्रस्थानी आहे. राष्ट्रीय स्तरावरील शैक्षणिक धोरणे, विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रातील नव्या घडामोडी तसेच राज्याच्या सामाजिक-भौगोलिक गरजा यांचा समन्वय साधून विज्ञान शिक्षणाची दीर्घकालीन दिशा निश्चित करणे, ही भूमिका आहे. एनसीईआरटी, डीएसटी, एनसीएसएम यांसारख्या राष्ट्रीय संस्थांच्या मार्गदर्शक तत्त्वांचा अभ्यास करून त्यांचे राज्यस्तरीय रूपांतर केले जाते; जेणेकरून ही धोरणे प्रत्यक्ष शाळा आणि वर्गखोलीपर्यंत परिणामकारकरीत्या पोहोचू शकतील. ग्रामीण, आदिवासी व दुर्गम भागांतील विद्यार्थ्यांपर्यंत विज्ञान शिक्षण समानतेने पोहोचावे, यासाठी धोरणात्मक उपाययोजना राबविल्या जातात. वैज्ञानिक विकास घडविण्यासाठी विविध अभिनव उपक्रम राबवते. विज्ञान प्रदर्शन, विज्ञान मेळावे, विज्ञान नाट्योत्सव, विज्ञान मंच, अखिल भारतीय विद्यार्थी विज्ञान मेळावा आदी उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांमध्ये जिज्ञासा, सर्जनशीलता, नवोन्मेष क्षमता आणि संशोधन वृत्ती विकसित केली जाते.

गुणवत्तापूर्ण विज्ञान शिक्षणासाठी सक्षम, अद्ययावत आणि प्रेरित शिक्षक असणे अत्यावश्यक असून प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावरील शिक्षकांसाठी विषयज्ञान वृद्धिंगत करणारे, प्रयोगाधिष्ठित अध्यापन, आधुनिक अध्यापन पद्धती आदींवर आधारित प्रशिक्षण कार्यक्रम सातत्याने आयोजित केले जातात. शिक्षकांच्या व्यावसायिक विकासातूनच विज्ञान शिक्षणाची गुणवत्ता उंचावते, या तत्त्वज्ञानावर संस्था कार्य करते. राज्य विज्ञान शिक्षण संस्था राज्यात विज्ञान संस्कृती रुजवण्याचे व्यापक कार्य करते. विज्ञान नाटक, विज्ञान प्रदर्शन, विज्ञान मेळावे, जनजागृती शिबिरे, व्याख्याने आणि संवादात्मक उपक्रमांच्या माध्यमातून विज्ञान सामान्य माणसाच्या दैनंदिन जीवनाशी जोडले जाते. यामुळे विज्ञान ही केवळ अभ्यासाची शाखा न राहता समाजाच्या प्रगतीचे प्रभावी साधन ठरते. या उपक्रमांमुळे अंधश्रद्धा, गैरसमज आणि अवैज्ञानिक समजुतींना तर्कशुद्ध विचारांनी आव्हान दिले जाते. विज्ञान संस्कृती निर्माण करण्यामध्ये राज्य विज्ञान शिक्षण संस्थेचे योगदान सामाजिक व सांस्कृतिक स्तरावरही अत्यंत मोलाचे ठरते. संस्थेचे कार्य राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरही असून राष्ट्रीय स्तरावरील उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांना संधी मिळते. जवाहरलाल नेहरू विज्ञान प्रदर्शन, अखिल भारतीय विद्यार्थी विज्ञान मेळावा आणि विविध विज्ञान स्पर्धांमध्ये सहभाग आणि यश हे राज्य विज्ञान शिक्षण संस्थेच्या मार्गदर्शनाचे फलित आहे. एकूणच राज्य विज्ञान शिक्षण संस्था विज्ञान शिक्षणाच्या प्रवासाची दिशा ठरवणारी, त्याला आशय देणारी आणि भविष्याकडे नेणारी एक सशक्त शैक्षणिक चळवळ आहे, असे म्हणता येईल. ▮

९३२५८४४५२४

(लेखक राज्य विज्ञान संस्थेचे संचालक आहेत.)

---

## वेध

# पांढरा नव्हे तपकिरी कापूस!

**रेवती जोशी-अंधारे**

आपल्या देशात कापूस उत्पादनाचा उण्यापुऱ्या पाच हजार वर्षांचा इतिहास आहे. केवळ पांढराच नाही तर कथ्था, हिरवा आणि फिकट गुलाबी रंगाचा कापूस भारतात तयार होत असे. त्यात विविध रंगसंगती करून दर्जेदार कापड निर्मिती होत असे. यांत्रिक शोधांच्या क्रांतिकारी प्रवाहात स्थानिक बियाणे आणि शेतकऱ्यांचे कौशल्य मागे पडून, पांढऱ्या कापसाला विविध रंगांचा डाय करणे अंगवळणी पडले आहे.

कापड उद्योगांमध्ये सर्वाधिक पाणी कापडाला विशिष्ट रंग देण्यासाठी वापरलं जातं. जगातील औद्योगिक जल प्रदूषणाच्या २० टक्के प्रदूषणासाठी हा उद्योग जबाबदार आहे. जगातील एकूण कार्बन उत्सर्जनापैकी १० टक्के उत्सर्जन यातून होतं. युनायटेड नेशन्स इनव्हायर्नमेंट प्रोग्रामनुसार, शेतातील कापूस ते तयार जीन्स पँट या प्रवासासाठी तब्बल ३७८१ लिटर पाणी लागतं. हे ३३.४ किलोग्रॅम कार्बन उत्सर्जनाच्या बरोबर आहे. एका जीन्स पँटला इतकं एकूण कापड उद्योगासाठी किती पाणी खर्च होत असेल? अमेरिकेतील नॉन प्रॉफीट रिसर्च सेंटर, वर्ल्ड इन्स्टिट्यूटच्या मते, कापड उद्योगांना दरवर्षी कापड रंगविण्यासाठी अंदाजे पाच ट्रिलियन लिटर पाणी लागतं. हे रसायनयुक्त डाय मिश्रित प्रदूषित आणि बहुतांश वेळा कोणतीही प्रक्रिया न करता नैसर्गिक जलस्रोतांमध्ये सोडले जाणारे पाणी प्रदूषण सोबत घेऊन प्रवाहित होत राहते. पण, रंगीत कापडासाठी आपण निसर्गावर प्रदूषणाचं काळं फासतोय, याचा विसर पडला. पण, नागपूरच्या केंद्रीय कापूस संशोधन केंद्रातील संशोधकांनी मात्र याची आठवण ठेवून कापड निर्मितीला इको फ्रेंडली करण्यासाठी दमदार पाऊल टाकले. कापड उद्योगातील हे प्रदूषण कमी करण्यासाठी नागपूरच्या केंद्रीय कापूस संशोधन संस्थेच्या मुख्य शास्त्रज्ञ डॉ. विनीता गोतमारे आणि त्यांच्या चमूने शेतात थेट रंगीत कापूसच पिकविण्याचे यशस्वी संशोधन केले आहे. गेल्या २५ वर्षांपासून कापसाच्या विविध वाणांवर संशोधन करणाऱ्या डॉ. विनीता यांनी कपाशीच्या जंगली प्रजातींचा वापर करून नैसर्गिकरीत्या तपकिरी (ब्राऊन) रंगाच्या कापसाचं वाण शोधून काढलं आहे. रंगीत कापसाचे चार भारतीय वाण सध्या हातात आले असून त्याचं बियाणं शेतकऱ्यांनाही देण्यात आले आहे. कापसाच्या जंगली वाणासोबत क्रॉसिंग करून नवीन वाण तयार करताना रंगीत कापसाचे काही डेरिव्हेटिव्हज त्यांना मिळाले. या कापसाचं व्यावसायिक महत्त्व बघता त्याला स्टेबल करणं गरजेचं आहे, हे लक्षात घेऊन रंग फिका पडू नये यासाठी त्यांचे भगीरथ प्रयत्न सुरू झाले. त्यांनी हिरूसुटम, थर्बेरी, बारबाडन्स आणि रायमोंडी या जंगली जातींचा क्रॉस करून त्यामधून प्रोजिन्स मिळविले. डॉ. गोतमारे आणि कापूस संशोधन संस्थेच्या टीमने वर्ष २०१३ मध्ये वैदेही ९५ जेनेटिक स्टॉक म्हणून रजिस्टर केला. हे वाण गडद तपकिरी रंगाचे आहे. हे भारतीय रंगीत कापसाचे वाण जंगली जातींपासून मिळविलेले आहेत आणि हेच याचं वेगळेपण आहे. या कापसाला रासायनिक फवारणीची गरज नाही. पांढऱ्या कापसापेक्षा याचं उत्पन्न कमी असले, तरी सेंद्रिय फवारणीमध्येच याचे उत्पन्न होते. तपकिरीला पांढऱ्या कापसापेक्षा जास्त भाव मिळतो. माणसाकडून पर्यावरणाची होणारी हानी कमी करण्यासाठी हा कापूस महत्त्वाचा आहे. आणखी रंगीत कापूस आल्यास टेक्सटाईल इंडस्ट्रीमधील प्रदूषण कमी होईल.

या कापसाच्या उत्पादनासाठी फक्त पावसाच्या पाण्याची गरज असते. नंतर या कापसापासून कापड तयार होईपर्यंत याला कुठल्याही रसायनाची किंवा पाण्याची गरज नसते. हा कापूस नैसर्गिकरीत्या रंगीतच असल्याने कुठल्याही प्रकारचा डाय करायची किंवा धुवायला ब्लिचिंगची गरज नाही. या पर्यावरणस्नेही कापसाचा प्रचार-प्रसार वाढायला निश्चित धोरणाची गरज आहे. मायबाप सरकारने संशोधकांच्या प्रयत्नांना समर्थ हातभार लावला तर शेतकरीही कापूस पिकविण्यासाठी पुढाकार घेतील. सध्या उत्पादित होणारा हा रंगीत कापूस फक्त तपकिरी रंगामध्ये उपलब्ध आहे. यामध्ये वेगवेगळे शेड्स आहेत. विदर्भाच्या उन्हात या कापसाचा रंग फिका न पडता आणखी गडद होतो, असं डॉ. विनीता यांच्या संशोधनात स्पष्ट झाले आहे. तपकिरी रंग स्टेबल करण्यात यश मिळालं. आता इतर रंग स्टेबल करून त्या रंगाचा कापूस घेता येईल का? यावर डॉ. विनीता यांचे संशोधन सुरू आहे. हा तपकिरी कापूस सध्या फक्त हातमागासाठी वापरला जातो कारण याच्या लांबी-रुंदीच्या मर्यादा आहेत. हाय स्पीडमशिनसाठी हा कापूस कसा वापरता येईल, यासाठीच्या डॉ. गोतमारे यांच्या संशोधनाला लवकरच यश मिळेल. भविष्यात आणखी सुधारित वाण तयार झालं तर पर्यावरणाच्या दृष्टीनं नव्या भारतातील आमूलाग्र बदलांची ती नांदीच ठरणार आहे. ▮

९८५०३३९२४०

---

## मुंबई वार्तापत्र

# सातवी जागा, सातवा डाव!

**नागेश दाचेवार**

इतिहासापासून आपण काय शिकतो? तर काहीच नाही, हे वाक्य अनेकदा उद्धृत केले जाते. पण महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या जे घडत आहे, ते पाहिल्यावर या वाक्याची प्रचीती पुन्हा एकदा येते. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांतील धडे, टक्केवारीतील किरकोळ फरक, मागील काळात राज्यसभा आणि विधान परिषदेच्या निवडणुकीत देवेंद्र फडणवीसांनी केलेली मतांची बेगमी रणनीती आणि त्याअंती आलेला निकाल हे सगळं डोळ्यासमोर असताना महाविकास आघाडी आणि विशेषतः उबाठात पुन्हा तेच जुने डावपेच खेळले जाताना दिसत आहेत. त्यामुळे आता या सातव्या जागेवर सातवा डाव कोण टाकतो, हा खरा प्रश्न आहे.

२०२२ च्या सहा जागांसाठी झालेल्या राज्यसभा निवडणुकीत महायुतीच्या दोन जागा विजयी होण्याएवढं संख्याबळ त्यांच्याकडे होतं. सहाव्या जागेसाठी आवश्यक असलेलं हक्काचं संख्याबळ नव्हतं. देवेंद्र फडणवीसांनी आपले राजकीय कौशल्य दाखवत, अचूक रणनीतीच्या आधारावर सहावा उमेदवार निवडून आणला होता आणि याच निवडणुकीत संजय राऊत हे काठावर पास झाले होते. त्यांना आवश्यक असलेला ४१ चा कोटाच प्राप्त करता आला होता. एक मतं जरी कमी पडलं असतं तर राऊत बाद झाले असते. त्यावेळी नारायण राणेंसह काही नेते उपहासाने बोलत होते, ''तुम्ही बघा एक संजय पडेल म्हणून...'' पण नशीब बलवत्तर हे संजय बचावले आणि संजय पवार या शिवसेनेच्याच उमेदवाराचा बळी गेला होता. त्यापाठोपाठ २०२२ मध्येच विधान परिषदेच्या १० जागांसाठी निवडणूक झाली. महायुतीकडे चार जागा जिंकण्याएवढं संख्याबळ होतं. मात्र, भाजपाचे पाच उमेदवार निवडून आले. यावेळी काँग्रेसचे पहिल्या क्रमांकाचे उमेदवार चंद्रकांत हंडोरे पराभूत झाले होते. हा कटू अनुभव अलिकडल्या काळातलाच महाविकास आघाडीला आलेला आहे.

लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला मिळालेलं यश हे भव्य असलं, तरी मतांच्या टक्केवारीतला फरक नगण्य होता. महायुती आणि महाविकास आघाडी यांच्यातील अंतर अर्ध्या-एक टक्क्याच्या आसपास होतं. त्याचाच अभ्यास करून महायुतीने विधानसभा निवडणुकीत मतदान वाढविण्यावर भर दिला आणि निकाल पालटले. दुसऱ्या बाजूला जागांच्या आकड्यांच्या भूलभुलय्यात अडकून वास्तवाचा अंदाज न घेण्याची चूक महाविकास आघाडीने केली. यावेळच्या राज्यसभा आणि विधान परिषद



निवडणुकांच्या पृष्ठभूमीवर पुन्हा एकदा इतिहास समोर उभा असताना, यांची गती तीच दिसत आहे. त्यामुळे महाविकास आघाडीच्या वाट्याला येऊ शकणाऱ्या एका राज्यसभा जागेवरून तीन पक्षांमध्ये चाललेली रस्सीखेच बघता, ही एक जागाही गमावून बसले तर त्यात आश्चर्य वाटण्याचं काही कारण नाही. महाविकास आघाडीसमोर प्रश्न आहे तो, सातवी जागा जिंकायची की घरातील लढाई?

**मातोश्रीवर सातव्या जागेची कुस्ती :** राज्यसभेची घोषणा होताच संजय राऊत यांनी जाहीरपणे शरद पवार यांचे नाव पुढे केले. महाविकास आघाडीचे सर्वात ज्येष्ठ नेते शरद पवार आहेत; त्यांनीच राज्यसभेत जावे, अशी भूमिका त्यांनी घेतली. गंमत म्हणजे पवारांच्या पक्षाकडून किंवा स्वतः पवारांकडून अधिकृत घोषणा नव्हती. सध्याच्या विधानसभेच्या संख्याबळावर अजून एक राज्यसभा निवडणूक होणार आहे. आज पवारांना पाठिंबा दिला, तर उद्या उबाठाच्या उमेदवाराला काँग्रेस आणि पवार गटाचा पाठिंबा मिळायलाच हवा, अशी अडेल भूमिका उबाठा यावेळी घेत आहे. उबाठा खेळत असलेल्या या खेळीतूनच खरा खेळ सुरू होत आहे. २०२८ मध्ये राऊत यांची राज्यसभेची मुदत संपणार आहे. त्या वेळी त्यांना पुन्हा निवडून यायचं असेल, तर महाविकास आघाडीची एकजूट आणि संख्याबळ आवश्यक असेल. पण आजच जर त्या जागेवर उबाठा शिवसेनेचा दावा कमजोर केला गेला, तर दोन वर्षांनी राऊत यांचा मार्ग मोकळा होऊ शकतो. याच पृष्ठभूमीवर आदित्य ठाकरे यांची भूमिका महत्त्वाची ठरते. राज्यसभेच्या संभाव्य उमेदवारीबाबत प्रियांका चतुर्वेदी यांचं नाव पुढे करण्याचा प्रयत्न हा केवळ एका नेत्याच्या पुनर्नियुक्तीचा प्रश्न आहे की अन्य काही हे आदित्य ठाकरेच जाणोत. पण एक गोष्ट खरी आज जर महाविकास आघाडीच्या नावाखाली उबाठाने स्वतःचा उमेदवार पुढे रेटला, तर उद्याच्या अर्थात राऊतांसाठी मजबूत दावा करता येणार नाही. परिणामी, राऊत यांचा गेम होऊ शकतो. मातोश्रीवरील हे अंतर्गत राजकारण नवीन नाही. आज इतिहासाची पुनरावृत्ती होत असल्याची दिसत आहे. उद्धव ठाकरेंकडून पक्षाची जबाबदारी आदित्यकडेच जाईल, हे निर्विवाद सत्य आहे. राज्यसभेच्या सातव्या जागेवरून सुरू असलेली जुंपण, हे सगळं एका मोठ्या राजकीय घडामोडींचा भाग असल्याचं जाणवतं. राऊत हे केवळ प्रवक्ते नाहीत, ते उद्धव यांचे रणनीतीकार आहेत आणि आघाडीतील समन्वयकही आहेत. अशा नेत्याला भविष्यातील समीकरणांतून बाहेर ठेवायचं असेल, तर त्याची सुरुवात जागेच्या दाव्यापासूनच होऊ शकते. एवढी राजकीय समज आदित्य ठाकरेंना आलेली दिसते. बरं, आदित्यसमोर संजय राऊत बोलू शकत नाही ही त्यांची कमजोरी नव्हे मजबुरी आहे. त्यामुळेच आदल्या दिवशी पवारच राज्यसभेवर जाती असा छातीठोक दावा करणारे राऊत यांनी लगेच आदित्य ठाकरेंचं बरोबर असल्याचं घुमजाव दुसऱ्या दिवशी केलं. यानिमित्तानं केवळ महाविकास आघाडीमध्येच नव्हे तर मातोश्रीवरही सुप्त संघर्ष सुरू आहे, हे उघड झालं.

राजकारणात विजय आणि पराभव दोन्हीचा अभ्यास करावा लागतो. जर प्रत्येक वेळी पराभवाचं खापर मतफुटीवर, ईव्हीएमवर किंवा सहयोगी पक्षांवर फोडलं, तर आत्मपरीक्षण होत नाही आणि आत्मपरीक्षणाशिवाय रणनीती बदलत नाही. आज राज्यसभेच्या सातव्या जागेवरून सुरू असलेली ही कुस्ती केवळ एका उमेदवाराची नाही. ती २०२८ च्या समीकरणांची, मातोश्रीवरील प्रभावाची आणि भविष्यातील नेतृत्वाच्या रचनेची चाचपणी आहे. राऊत आणि आदित्य यांच्यातील जुंपण ही वैयक्तिक राजकीय स्वार्थाची, अस्तित्वाची आहे. ▮

९२७०३३३८८६

---

## कीर्तनकार साहित्य संपदेचा वाहक

विदर्भ साहित्य संघाच्या निवडणुकीची चर्चा जोरात आहे. अध्यक्षपदाचे उमेदवार आणि त्यांच्या गटांनी उमेदवारीच्या समर्थनार्थ त्यांचे दृष्टिकोन मांडले आहेत पण निरागस, दर्जेदार, सद्भिरुचिपूर्ण आणि परस्पर सद्भावनेतून समाजाला एकत्रित बांधून ठेवण्याचा परिणाम साधण्याची क्षमता असणाऱ्या वाङ्मयीन कृती समाजाच्या तळागाळापर्यंत पोहोचवून साहित्याला सामाजिक चळवळ बनवू, असे आश्वासन कोणीही दिले नाही आणि ते बरोबरही आहे. कारण साहित्यिक केवळ साहित्याची निर्मिती करतो, पण तो त्याच्या कृतीचा वाहक नसतो. ते कार्य साहित्यिक चर्चा, अधिवेशने आणि संमेलनांच्या माध्यमातून होत असते. या उपक्रमांचा प्रभाव बहुधा शहरी आणि त्यातही काही विशिष्ट वर्गापुरता मर्यादित असतो. परिणामतः साहित्यिक चळवळ ही सार्वत्रिक लोकचळवळ न होता ठरावीक वर्गापुरती बंदिस्त बनली आहे. ही आजची स्थिती आहे. याउलट नगरवासींपासून ग्रामवासी आणि वनवासींपर्यंत अफाट पसरलेल्या भारतीय समाजाच्या जडणघडणीत रामायण, महाभारत आणि पौराणिक साहित्याचा मोठा भाग आहे, असे आपण मान्य करतो. म्हणजे साहित्य हे समाजाच्या तळागाळापर्यंत पोहोचले होते आणि सामाजिक सद्भावनेला व गुणवत्तेला बळ देणाऱ्या वाङ्मयीन कृती समाजाच्या आस्थेचा विषय बनल्या होत्या, असा त्याचा अर्थ होतो. असे साहित्य समाजाच्या तळागाळापर्यंत पोहोचविण्याचे कार्य जर कोणी केले असेल तर निर्विवादपणे असे म्हणावे लागते की, ते काम आपल्या कीर्तनकार-प्रवचनकारांनी केले आहे. तेच साहित्य संपदेचे वाहक आहेत. त्यामुळे हा वर्ग साहित्यिक चळवळीचा अविभाज्य अंग आहे; आज दुर्दैवाने तो दुर्लक्षित आहे, उपेक्षित आहे. कीर्तनकार व प्रवचनकार समाजाच्या सर्व स्तरात उपलब्ध आहेत. त्यांचा सर्वत्र संचार असतो, ते प्रतिभासंपन्न आहेत. अशांना प्रतिष्ठापूर्वक साहित्यिक चळवळीशी संलग्न करून त्यांच्या प्रतिभेचा उपयोग करून साहित्य प्रसाराला नवी दिशा व गती देता येणे शक्य आहे, असे वाटते.

**उषा दीक्षित**/९५५२०८२५६७

## वाचक पत्रे

### रामफळ : लागवडीकडे दुर्लक्ष



रामनवमीला रामफळ खरेदी करून मंदिरात रामाच्या मूर्ती समोर अर्पण करतात. खवय्यांना या रामफळाची महती कळू लागल्याने आवर्जून रामफळ खरेदी केले जात आहे. साधारणतः हृदयासारख्या आकाराचे, पिवळट, लालसर, थोडेसे हिरवट व चवीला गोड रामफळाची विक्री हातोहात होत असते. रामफळ (कस्टर्ड ॲपल) हे सीताफळाच्या जातीचे. वर्षभर बाजारपेठेत ही फळे मिळत नाहीत. पूजाअर्चा विधीत जशी अन्य फळे असतात, तसे रामफळ नसते. चवदार असूनही क्वचित लोक ते घेतात. शेतकऱ्यांनी रामफळाचे उत्पादन घ्यायचे ठरवले तर या मालाला बाजारपेठ आहे. बिब्बा, कवठ, सीताफळ, जांभूळ, रामफळांच्या लागवडीसाठी वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ प्रयत्न करत आहे; मात्र, शेतकऱ्यांचा प्रतिसाद नसल्याने कोरडवाहू फळ पिकांच्या जाती नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. रामफळही असेच एक दिवस नामशेष होऊन जाईल, अशी भीती कृषितज्ज्ञ व्यक्त करतात. राज्यात रामफळांच्या मोठ्या प्रमाणात बागा नाहीत. ग्रामीण भागात परसदारी किंवा शेतावर एखादे झाड असते. सरासरी सात वर्षाच्या एका झाडापासून वर्षाला १००-१५० फळे उत्पादन मिळते.

**नितीन दुर्बुडे** /९५०३६४८६३०

### स्त्रियांची तल्लख स्मृती

स्त्री ही प्रत्येक कुटुंबाचा महत्त्वाचा भाग असते. तिच्याशिवाय कुटुंब पूर्ण होत नाही. मग ती कोणत्याही रूपात असो. जसे आई, पत्नी, बहीण, आजी, आत्या, मावशी. एकच व्यक्ती वेगवेगळ्या टप्प्यावर या सगळ्या जबाबदाऱ्या लीलया पेलते. आज स्त्री समाजातील प्रत्येक क्षेत्रात प्रगतिपथावर आहे. ग्रामसेविकापासून राष्ट्रपती पदापर्यंत तसेच शिक्षिका, खेळाडू, डॉक्टर, पोलिस, पायलट, अशा सर्व क्षेत्रात ती आघाडीवर आहे. मात्र तिला देण्यात येणारे मानधन पुरुषापेक्षा कमी असते. ही बाब चित्रपटसृष्टीतही आढळून येते. नुकत्याच झालेल्या संशोधनात असे आढळून आले आहे की, स्त्री व पुरुष त्यांच्या मेंदूतील जैविक मंडलांची जोडणी वेगळ्या प्रकारची असते. त्यामुळे ती मल्टिटास्किंग करू शकते. स्त्रीची स्मृती जास्त तल्लख असते. नवरात्रात स्त्रीचा गौरव केला जातो. तिच्या शक्तीची पूजा केली जाते. जागतिक स्तरावर झालेल्या स्त्री-पुरुषांच्या मेंदूच्या अभ्यासाच्या संशोधनाच्या कामगिरीत तज्ज्ञ म्हणून एका भारतीय महिलेने काम केले आहे. ▮

**स्नेहल खंडागळे**/नागपूर

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



# भव्य शिक्षण परिषद व खुले शिक्षक अधिवेशन गाजणार

**साडेचार हजार शिक्षकांचा अधिवेशनात सहभाग; ४ ते ६ मार्च दरम्यान शिक्षण परिषदेत मागण्यांवर जोरदार चर्चा**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२७ फेब्रुवारी-**

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाच्यावतीने ४ ते ६ मार्च दरम्यान मुंबई येथे भव्य शिक्षण परिषद व खुले शिक्षक अधिवेशन आयोजित करण्यात आले आहे. या अधिवेशनासाठी सोलापूर जिल्ह्यातील सुमारे चार हजार शिक्षकांनी नोंदणी केली असून, ही संख्या साडेचार हजारांपर्यंत जाण्याची शक्यता आहे. जिल्ह्यात एकूण नऊ हजारांहून अधिक शिक्षक कार्यरत असून, त्यापैकी मोठ्या संख्येने शिक्षक या परिषदेत सहभागी होणार आहेत.

या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण विभागाने ४ ते ६ मार्चदरम्यान शिक्षकांना विशेष रजा मंजूर केली आहे. त्यामुळे जिल्ह्यातील शिक्षकांना परिषदेला उपस्थित राहणे सुलभ झाले आहे.

दरम्यान, या अधिवेशनात शिक्षकांच्या प्रलंबित मागण्यांवर सविस्तर चर्चा होणार आहे. यामध्ये टीईटी परीक्षा रद्द करावी, शिक्षण सेवक पद रद्द करून पूर्ण वेतनावर नेमणूक करावी, शालेय ऑनलाईन कामांचा बोजा कमी करावा, शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच विद्यार्थ्यांना गणवेश व शैक्षणिक साहित्य पुरवठा करावा, आरटीई कलमानुसार पाचवी ते आठवीसाठी विषयवार पदवीधर वेतनश्रेणी शिक्षक नेमावेत, पर्यवेक्षक (केंद्रप्रमुख) पदे अनुभवी शिक्षकांतून १०० टक्के पदोन्नतीने भरावीत तसेच जिल्हा परिषद सेसफंडातून प्राथमिक शाळांचे वीज बिल व सफाई कामगार मानधन देण्याची तरतूद करावी, अशा महत्त्वाच्या मागण्या मांडल्या जाणार आहेत.

५ मार्च रोजी शिक्षण परिषदेत राज्यातील १०० प्राथमिक शाळांच्या शैक्षणिक गुणवत्तेचे सादरीकरण होणार असून, नामवंत शैक्षणिक तज्ज्ञांचे मार्गदर्शनही लाभणार आहे. ६ मार्च रोजी होणाऱ्या खुले अधिवेशनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, ग्रामीण विकासमंत्री जयकुमार गोरे तसेच शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे मार्गदर्शन करणार आहेत.

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ यांच्या वतीने आयोजित हे अधिवेशन सर्व शिक्षकांसाठी खुले आहे. ''सोलापूर जिल्ह्यातून चार हजार शिक्षकांची नोंदणी झाली असून, आणखी पाचशे शिक्षक सहभागी होण्याची शक्यता आहे.

सर्व संघटनांतील शिक्षकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे,'' असे आवाहन जिल्हाध्यक्ष वीरभद्र यादवाड यांनी केले आहे. या अधिवेशनामुळे राज्यातील शिक्षकांच्या प्रश्नांना नवे व्यासपीठ मिळणार असून, शासनाने सकारात्मक निर्णय घ्यावेत, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## महत्वाचे...



## उमाबाई श्राविका विद्यालयाचे एनएमएमएस परीक्षेत१४ विद्यार्थी यशस्वी

**सोलापूर, दि.२७ फेब्रुवारी-**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे तर्फे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये घेण्यात आलेल्या एन.एम.एम.एस. परीक्षेत उमाबाई श्राविका विद्यालयातील अंशूक कांबळे, अक्षता धसाडे, तुलसी माने, रामेश्वरी बंडगर, संस्कृती साळुंके, श्रेया भोसले, राहुल शिंदे, श्रावणी पाटील, अथर्व बर्वे,. भक्ती लामकाने, वृषाली दिलपाक, मनस्वी मस्के, श्रेया शिंदे, शिवानी गावडे हे १४ विद्यार्थी विशेष गुणांसह उत्तीर्ण झाले. या विद्यार्थ्यांना प्रशालेतील बाह्य स्पर्धा परीक्षा प्रमुख अभिजीत पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल संस्थेचे सचिव यतीन शहा, विश्वस्त देवई शहा, करण शहा, अंजली शहा, मुख्याध्यापक सुकुमार मोहोळे, मार्गदर्शिका दीप्ती शहा, उपमुख्याध्यापिका अश्विनी पंडित, पर्यवेक्षक बाळासाहेब पौळ आदींनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.



## शिप्र मंडळी पुणेच्या संचालकपदी प्रा. सुरेश मंकणी यांची निवड

**सोलापूर, दि. २७ फेब्रुवारी-**

शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे या नामवंत शिक्षण संस्थेच्या संचालकपदी येथील प्रा.सुरेश मंकणी यांची निवड झाली आहे. त्यानिमित्ताने जैन कासार प्रतिष्ठानच्या वतीने त्यांचा हृद्य सत्कार अध्यक्ष हुकूमचंद हेसे, पौरवी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. विलास हरपाळे, दि. जैन कासार समाज संस्थेचे कार्याध्यक्ष महावीर दुरुगकर यांच्या हस्ते सत्कार आला. यावेळी राजेश मोहोळकर, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठच्या सिनेट सदस्या एडव्होकेट नीता मंकणी उपस्थित होत्या. जमखंडी येथे शिक्षण प्रसारक संस्थेच्या शाळेतच शिक्षण घेतलेल्या सुरेशबाबू मंकणी यांची त्याच संस्थेच्या संचालकपदी व सोलापूर विभागाच्या प्रमुखपदी निवड होणे गौरवास्पद आहे. तसेच जैन कासार समाजासाठी अभिमानास्पद आहे. मंकणी यांनी लातूर तसेच येथील वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयात अध्यापनाचे कार्य केलेले आहे. अ. भा. विद्यार्थी परिषदेचे ते सक्रिय कार्यकर्ते राहिले आहेत. त्यांच्या निवडीबद्दल दि. जैन कासार संस्थेचे अध्यक्ष विजय कासार, संस्थापक पोपटलाल डोर्ले, आई प्रतिष्ठानचे अध्यक्ष मोहन डांगरे, चेंबर ऑफ कॉमर्सचे संजय कंदले, जैन कासार प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष बाबुराव तंगा, उपाध्यक्ष माणिकताई व्यवहारे, शेठ गोविंद रावजी आयुर्वेदिक महाविद्यालयाचे ग्रंथपाल महावीर लाळे आदींनी अभिनंदन करून त्यांच्या कार्यास शुभेच्छा दिल्या.

## चौडेश्वरी तोगटवीर क्षत्रिय पतसंस्थेला राज्य प्रथम दीपस्तंभ पुरस्कार

**चेअरमन लक्ष्मीकांत रामचंद्र उदगिरी यांची माहिती**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२७ फेब्रुवारी-**

सहकार क्षेत्रात अत्यंत नावाजलेले महाराष्ट्र राज्यात नाव असलेले शहरांतर्गत व्यवसाय करणाऱ्या श्री चौडेश्वरी तोगटवीर क्षत्रिय नागरी सहकारी पतसंस्थेस राज्यस्तरीय प्रथम दीपस्तंभ पुरस्कार महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनच्या वतीने मिळाला असल्याचे चेअरमन लक्ष्मीकांत उदगिरी यांनी सांगितले.

कन्ना चौक येथील श्री चौडेश्वरी मंदिराजवळ असलेल्या या पतसंस्थेस संस्कार भारतीचे राष्ट्रीय अध्यक्ष उदय जोशी यांच्या हस्ते पुणे भोर येथील प्रदान करण्यात आला. यावेळी फेडरेशनचे अध्यक्ष काका कोयटे, महासचिव शशिकांत राजोबा, खजिनदार दादाराव तुपकर, उपाध्यक्ष डॉ. शांतीलाल सिंगी, कार्याध्यक्ष दीपक पटवर्धन आदी उपस्थित होते.



चेअरमन उदगिरी म्हणाले की, संस्थेने नुकताच ५१५ कोटी व्यवसायाचा टप्पा देखील पार केला असल्याने या पुरस्काराच्या रूपाने त्याला सोनेरी झालर बांधण्यात आली आहे.

शहरात संस्था ८ शाखेसह कार्यरत असून संस्थेचे संपत्तीक स्थिती एकूण ठेवी २७२ कोटी, कर्ज २४३ कोटी व एकूण खेळते भांडवल ३१९ कोटी इतकी आहे. संस्थेचे विद्यमा संचालक मंडळ व्हाइस चेअरमन विलास बडगंची, अरुण चिंता, विठ्ठल बडगंची, अरविंद पुडूर, विष्णू म्याकल, नरेंद्र बत्तूल, मल्लिकार्जुन खंडे, शंकर कोंतम, अजय रंगम, चंद्रकांत रंगम, अंबिका उदगिरी, उमा पुडूर विजयकुमार शिंपी, रूपसिंग राठोड, भगवंत फलमारे, ॲड. अंबादास कंदीकोंडा आदींसह समाजाचे अध्यक्ष नागनाथ कोंतम आणि समाजातील सर्व प्रमुख संस्थांचे अध्यक्ष व पदाधिकारी यांनी याचे कौतुक केले.

## सौरउर्जा सामानाच्या चोरी केलेल्या आरोपींची जामिनावर मुक्तता

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२७ फेब्रुवारी-**

सौरउर्जा प्लान्टमधील सामानाच्या चोरीच्या आरोपातुन आरोपींची अक्कलकोट येथील मे. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी एम.एम. कल्याणकर यांनी जामिनावर मुक्तता केली आहे.

यात हकिकत अशी की, दि. १९ नोव्हेंबर २५ रोजी फिर्यादीने वळसंग पोलीस स्टेशन येथे फियादी जबाब दिला होता की, १७ ते १८ नोव्हेंबर रोजी पर्यंत फिर्यादी हे सिक्युरिटी सुपरवायजर म्हणून मौजे आचेगांव (ता. दक्षिण सोलापूर) शिवारातील टाटा पावर सोलर या कंपनीचे १ ते ३२ या ब्लॉकवर फिर्यादी सिक्युरिटी देखरेख करीत होते. त्या दरम्यान सिक्युरिटीगार्ड व इतर काहीजण ड्युटी संपुण घरी गेले. त्यानंतर त्या ठिकाणाचे टेक्नीशियन आल्यानंतर त्यांनी मौजे आचेगांव शिवारातील ब्लॉक नं. १ मधील चोरी झाल्याचे दिसले व तसेच त्या ठिकाणी जावून पाहानी केली असता लाल रंगाच्या आतमध्ये असणाऱ्या तांब्याची केबल कोणीतरी अज्ञात चोरांनी चोरुन नेल्याची खात्री झाली. त्यामुळे फिर्यादीने अज्ञात चोरांविरोधात वळसंग पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आलेला होता.

या गुन्ह्यातील तपासिक अंमलदारांनी येथे आरोपी सागर गेनसिंध्द माळी व अनिल प्रभाकर माळी (दोघे रा. लिंबिचिंचोळी, ता. दक्षिण सोलापूर) यांना २६ फेब्रुवारी २६ रोजी अटक करून दोन दिवसांची पोलीस कस्टडी रिमांड मिळण्यासाठी रिपोर्ट सादर केलेला होता. परंतु त्यांना न्यायालयीन कोठडी दिली होती. आरोपीच्या वतीने जामिन अर्जावर न्यायालयाने सरकार पक्षाचे व तपासिक अंमलदारांचे म्हणणे व आरोपीच्या वकिलांचा युक्तीवाद ग्राह्य धरुन दोन्ही आरोपींचा जामीन अर्ज मंजूर केला. यात सरकार पक्षाच्या वतीने ॲड. कांबळे यांनी तर आरोपींच्या वतीने ॲड. रविराज सरवदे, ॲड. मुश्ताक मणुरे यांनी काम पाहिले.

## दारू पिण्यासाठी पैसे द्या म्हणत मारहाण

**सोलापूर, दि. २७ फेब्रुवारी-**

दारू पिण्यासाठी पैसे द्या म्हणत हाताने व लाथाबुक्याने मारहाण करत जिवे मारतो अशी धमकी दिली. टेबलवर ठेवलेली मूर्ती डोक्यात घालून जखमी केले. यामुळे एकावर विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. याची हकीकत अशी की, २६ फेब्रुवारी बुबासाहेब माणिकराव देशमुख (वय ७६, रा. अंत्रोळीकर नगर) हे झोपले असताना समीर बुबासाहेब देशमुख (वय ५०, रा. अंत्रोळीकर नगर) हा दारू पिऊन घरात आला त्यावेळी आम्हाला दारू पिण्यासाठी पैसे द्या नाहीतर मी सगळ्यांना मारतो, असे म्हणाल्यावर समीर याने हाताने व लाथाबुक्याने मारहाण करून जिवे मारण्याची धमकी दिली. तेव्हा बुबासाहेब यांचा लहान मुलगा सचिन हा भांडण सोडविण्यासाठी आला असता त्याला देखील खाली ढकलून देऊन बुबासाहेब यांच्या डोक्यात टेबलवर ठेवलेली मूर्ती डोक्यात घालून जखमी केले. पुढील तपास बहिजे करीत आहेत.

## लघु उद्योजक जिल्हा पुरस्कार : ४ मार्चपर्यंत अर्ज करा

**सोलापूर, दि. २७ फेब्रुवारी-**

जिल्ह्यातील उद्योग क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या लघु उद्योजकांना महाराष्ट्र शासनामार्फत जिल्हा लघु उद्योग पुरस्कार देण्यात येणार असून इच्छुक उद्योजकांनी ४ मार्चपर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक उ. सु. दंडगव्हाळ यांनी केले आहे. या पुरस्कारांतर्गत प्रथम क्रमांकाच्या उद्योजकास रुपये १५ हजार रोख रक्कम, द्वितीय क्रमांकास रुपये १० हजार रोख रक्कम देण्यात येणार आहे. यापुरस्कारासाठी अर्ज करणारा उद्योग घटक किमान मागील तीन वर्षांपासून उद्यम नोंदणीकृत असावा व उत्पादन सुरू असणे आवश्यक आहे. संबंधित उद्योग कोणत्याही वित्तीय संस्थेचा थकबाकीदार नसावा.

**सोलापूर महानगरपालिका**
**जाहीर टेंडर नोटीस**

या विभागाकडून अल्पसंख्याक बहुल क्षेत्रात विकास कामे करणे सन २०२५-२६ योजने अंतर्गत प्र.क्र.। २२ जन्नतुल फिरदोस कब्रस्तार येथे रस्ते क्रॉंक्रीटीकरण करणे या विकास कामाचे निविदा प्रसिध्द करण्यात आले आहे.

1) 2026_SMC_1279923_1

सदर कामाचा तपशील www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर दि. २०/०२/२०२६ ते ०२/०३/२०२६ पर्यंत पाहण्यास उपलब्ध आहे.

सही/-
(सारिका आकुलवार)
प्र.नगर अभियंता
सोलापूर महानगरपालिका

## बेशुध्द अवस्थेत आढळलेल्या पती-पत्नीचा मृत्यू

**सोलापूर, दि. २७ फेब्रुवारी-**

राहत्या घरी पती-पत्नी तोंडाला फेस येऊन बेशुद्ध अवस्थेत आढळून आले. ही घटना सोलापूर शहरात दिनांक २७ फेब्रुवारी रोजी घडली. त्या दोघांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले असता उपचारापूर्वी त्यांचा मृत्यू झाला. यात हकीकत अशी की, सोमनाथ धानाप्पा पाटील वय ४०, श्रीदेवी सोमनाथ पाटील वय ३५ राहणार शिरपन हळ्ळी तालुका दक्षिण सोलापूर जिल्हा सोलापूर सध्या राहणार कलावती नगर सोलापूर या राहत्या घरी तोंडाला फेस येऊन बेशुद्ध अवस्थेत मिळून आल्या. त्या दोघांना नागनाथ पाटील यांनी उपचारासाठी शासकीय रुग्णालय सोलापूर येथे दाखल केली असता उपचारापूर्वी त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले अशी नोंद सिव्हिल पोलीस चौकीत झाली आहे.

**अपर तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी मंद्रूप ता. दक्षिण सोलापर यांचे न्यायालयात**

दूरध्वनी क्र. (०२१७) २२५५५५१ Email-tahmandrup@gmail.com
जा.क्र.जमीनबाब/जन्म-मृत्यू दाखला/एस.आर-२५९/२६ मंद्रूप, दि: २६/०२/२०२६

**जाहीर प्रसिध्दीकरण**

श्री. चाँदसाब गुलाब कोतवाल, वय-३२ वर्षे, व्यवसाय-शेती. रा. गिरगाव, ता.जत, जि. सांगली. **--अर्जदार**

**विरूध्द**

निबंधक, जन्म-मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी कुसूर ता.दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर. **--सामनेवाला**

ज्याअर्थी, यातील अर्जदार श्री. चाँदसाब गुलाब कोतवाल, रा.गिरगाव, ता.जत, जि. सांगली येथील कायम रहिवासी असून त्यांचा मुलगा यासीन चाँदसाब कोतवाल याचा जन्म दि.२१/०७/२००७ रोजी गाव-कुसूर, ता.दक्षिण सोलापूर येथे राहत्या घरी झालेला आहे. तथापि सदर जन्माची नोंद सामनेवाला यांचेकडे जन्म रजिस्टरला झालेली नाही. तरी सदर जन्माची नोंद होवून तसा जन्म दाखला मिळणेकामी जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम २०२३ चे कलम १३(२) (३) अन्वये सामनेवाला यांना आदेश होणेकामी इकडील न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी, तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविणेत येते की, श्री. चाँदसाब गुलाब कोतवाल, यांचा मुलगा यासीन चाँदसाब कोतवाल याचा जन्म दाखला मिळणेकामी कोणाची काही हरकत असल्यास अथवा सदर अर्जाचे पृष्ठ्यर्थ अथवा विरूध्द कोणाचे काही म्हणणे असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १५ दिवसांच्या आत इकडील न्यायालयात स्वतः अथवा आपल्या विधिज्ञामार्फत सबळ पुराव्यानिशी हजर राहून आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाचीही काही हरकत अथवा म्हणणे न आल्यास कोणाचीही काहीही हरकत नाही, असे समजून अर्जाच्या चौकशीअंती यासीन चाँदसाब कोतवाल याच्या जन्म तारखेची नोंद होऊन तसा जन्म दाखला देण्याचा आदेश कुसूर ग्रामपंचायतीस देण्यात येईल. मुदतीनंतर येणाऱ्या हरकती, तक्रारी अथवा म्हणणे विचारात घेतले जाणार नाही.

हे आज दि. २६/०२/२०२६ रोजी आमचे सहीने व कोर्टाच्या शिक्याने प्रसिध्दी केले असे.

शिक्का

सही/-
(विष्णू बुटे)
अपर तहसिलदार तथा
तालुका कार्यकारी दंडाधिकारी मंद्रुप
ता. दक्षिण सोलापूर.

**मध्य रेल्वे**
सोलापूर विभाग
**एसी कोचमध्ये लिनेन वितरण परिचारिका**

निविदा सूचना क्रमांक GEM/2026/B/7285174 दिनांक-२६.०२.२०२६. भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने डीआरएम(एम) चे कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर खालील कामांसाठी नामांकित कंपन्या/कंत्राटदारांकडून सीलबंद निविदा मागवत आहे. कामाचे नाव : सोलापूर विभागातील सोलापूर आणि कलबुर्गी कोचिंग डेपोच्या प्राथमिक देखभाल केलेल्या गाड्यांमध्ये एसी कोचमध्ये लिनेन वितरण अटेंडंटसाठी कंत्राटी काम. निविदा प्रणाली: दोन पॅकेट प्रणाली. कामाची अंदाजे किंमत: ३,९५,१८,८१५.८४/-. निविदा फॉर्मची किंमत: शून्य निविदा फॉर्म जिथून खरेदी करता येईल त्या कार्यालयाचा पत्ता: डीआरएम(एम) चे कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर. जमा करावयाची बयाणा रु. ३,४७,६००/-. काम पूर्ण करण्याचा कालावधी : काम सुरू झाल्यापासून १ वर्ष आणि ८ महिने. निविदा सादर करण्याची तारीख आणि वेळ : २०.०३.२०२६ दुपारी १२.०० वाजता. निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ : २०.०३.२०२६ दुपारी १२.३० वाजता. वेबसाइट तपशील आणि सूचना फलक असलेले ठिकाण जिथे निविदेची संपूर्ण माहिती पाहता येईल: www.GeM.gov.in

Akar/Sur-12 सीनियर डीएमई/सोलापूर

सुरक्षित प्रवास करा, पायी प्रवास करणे टाळा

**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.
**SRM E-Tender (1st call) Notice**

Digitally signed online bids are invited through E-tender process of MSETCL in two-bid system from bidders who are registered Contractors of MSETCL. **RFx No. 7000039015 E-Tender No. EE/400kV/R.S/DN/LBT/E-Tender:04/2025-26, (1st call) Particulars:** Work of double jumpering work (Bypass Jump) by providing and fixing of boltless C Type Wedge connector to the 400kV Parli - Karjat Ckt-I & Ckt-II & 400kV Karad PG line. **Estimated cost:** Rs. 48,77,768/- **E.M.D. (Approx. 1% of est. cost):** Rs. 48,777/- **Tender cost** in Rs. 500.00 + GST, **Sale period:** 26.02.2026 to 15.03.2026, **Last Date of Submission:** 15.03.2026 up to 23:59 Hrs, **Date of opening (Tech. bid):** 16.03.2026 at 12:00 Hrs. (If possible).
**Contact person:** Executive Engineer -8554995014. For further details
**Subsequent call intimations (2nd/3rd calls, if any) will not be re-published in newspapers and will only be available on the e-tender portal: please visit.**
**1) https://srmetender.mahatransco.in.**
**2) https://mahatransco.in**
**Note:** All eligible Supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E-enquiry (New) portal of MSETCL.

Sd/-
Executive Engineer
400 kV R.S. Div Lamboti

**महापारेषण**
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित
**सूचना**

सुशिक्षित बेरोजगार अभियंता (स्था) यांना लॉटरी पद्धतीने कामे वाटपाची योजना महापारेषण कंपनीचे परिपत्रक MSETCL/CO/TRO&M/SE-II/EE-VIII/12883 Dt 05.12.2016 अन्वये लागू केली आहे. सदर परिपत्रकाला अनुसरून अधीक्षक अभियंता (स्था), अउदा, स्था.बां.नि.सु.मंडळ, महापारेषण पुणे या कार्यालयामध्ये सुशिक्षित बेरोजगार अभियंता (स्था) यांची नोंदणी व नूतनीकरण सुरु आहे. सदरील ई–प्रकटन हे दिनांक १९.०२.२०२६ पासून दिनांक २७.०२.२०२६ पर्यंत कंपनीच्या संकेत स्थळावर व तसेच स्थापत्य कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रसिद्धीसाठी देण्यात आले होते. परंतु यात मुदतवाढ ही अंतिम दिनांक ०६.०३.२०२६ पर्यंत करण्यात आली आहे. या योजनेमध्ये भाग घेऊ इच्छिणाऱ्या सुशिक्षित बेरोजगार अभियंता (स्था) यांनी नमूद केलेल्या कागदपत्रांसोबत नोंदणी मागणीचा अर्ज अंतिम दिनांक ०६.०३.२०२६ पर्यंत अथवा त्यापूर्वी या कार्यालयात प्रत्यक्ष जमा करावा.कृपया याची नोंद घ्यावी.

For further details visit our website **http://mahatransco.in**

सही/–
अधीक्षक अभियंता (स्था), (प्र)
अउदा स्था.बां.नि.सु. मंडळ, पुणे

**जाहीरनामा/जाहिर प्रसिध्दीकरण**

ॲड. प्रसाद कि. अग्निहोत्री
दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १०१/२०२६.
निशाणी क्र.

**सोलापूर येथील मे. दिवाणी न्यायाधीश व. स्तर सो। (श्री. ओ. एस. पाटील साहेब) यांचे न्यायालयात**

१) भाग्यश्री भिमाशंकर तेली
उर्फ गुरुबाई भिमाशंकर तेली
वय ५० वर्षे, धंदा घरकाम
रा. ८९ ओम नमः शिवाय नगर, नॉर्थ सोलापूर, सोलापूर.
२) सिध्दाराम भिमाशंकर तेली
वय २९ वर्षे, धंदा नोकरी
रा. ८९ ओम नमः शिवाय नगर, नॉर्थ सोलापूर, सोलापूर. -- **अर्जदार**
३) रूपेश भिमाशंकर तेली
वय २० वर्षे, धंदा शिक्षण
रा. ८९ ओम नमः शिवाय नगर, नॉर्थ सोलापूर, सोलापूर.
४) वैभवी भिमाशंकर तेली
लग्नानंतरचे नाव : वैभवी दिपक तेली
वय २४ वर्षे, धंदा घरकाम
रा. ८९ ओम नमः शिवाय नगर, नॉर्थ सोलापूर, सोलापूर.
सध्या रा. प्लॅट नं. २०१, सिध्दी बिल्डींग निअर
नाना-नानी गार्डन, ४० फुट रोड, झेड कॉर्नर, मांजरी, पुणे.

**विरूध्द**

**कोणी नाही** **--सामनेवाला**

ज्याअर्थी यातील अर्जदारांनी कै भिमाशंकर कुलप्पा तेली यांचे दि. १९/११/२०२५ रोजी निधन झालेमुळे त्यांचे कायदेशीर वारसदार अर्जदार क्र. १ ते ४ हेच असल्याने वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी विनंती केली आहे. कै. भिमाशंकर कुलप्पा तेली हे त्यांचे हयातीत संगमेश्वर महाविद्यालय सोलापूर येथे कार्यरत होते. तथापि, कै. भिमाशंकर कुलप्पा तेली यांच्या नावे असलेली संगमेश्वर महाविद्यालयामधील रक्कम मिळणेसाठी व इतर त्यांचे नावे असलेली रक्कम त्यांचे वारसांना मिळणे गरजेचे आहे. सदरील रक्कमा कायदेशीर वारस म्हणून यातील अर्जदारांना मिळणे गरजेचे व जरूरीचे आहे. त्याकरीता अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र (Certificate) मिळण्यासाठी सदरचा अर्ज मे. न्यायालयात केला आहे.

त्याअर्थी मयत कै. भिमाशंकर कुलप्पा तेली यांच्या पश्चात वर नमुद रक्कमा संदर्भात तसेच वारसासंबंधी इतर कोणाचा हक्क हितसंबंध असलेस किंवा सदर प्रमाणपत्र त्यांचे नावे देण्यास कोणतीही हरकत असल्यास त्यांनी सदर जाहीर प्रसिध्दीकरणापासून ३० दिवसाचे आत किंवा पुढील नेमलेली तारीख ०१/०४/२०२६ रोजी सदरकामी स्वतः अथवा वकीलामार्फत हजर राहून आपले म्हणणे व लेखी हरकत लेखी स्वरूपात पुराव्यानिशी दाखल करावी. वर नमुद मुदतीत कोणाची काही हरकत वा म्हणणे आले नाही तर अर्जातील विनंतीप्रमाणे वारस प्रमाणपत्र देण्यास कोणाची काही हरकत नाही असे समजून यातील अर्जदाराचे अर्जाप्रमाणे गुणवत्तेवर आधारित पुढील निर्णय घेण्यात येईल.

कळावे., हे जाहीर प्रसिध्दीकरण मे. कोर्टाचे सही व शिक्याने दिले आहे.
दि. २६/०२/२०२६

सही/-
लिपीक
सि.जे.सि.डी. सोलापूर.

शिक्का

सही /-
सहाय्यक अधिक्षक सि.ज.सि.डी.सो.

**जाहीर लिलाव**
**सुमित्रा ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या..**
**अकलूज, ता. माळशिरस, जि. सोलापूर**

तमाम लोकांस/जनतेस कळविण्यात येते की, खालील नमूद केलेल्या थकबाकीदार/जामीनदारांकडून सुमित्रा ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या., अकलूज, ता. माळशिरस, जि. सोलापूर या संस्थेच्या थकबाकी वसुलीपोटी त्यांच्या नावासमोर नमूद केलेल्या त्यांच्या मालकीची स्थावर मालमत्ता महाराष्ट्र सहकारी कायदा १९६० व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ च्या नियम १०७ (१०) अन्वये जात केलेली आहे. सदरहू मिळकत खाली नमूद केलेल्या दिवशी ठिकाणी खाली सही करणारे वसुली व विक्री अधिकारी सुमित्रा ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या., अकलूज, ता. माळशिरस जि.सोलापूर यांचे समक्ष 'जसे आहे तसे' या तत्वानुसार जाहीर लिलावाने विक्री करण्यात येईल.

| अ. नं. | कर्जदार/ जामीनदाराचे नांव | पत्ता | मिळकतदाराचे नांव | मिळकत ठिकाण | मिळकत क्र. | क्षेत्र हे.आर/ चौ.मी. | दि. २८/२/२६ अखेर येणे बाकी | लिलाव दि. व वार |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सुजाता प्रमोद क्षीरसागर<br>जा. १. किर्ती प्रमोद क्षीरसागर<br>२. जैनुद्दीन अकबर शेख<br>३. अनिल विनायक माने | अकलूज<br>अकलूज<br>अकलूज<br>अकलूज | प्रमोद बाबुराव क्षीरसागर (संमतीदार) | अकलूज | ९६/१ /ब /२/ प/५ | १८५.९७.00 हे. आर. चौ.मी. | ६८८५३० | ३०/३/२६ सोमवार वेळ ११.00 ते ३.00 |
| २ | सौ. महानंदा नागनाथ जमदाडे<br>जा. १. शांतय्या इरय्या हिरेमठ<br>२. शिवानंद धोंडीराम खताळ | महाळुंग<br>अकलूज<br>२१ चारी माळीनगर | महानंदा नागनाथ जमदाडे | महाळूंग ता. माळशिरस | ८७५/१<br>८८७/१ | १.६0. हे. आर.<br>0.५७ हे. आर. | २३४५९१८ | ३०/३/२६ सोमवार वेळ ११.00 ते ३.00 |
| ३ | राजेंद्र नागनाथ जमदाडे (मयत) वारस महानंदा नागनाथ जमदाडे नागनाथ माधव जमदाडे<br>जा.१. हनुमंत निवृत्ती यादव<br>२. धोंडीराम महादेव खताळ | महाळूंग<br>बिजवडी<br>२१ चारी माळीनगर | महानंदा नागनाथ जमदाडे व नागनाथ माधव जमदाडे | महाळूंग | ८७५/२ | ३.00 हे. आर. | २१९८१५६ | ३०/३/२६ सोमवार वेळ ११.00 ते ३.00 |
| ४ | श्री. माधव तुकाराम जमदाडे (मयत) वारस<br>१. सुशिला माधव जमदाडे<br>२. नागनाथ माधव जमदाडे<br>३. भानुदास माधव जमदाडे<br>४. सखुबाई दादाराव कौलगे<br>५. शांताबाई मधुकर कौलगे<br>६. विमल सुनिल माने<br>७. बबीता विलास शिंदे<br>जा.१. महानंदा नागनाथ जमदाडे<br>२. शिवानंद धोंडीराम खताळ | महाळूंग<br>महाळूंग<br>२१ चारी माळीनगर | १. सुशिला माधव जमदाडे<br>२. नागनाथ माधव जमदाडे<br>३. भानुदास माधव जमदाडे<br>४. सखुबाई दादाराव कौलगे<br>५. शांताबाई मधुकर कौलगे<br>६. विमल सुनिल माने<br>७. बबीता विलास शिंदे | महाळूंग | ८८७/२ | ३.00 हे. आर. | २३०८४५१ | ३०/३/२६ सोमवार वेळ ११.00 ते ३.00 |

**लिलावाचे ठिकाण :-** सुमित्रा ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या., अकलूज, ता. माळशिरस, जि. सोलापूर या ठिकाणी होईल.
**टिप :-** लिलावाच्या अटी व शर्ती संस्थेच्या कार्यालयात पहावयास मिळतील.
कोणत्याही कारणाशिवाय लिलाव रद्द व तहकूब करण्याचा अधिकार वसुली अधिकारी यांनी राखून ठेवला आहे.

दिनांक :- २८/०२/२०२६
ठिकाण : अकलूज

शिक्का

सही/ -
वसुली व विक्री अधिकारी
सुमित्रा ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या.,
अकलूज, ता. माळशिरस, जि. सोलापूर



## महत्त्वाचे

### बुमराह, सिराजकडून कौशल्य शिकतोय : अर्शदीप

**चेन्नई :** मी अजूनही गोलंदाजीच्या कलेच्या बारकावे शिकत आहे. वरिष्ठ गोलंदाज जसप्रीत बुमराह, मोहम्मद सिराज आणि मॉर्न मॉर्केल यांच्याकडून अनुकूलता आणि फलंदाजांपेक्षा पुढे राहण्याच्या कौशल्यावर काम करीत आहे, असे भारताचा वेगवान गोलंदाज अर्शदीप सिंग म्हणाला टी-२० विश्वचषक सुपर एट सामन्यात अर्शदीपने केवळ २४ धावा देऊन तीन बळी घेतले व झिम्बाब्वेच्या फलंदाजांवर संकट ओढवले. मी गोलंदाजी विभागात सर्वात तरुण आहे. जर तुम्हाला पॉवर प्लेमध्ये दोन षटके टाकण्याची संधी मिळाली तर तुम्हाला भरपूर विकेट्स मिळण्याची शक्यता आहे, कारण फलंदाज त्यावेळी धावा काढण्यासाठी घाई करतात, असे अर्शदीप म्हणाला.

## रिंकू सिंगला पितृशोक



खानचंद सिंग

**ग्रेटर नोएडा :** भारतीय क्रिकेटपटू रिंकू सिंगचे वडील खानचंद सिंग यांनी शुक्रवारी सकाळी ग्रेटर नोएडा येथील यथार्थ रुग्णालयात अखेरचा श्वास घेतला, अशी माहिती रुग्णालयाच्या जनसंपर्क अधिकाऱ्यांनी दिली. रिंकूचे वडील चौथ्या टप्प्यातील कर्करोगाशी झुंजत होते. खानचंद सिंग प्रगत अवस्थेतील यकृताच्या कर्करोगाशी झुंजत होते. अलिकडच्या काही दिवसांत त्यांची प्रकृती बरीच खालावली होती, त्यानंतर त्यांना २१ फेब्रुवारी रोजी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यांना जीवनरक्षक प्रणालीवर ठेवण्यात आले होते आणि आज सकाळी त्यांनी अखेरचा श्वास घेतला, असे रुग्णालयाचे प्रवक्ते डॉ. सुनील कुमार यांनी सांगितले. रिंकूचे माजी प्रशिक्षक मसूद अमिनी यांनी त्यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला. खानचंद सिंग यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार अलिगड येथे केले जातील आणि रिंकू उद्या अंत्यसंस्कारात सहभागी होईल असे कुटुंबीयांनी सांगितले. दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या भारताच्या पहिल्या सुपर ८ सामन्यानंतर वडिलांची प्रकृती बिघडल्याने रिंकूला टी-२० विश्वचषक संघातून घरी परतावे लागले. कुटुंबासोबत राहण्यासाठी त्याला घाईघाईने घरी जावे लागले.

## अभिषेकचा बचावात्मक खेळ पाहून आश्चर्य वाटले : गावस्कर

**नवी दिल्ली :** अभिषेक शर्माला बचावात्मक स्ट्रोक खेळताना पाहून आश्चर्य वाटले, असे भारताचे माजी कर्णधार सुनील गावस्कर म्हणाले. त्याने टी-२० विश्वचषकात झिम्बाब्वेविरुद्ध वेळेवर अर्धशतक झळकावून टीकाकारांची तोंडे बंद केल्याबद्दल धडाकेबाज सलामीवीराचे कौतुक केले. पोटाच्या दुखण्यावरून परतल्यानंतर अभिषेक त्याच्या वर्चस्वाच्या सावलीतून दूर गेला व तो सलग तीन वेळा शून्यावर बाद झाला. तथापि, अभिषेकने झिम्बाब्वेविरुद्ध भारताच्या ७२ धावांच्या विजयात ३० चेंडूत ५५ धावा करत फॉर्ममध्ये परतण्याचे संकेत दिले. अभिषेक शर्मा फलंदाज म्हणून किती चांगला आहे, याची आपल्याला कल्पना आहे. झिम्बाब्वेविरुद्ध ५५ धावांच्या या खेळीने त्याने आपल्या टीकाकारांना शांत केले, असे गावस्कर म्हणाले. त्याने आपला डाव सुरू करण्यासाठी तो अतिरिक्त वेळ घेतला. त्याच्या फलंदाजीत एक पद्धत होती. तो ऑफ स्पिनरचा आदर करत असे, कोणत्याही प्रकारची जोखीम घेत नसे आणि शांत आणि संयमी पद्धतीने खेळत असे, सेही ते म्हणाले.

## महाराष्ट्र, भारतीय रेल्वे अंतिम फेरीत

**वडोदरा :** येथील सामा इनडोअर क्रीडा संकुलात सुरू असलेल्या ७२ व्या राष्ट्रीय वरिष्ठ पुरुष कबड्डी स्पर्धेत महाराष्ट्र व भारतीय रेल्वेने आपापल्या प्रतिस्पर्धी संघांवर वर्चस्व गाजवून स्पर्धेच्या अंतिम फेरीत धडक मारली. उपांत्य फेरीच्या सामन्यात महाराष्ट्राने उत्तर प्रदेशवर ४९-३६ असा १३ गुणांनी विजय मिळविला, तर रोमांचक ठरलेल्या दुसऱ्या उपांत्य सामन्यात भारतीय रेल्वेने चंदीगडवर ३८(७)-३८-४) असा विजय मिळविला. त्यापूर्वी, उपांत्यपूर्व फेरीच्या सामन्यात गतविजेत्या सर्व्हिसेसला उत्तर प्रदेशकडून ५१-५५ असा पराभवाचा धक्का सहन करावा लागला. याबरोबरच सर्व्हिसेसचे स्पर्धेतील आव्हान संपुष्टात आले. महाराष्ट्राने हिमाचल प्रदेश संघावर ५३-३८ असा विजय नोंदवून उपांत्य फेरी गाठली. भारतीय रेल्वेने बिहार संघाचा ४०-२२ असा १८ गुणांनी पराभव केला. चंदीगडने तामिळनाडूवर ३९-३४ असा पाच गुणांनी रोमहर्षक विजय नोंदवून उपांत्य फेरी गाठली होती. या चार दिवसांच्या स्पर्धेत ३१ संघांचे ४०० हून अधिक खेळाडू सहभागी झाले.

# आमचे दक्षिण आफ्रिका-विंडीज सामन्यावर लक्ष होते : हार्दिक पांड्या

**कोलकाता, २७ फेब्रुवारी**

आम्ही आयसीसी पुरुष टी-२० विश्वचषक स्पर्धेच्या उपांत्य फेरीत स्थान मिळविण्यासाठी संघ इतर सामन्यांकडे, विशेषतः दक्षिण आफ्रिका-वेस्ट इंडीजदम्यानच्या सामन्यावर लक्ष देत होतो, असे भारताचा अष्टपैलू खेळाडू हार्दिक पांड्या याने सांगितले.



चेन्नईमध्ये भारताने झिम्बाब्वेवर ७२ धावांनी विजय मिळवल्यानंतर आम्ही स्वतःच्या सामन्यापूर्वी दक्षिण आफ्रिकेच्या वेस्ट इंडीजविरुद्धच्या सुपर एट सामन्यावर बारकाईने लक्ष ठेवून होतो, असे हार्दिकने मान्य केले.

आम्ही दुसऱ्या सामन्यावर लक्ष ठेवूनही आमचे मुख्य लक्ष स्वतःच्या कामगिरीवर आहे, असे तो म्हणाला. आता सर्व काही चांगले क्रिकेट खेळणे, तुमच्या कौशल्याचा आधार घेणे, दबाव सहन करणे आणि तुम्ही सर्वोत्तम पाऊल पुढे टाकता याची खात्री करणे याबद्दल आहे, असे तो म्हणाला.

दक्षिण आफ्रिकेने वेस्ट इंडीजवर विजय मिळवल्यानंतर, त्यांनी उपांत्य फेरीत आपले स्थान निश्चित केले.

याचा अर्थ आता भारत आणि वेस्ट इंडीज रविवारी उपांत्यपूर्व सामना सामना खेळतील.

दक्षिण आफ्रिकेने भारताचा ७६ धावांनी पराभव केल्याने, नंतरच्या संघाच्या नेट रन रेटला मोठा फटका बसला. शिवाय, सुपर ८ च्या पहिल्या सामन्यात वेस्ट इंडिजने झिम्बाब्वेचा १०७ धावांनी पराभव केला.

त्यामुळे, वेस्ट इंडीजने दक्षिण आफ्रिकेविरुद्ध विजय मिळवल्याने त्यांचा नेट रन रेट आणखी वाढला असता. सामना गमावल्यामुळे, भारताला आता पुढे जाण्यासाठी वेस्ट इंडीजला कोणत्याही फरकाने पराभूत करावे लागेल.

(वृत्तसंस्था)

# श्रीलंका विजयाने शेवट करू इच्छितो

**कॅण्डी, २७ फेब्रुवारी**

आयसीसी टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत शनिवारी पल्लेकेले आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर गट २ मधील श्रीलंका आणि पाकिस्तान यांच्यादरम्यान सुपर एट सामना खेळला जाणार आहे.

पाकिस्तानसाठी हा सामना महत्त्वाचा आहे, त्यांना अद्याप सुपर एटचा एकही सामना जिंकता आलेला नाही आणि त्यांना उपांत्य फेरीच्या आशा जिवंत ठेवण्यासाठी श्रीलंकेवर विजय मिळवणे आवश्यक आहे. तिकडे आधीच स्पर्धेच्या बाहेर झालेला दासून शनाकाचा श्रीलंका संघ विजयाने गोड शेवट करू इच्छित आहे.

सध्या गट २ मध्ये इंग्लंड ४ गुणांसह अव्वल स्थानावर, तर न्यूझीलंड ३ गुणांसह दुसऱ्या स्थानावर आहे. रद्द झालेल्या सामन्यातून मिळालेल्या एका गुणावर पाकिस्तान तिसऱ्या स्थानावर आहे, तर श्रीलंकेने आतापर्यंत आपले दोनही सामने गमावले असून शून्यासह गटात तळाच्या स्थानी आहे. सह-यजमान श्रीलंकेचे आधीच स्पर्धेतील आव्हान संयुष्टात आले आहे.



दासून शनाका



सलमान आगा

सलमान अली आगाच्या नेतृत्वाखाली पाकिस्तान संघाचा सुपर एटमध्ये खडतर प्रवास झाला आहे. न्यूझीलंडविरुद्धचा सामना पावसामुळे रद्द झाल्यानंतर त्यांचा इंग्लंडकडून दोन गड्यांनी पराभव झाला.

केवळ एक गुण आणि -०.४६१ च्या नेट रन रेटसह त्यांना श्रीलंकेविरुद्ध विजय मिळवावा लागेल आणि उपांत्य फेरीत प्रवेश मिळवण्यासाठी इंग्लंडच्या न्यूझीलंडवर विजयाची आशा करावी लागेल. विशेष म्हणजे, जर शुक्रवारी न्यूझीलंडने इंग्लंडला हरवले तर पाकिस्तानच्या उपांत्य फेरीच्या आशा पूर्णपणे धुळीस मिळतील. दुसरीकडे, श्रीलंका आधीच स्पर्धेतून बाहेर पडला आहे. आयर्लण्ड, ओमान व ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या विजयांसह गट साखळी फेरीत चांगली कामगिरी करूनही, त्यांना सुपर एटमध्ये संघर्ष करावा लागला. सुपर एटमध्ये श्रीलंकेचा संघ इंग्लंडकडून ५१ धावांनी व नंतर न्यूझीलंडकडून ६१ धावांनी पराभूत झाला. तथापि, दासुन शनाकाच्या संघाला स्पर्धेचा शेवट गोड करायचा असेल, तर आपले सर्व कौशल्य पणाला लावावे लागणार आहे.

(वृत्तसंस्था)

**आजचा सुपर एट सामना**

**श्रीलंका वि. पाकिस्तान**

**स्थळ :** कॅण्डी

**वेळ :** सायं. ७.०० वाजतापासून

**थेट प्रसारण :** स्टार स्पोर्ट्सवर

# जम्मू-काश्मीर रणजी सामन्यात इतिहास रचण्याच्या उंबरठ्यावर

**हुबळी :** पारस डोग्राच्या नेतृत्वाखालील जम्मू-काश्मीरचा संघ रणजी करंडकात इतिहास घडविण्याच्या उंबरठ्यावर आहे. प्रथमच स्पर्धेची अंतिम फेरी गाठणाऱ्या जम्मूकाश्मीरने कर्नाटकविरुद्धच्या अंतिम सामन्यात पहिल्या डावांत ५८४ धावांचा डोंगर उभा केला, मात्र प्रत्युत्तर देताना आठ वेळच्या विजेत्या कर्नाटकला चौथ्या दिवशी ९३.३ षटकांत सर्वबाद २९३ धावांपर्यंतच मजल मारता आली. त्यामुळे जम्मू काश्मीरने पहिल्या डावांत २९१ धावांची आघाडी मिळविली आणि दिवस अखेर दुसऱ्या डावांत ५७ षटकांत ४ बाद १८६ धावा नोंदविल्या. सध्या जम्मू-काश्मीर ४७७ धावांनी आघाडीवर आहे.





### राष्ट्रीय मानांकन लॉन टेनिस स्पर्धा : दुहेरीत सोलापूरचे ओक, पुलगम विजेते

# एकेरीत समायरा ठाकूर, आशय राणे अजिंक्य

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २७ फेब्रुवारी-**

महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस संघटना पुरस्कृत व अखिल भारतीय लॉन टेनिस संघटनेच्या अधिपत्याखाली १२ वर्षाखालील राष्ट्रीय मानांकन लॉन टेनिस स्पर्धेत एकेरीत पुण्याच्या समयरा ठाकूर व ठाणेच्या आशय राणे यांनी अजिंक्यपद पटकाविले. दुहेरीत सोलापूरचे गार्गी ओक व आव्यान पुलगम यांनी पार्टनरच्या साथीत विजेतेपदाचा मान मिळविला.

कुमठा नाका येथील जिल्हा क्रीडा संकुलात झालेल्या या स्पर्धेत मुलींच्या एकेरी गटाच्या अंतिम सामन्यात प्रथम मानांकित पुण्याच्या समायरा ठाकूरने येथील द्वितीय मानांकित गार्गी ओकचा ६-२ , ६-१ असा पराभव केला. मुलांच्या अंतिम सामन्यात ठाण्याच्या आशय राणेने पुण्याच्या श्रेयस चोटूरमहल चा ६-४, ६-३ असे नमविले.

मुलींच्या दुहेरी गटाच्या अंतिम सामन्यात सोलापूरच्या गार्गी ओकने पुण्याच्या समयरा ठाकूरच्या साथीत पुण्याच्या इशीता पाटील (पुणे) सांघवी धात्रक (मुंबई) यांच्यावर १-६ ६-१ , १०-६ अशी मात केली. मुलांच्या दुहेरी गटात आव्यान पुलगम (सोलापूर) व श्रेयस चोटमहल (पुणे) या बिगर मानांकित जोडीने आशय राणे (ठाणे) व विवान गांधी (मुंबई) या जोडीचा अत्यंत अटीतटीच्या सामन्यात टायब्रेकर मधे ६-१ , ४-६ , १०-५ असा पराभव केला.

स्पर्धेतील विजेत्या व उपविजेत्या खेळाडूंना सिनेअभिनेत्री काश्मीरा सुमित रंजन यांच्या हस्ते प्रमाणपत्र व चषक देऊन गौरविण्यात आले. याप्रसंगी डॉ. मोहिनी ताकटे , संध्याराणी बंडगर, तेजल कुलकर्णी उपस्थित होते. सूत्रसंचालन मानस सचिव राजीव देसाई यांनी केले.

# 'जिंकलो, पण प्रश्न अजून बाकी!'

**अखेर एक अडथळा पार पाडला. झिंबाब्वेला ७२ धावांनी हरवलं. पण खरं सांगू, संपूर्ण समाधान नाही झालं. सामना आपण जिंकलो, निर्विवाद जिंकलो, पण काही प्रश्नांची उत्तरं अजून सापडली नाहीतच. नाणेफेक जिंकून आपल्याला फलंदाजीला आमंत्रित करण्याचा सिकंदर रजा चा निर्णय अनाकलनीय होता. या आधीच्या सामन्यातच वेस्टइंडीज कडून सपाटून मार खाल्लेला असताना नाणेफेक जिंकून सिकंदर आपल्याला फलंदाजीला बोलावेल असं वाटलं नव्हतं. कदाचित फ्लड लाइट्स मध्ये, दंव पडलेलं असताना गोलंदाजी करणं त्रासदायक ठरेल, असं वाटल्यामुळं त्यानं हा निर्णय घेतला असावा. पण हा निर्णय बूमरँग झाला. फलंदाजीला साथ देणाऱ्या खेळपट्टीवर आपल्या फलंदाजांनी २५६ धावा कुटल्या. धावांचा एवढा मोठा पहाड ओलांडताना झिंबाब्वेची दमछाक होणार हे अपेक्षित होतं. तसं झालंही.**

आता पहिल्या डावातील आपल्या फलंदाजीचा विचार करायचा झाला तर प्रत्येकानं योगदान दिलं हे जरी खरं असलं तरी मोठी खेळी ८० /१०० धावांची कोणी करू शकलं नाही. ब्रुकची पाकिस्तान विरुद्ध शतकी खेळी, मार्करमची विंडीज विरुद्धची ८०+ धावांची खेळी अशी मोठी खेळी आपल्याकडून झाली नाही. संजू १५ चेंडूत २४ धावा, अभिषेक ३० चेंडूत ५५ धावा, ईशानच्या २४ चेंडूत ३८ तर सूर्याच्या तेरा चेंडू ३३ धावा, हार्दिकच्या २३ चेंडूतच नाबाद ५० धावा तर तिलक वर्माच्या १६ चेंडूत नाबाद ४४ धावा. हा धावफलक नक्कीच सुखावणारा आहे पण तो झिंबाब्वे समोर आहे हे विसरून चालणार नाही. ही फलंदाजी म्हणजे, ऑल गन्स ब्लेझिंग अशी होती आणि विश्वचषक जिंकायचा असेल तर इथून पुढे अशीच व्हायला हवी. संजूच्या १५ चेंडूतल्या २४ धावा या कमी वाटत असल्या तरी ही खेळी खूप महत्त्वाची होती त्याने धावांसाठी झगडणाऱ्या अभिषेकला गोलंदाजी समोर लवकर येऊ दिलं नाही. पहिल्या विकेटसाठी पहिल्यांदाच आपली मोठी भागीदारी झाली, ४९ धावांची. आघाडीचे फलंदाज दोघेही डावखुरे असताना ऑफ स्पिनर कडून आक्रमणाची सुरुवात करायची हे डावपेच प्रतिस्पर्धी संघ लढवायचे. झिंबाब्वेला असं करण्यात धोका वाटला. अभिषेक सुरुवातीला चाचपडत होता, पण एकदा जम बसल्यावर त्याने नेहमीच्या थाटात फलंदाजी केली. अभिषेक ला सापडलेला फॉर्म ही मोठी जमेची बाजू. सर्वच फलंदाजांनी आपापली कामगिरी चोखपणे पार पाडली आणि धावांचा एवढा मोठा डोंगर उभा राहिला जो ओलांडणं झिंबाब्वेला शक्यच नव्हतं.

आता पुढचा अध्याय, आपली गोलंदाजी जिने आपल्याला निराश केलं. जीनियस हा शब्द अगदी क्वचित वापरता येतो. बुमराला तो चपखल लागू पडतो, बुमरा जीनियस आहे त्यामुळे बुमराच्या गोलंदाजीवर कुणीही उचलली जीभ लावली टाळ्याला अशी टिप्पणी करू नये. कालही बुमराची गोलंदाजी त्याच्या लौकिकाला साजेशीच झाली. काल अर्शदीपने सगळ्यात प्रभावी मारा केला. हार्दिकची गोलंदाजी ठीक ठाक होती. पण आपल्या फिरकी माऱ्याने निराशा केली असंच म्हणावं लागेल. अक्षरची गोलंदाजी पण ठीक झाली असं म्हणावं लागेल. पण आपलं मुख्य हत्यार वरूण पुन्हा एकदा निष्प्रभ ठरलं. वरूण फलंदाजांना अवघड प्रश्न विचारतोय असं काल वाटलं नाही. अन्यथा तो नक्कीच मिस्टरी स्पिनर आहे. सलग दोन डावातलं त्याचं अपयश हे नक्कीच खटकणारं आहे. मॉर्नी मॉर्केल, गौतम गंभीर यांच्या मार्गदर्शनाखाली विंडीज विरुद्धच्या सामन्याआधी त्याची गोलंदाजी पहिल्यासारखी धारदार होईल. व्हायलाच हवी, आता



इथून पुढचे मस्ट विन सामने जिंकायचे असतील तर! अजूनही कुलदीप हा आपला नंबर एक फिरकी गोलंदाज वाटतो. आता इथून पुढे महत्त्वाच्या सामन्यांमध्ये कुलदीपच्या समावेश व्हायला हवा. एकाच वेळी कुलदीप आणि वरुण यांना खेळवलं तर तो मारा नक्कीच धारदार आणि तिखट असेल. शिवम दुबे, कालचा दिवस शिवम दुबे नक्कीच लवकरात लवकर विसरायचा प्रयत्न करेल. काल त्याने दोन षटकात ४६ धावांचा नजराणा झिंबाब्वेला पेश केला. त्याचे दोन नोबॉलही पडले. इथून पुढे डू ऑर डाय अशा लढती असणार आहेत. अशा सामन्यांमध्ये या असल्या गोलंदाजीला थारा नाही. एकंदरीत बुमरा अर्षदीप वगळता आपली गोलंदाजी बिलो पार वाटली.

**सो बॉईज पुल अप युवर सॉक्स अँड गेट रेडी!**

झिम्बाब्वेचा आघाडीचा फलंदाज बेनेट याचा उल्लेख केला नाही तर तो त्याच्यावर अन्याय होईल. काल सुरुवातीला येऊन तो शेवटपर्यंत नाबाद राहिला त्याचं शतक अगदी थोडक्यात हुकलं, तीन धावांनी. आपल्या सर्व गोलंदाजांचा त्यांनी अगदी सहजपणे सामना केला. बाजी हरली असली तरी बेनेटची ही खेळी जिगरबाज होती.

आता येत्या रविवारी विंडिजला हरवून आपल्याला दिमाखात सेमी मध्ये प्रवेश करायचा आहे. विजयी भव टीम इंडिया!

**- मुकुंद कुलकर्णी**
**मो. ९४२१४५४८८८**



### छत्रपती शिवाजी नाईट कॉलेजच्या

# दोन विद्यार्थ्यांची राष्ट्रीय विद्यापीठ बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ फेब्रुवारी -**

छत्रपती शिवाजी नाईट कॉलेजच्या प्रबुद्धपाल बनसोडे आणि महेश गायकवाड यांची राष्ट्रीय विद्यापीठ बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या अंतर्गत अंतर महाविद्यालयीन बॉक्सिंग स्पर्धा अनगर येथे संपन्न झाल्या. या स्पर्धेत प्रबुद्धपाल याने ६० किलो गटात तर तसेच महेश याने ५० किलो गटात प्रथम क्रमांक प्राप्त केला. त्यानंतर विद्यापीठाच्या वतीने उमा महाविद्यालय पंढरपूर येथे स्पर्धापूर्व प्रशिक्षण शिबिरातून दोघांची कुरुक्षेत्र हरियाणा येथे होणाऱ्या नॅशनल युनिव्हर्सिटी बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड झाली.

या बॉक्सरना प्रा. संतोष गवळी, सोहेल पठाण, प्रा.सचिन गायकवाड यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे मराठा समाज सेवा मंडळाचे अध्यक्ष माजी महापौर मनोहरपंत सपाटे, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर सपाटे,जनरल सेक्रेटरी प्रा. महेश माने विद्यापीठाचे माजी क्रीडा संचालक तथा मराठा समाज सेवा मंडळाचे सदस्य डॉ. सुरेश पवार आणि प्राचार्य डॉ. नितीन मोटे यांनी अभिनंदन करुन नॅशनल स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

## आर्या उमापची महाराष्ट्र एकदिवसीय क्रिकेट संघात निवड

**सोलापूर :** बीसीसीआय अंतर्गत होणाऱ्या राज्य सामन्यासाठी महाराष्ट्राचा अंडर २३ महिला संघात आर्या उमाप हिची यष्टिरक्षक फलंदाज म्हणून निवड करण्यात आली. तीनमार्च पासून पाँडिचेरी येथे सुरू होणाऱ्या या स्पर्धेसाठी महाराष्ट्राच संघ २८ फेब्रुवारीला होईल.



या ठिकाणी महाराष्ट्र संघ झारखंड, विदर्भ, हरियाणा, त्रिपुरा आणि तामिळनाडू या संघाशी लीग सामने खेळेल. त्यानंतरचे पुढील सामने १५ मार्चपासून इंटरनॅशनल स्टेडियम रांची (झारखंड) या ठिकाणी होतील. आर्याचे सोलापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष दिलीप माने, चेअरमन रणजितसिंह मोहिते-पाटील, व्हा. चेअरमन- श्रीकांत मोरे, उपाध्यक्ष प्रकाश भुतडा, मुकुंद जाधव, नितीन देशमुख व संयुक्त सेक्रेटरी धैर्यशील मोहिते पाटील आणि चंद्रकांत रेंबर्सु, स्नेहल जाधव, किरण मणियार, सारिका कुरुलकर, मानसी जाधवांनी अभिनंदन केले.

# मोबाईलचा वापर संयमाने करा; मैदानावर घडवा सुवर्णक्षण!

### 'डेरवण यूथ गेम्स' उद्घाटनप्रसंगी डॉ. चंद्रजीत जाधव यांचे खेळाडूंना मार्गदर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**चिपळूण, दि. २७ फेब्रुवारी-**

डेरवणच्या क्रीडांगणावर जल्लोष, टाळ्यांचा कडकडाट आणि उत्साहाच्या लहरींमध्ये १२ व्या 'डेरवण यूथ गेम्स'चा भव्य श्रीगणेशा झाला! हजारो युवा खेळाडूंच्या उपस्थितीत भारतीय खो-खो महासंघाचे संयुक्त सचिव डॉ. चंद्रजीत जाधव यांनी मोबाईलच्या अतिरेकावर बोट ठेवत मैदानावर चमकण्यासाठी संयम, शिस्त आणि सकस आहार यांचा मंत्र दिला.

'मोबाईलशिवाय समाज शक्य नाही, पण त्याचा किती वापर करायचा हे खेळाडूंनी स्वतः ठरवावे,' असा थेट आणि ठाम संदेश त्यांनी दिला. या उद्घाटन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी उद्योजक कमलेश जोशी, रुणालय संचालिका डॉ. सुवर्णा पाटील, शरयू यशवंतराव, क्रीडा संचालक श्रीकांत पराडकर, अजित गाळवणकर, संदीप तावडे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.





**६ मार्चपर्यंत रंगणार क्रीडा महोत्सवाचा जल्लोष**

एसव्हीजेसीटीच्या क्रीडा संकुलात ता. ६ मार्चपर्यंत अॅथलेटिक्स, बॅडमिंटन, टेबल टेनिस, जलतरण, तिरंदाजी, नेमबाजी, बुद्धिबळ, कॅरम, लंगडी, खो-खो, कबड्डी, मल्लखांब, बास्केटबॉल, फुटबॉल आणि व्हॉलीबॉल अशा विविध खेळांच्या स्पर्धा रंगणार आहेत. मुंबई, पुणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, कोल्हापूर, नाशिक, औरंगाबाद या भागांतून संघ डेरवण येथे दाखल झाले आहेत. सुमारे ७००० खेळाडूंनी सहभाग नोंदवला असून स्पर्धा अटीतटीच्या होण्याची चिन्हे आहेत.यंदा विजेत्यांना १२०० पदके आणि ११५ करंडकांसह रोख पारितोषिके देऊन गौरविण्यात येणार आहे. त्यामुळे प्रत्येक सामना जिंकण्यासाठी संघांमध्ये जबरदस्त चुरस पाहायला मिळणार आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### श्री वर्धमान जैन सार्वजनिक वाचनालयात मराठी राजभाषा गौरव दिन साजरा

**बार्शी, दि. २७ फेब्रुवारी-**

श्री वर्धमान जैन सार्वजनिक तालुका वाचनालय,बार्शी येथे आज कवीवर्य वि.वा. शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांच्या जन्मदिनानिमित्त मराठी राज्यभाषा गौरव दिन साजरा करण्यात आला. प्रथमतः वि.वा. शिरवाडकर यांच्या फोटोचे पुजन वाचनालयाचे अध्यक्ष किशोर श्रीश्रीमाळ, संचालक धिरज कुंकूलोळ, आनंद सुराणा, जैनाश्रमचे सेक्रेटरी दिनेश श्रीश्रीमाळ यांच्या हस्ते करण्यात आले व त्यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी वाचनालयाचे वाचक वर्ग व सभासद तसेच ग्रंथपाल सुरेश यादव, सहा. ग्रंथपाल शीतल लुकडे, क्लार्क विरज पतंगे उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार संचालक धिरज कुंकूलोळ यांनी मानले.



### ‘सिंहगड’ मध्ये मराठी राजभाषा दिन साजरा

**सोलापूर, दि. २७ फेब्रुवारी -**

एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय येथे शुक्रवारी सकाळी मराठी राजभाषा दिन (कवी कुसुमाग्रज जयंती) साजरा करण्यात आला. यावेळी कॅम्पस डायरेक्टर संजय नवले, प्राचार्य डॉ. शंकर नवले, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठचे पीएम उषाचे समन्वयक डॉ. प्रभाकर कोळेकर उद्योगवर्धिनीच्या चंद्रिका चव्हाण, प्रा. सुनिल शाखापुरे आदींची उपस्थिती होती. विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकतेचा आत्मविश्वास वाढवणारा ‘बूटकॅम्प फॉर इनोव्हेटर्स’ दोन दिवसीय कार्यक्रमास प्रारंभ झाला. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठच्या नवोन्मेष, उद्योजक घडवणूक आणि संलग्नता विभाग या विभागाच्या वतीने तसेच एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय यांच्या सहकार्याने पार पडत आहे.

### पांढरीत शिवजयंतीनिमित्त व्याख्यान

**पांगरी, दि. २७ फेब्रुवारी -**



बार्शी तालुक्यातील पांगरी पोलीस अंकित असणाऱ्या पांढरी गावात. जोशाबा बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्ताने व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. उद्घाटन बार्शीचे डीवायएसपी अशोक सायकर यांच्या हस्ते झाले. व्याख्याते म्हणून डॉ. संदीप तांबारे होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी डीवायएसपी यांच्या हस्ते छत्रपती शिवरायांच्या प्रतिमेचे पूजन केले. तर डॉ. संदीप तांबारे यांच्या वतीने डॉ बाबासाहेब यांच्या प्रतिमेचे पूजन केले. सरपंच लता घावटे यांच्या हस्ते अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. संस्थेच्या वतीने अध्यक्ष अनिल खुणे, उपाध्यक्ष अचूत घावटे, संचालक सुभाष भोसले यांच्या हस्ते प्रमुख पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक संस्थेचे अध्यक्ष खुणे यांनी केले. सूत्रसंचालन सोमनाथ घावटे यांनी तर आभार प्रा. गणेश घावटे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नितीन घावटे, शामराव शिकेतोड, राजाभाऊ घावटे, बालाजी घावटे यांनी सहकार्य केले.

### एसएमएफजी इंडिया क्रेडिटकडून आरोग्यसेवा

**सोलापूर, दि. २७ फेब्रुवारी -**

भारतातील अग्रगण्य एनबीएफसींपैकी एक असलेल्या एसएमएफजी इंडिया क्रेडिटने आपल्या प्रमुख पशुधन कल्याण आणि ग्रामीण उपजीविका उपक्रमाचा आठवा पशु विकास दिन यशस्वीरीत्या पूर्ण केला. एसएमएफजी इंडिया क्रेडिटने १.५५ लाखांहून अधिक जीवनांवर सकारात्मक प्रभाव साधला असून, यात सुमारे १.४ लाख गुरांवर उपचार तसेच १४,००० हून अधिक लोकांना आरोग्यसेवा सहाय्य देण्यात आले. त्यायोगे ३०,००० हून अधिक कुटुंबांना लाभ झाला. हा उपक्रम १६ राज्यांमध्ये आणि एसएमएफजी ग्रामशक्तीच्या ५१० शाखांमध्ये राबविण्यात आला.

### पाटील विद्यालयाचे एनएमएमएस परीक्षेत यश

**पिलीव, दि. २७ फेब्रुवारी-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयातील विद्यार्थ्यांनी एनएमएमएस परीक्षेत दैदीप्यमान यश संपादन केले. परीक्षेस ९१ विद्यार्थी बसले होते, त्यापैकी ६२ विद्यार्थी पात्र झाले आहेत. यामध्ये २९ विद्यार्थ्यांनी १०० पेक्षा अधिक गुण मिळविले आहेत. या सर्व विद्यार्थ्यांना विभाग प्रमुख शेगर, घोडके, देवकर, झाडे, जाधव, वाघमारे, मगर यांचे मार्गदर्शन लाभले. सर्व यशस्वी विद्यार्थी तसेच मार्गदर्शक शिक्षकांचे मुख्याध्यापक अशोक बागल, किरगत यांनी अभिनंदन केले.

## निधन वृत्त...

### सौदागर गुंड



**सोलापूर, दि. २७ फेब्रुवारी-**

शिवणी (ता.उत्तर सोलापूर) येथील माजी सरपंच सौदागर नाना गुंड (वय-८६) यांचे दि. २७ फेब्रुवारी रोजी दुपारी १२:३५ वाजता निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना, नात-नातू असा परिवार आहे.

# केळी व कलिंगडावर फवारले तणनाशक; ३५ लाखांचे नुकसान

## अज्ञाताने मिसळले किटकनाशकाच्या द्रावणात तणनाशक

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि.२७ फेब्रुवारी-**

शेतात बहरलेल्या व काढणीला आलेल्या केळीसह कलिंगडाला काही नतद्रष्ट लोकांची नजर लागली. नुकसान करण्याच्या उद्देशाने किटक व बुरशी नाशकाच्या द्रावणात अज्ञात व्यक्तीने मुद्दाम तणनाशक मिसळल्याने नवनाथ मगर यांच्या अडीच एकरावरील कलिंगडासह केळीचे सुमारे ३५ लाखांचे नुकसान झाल्याची घटना चांदापुरी (ता. माळशिरस) येथे घडली.

येथील शेतकरी बाळासो कदम यांचे शेत निमगाव येथील नवनाथ मगर हे गेल्या चार वर्षापासून बटईने करतात. या शेतात बेडवर ठिबक व मल्चींग पेपर अंथरूण केळी व आंतरपीक कलिंगड केले होते. केळी व कलिंगडाला सेंद्रिय व रासायनिक सुक्ष्म अन्नद्रव्याचे लाखो रूपये खर्चून नियोजन केले होते. पण कलिंगड हे दहा ते बारा दिवसात काढणीला येणार होते. त्यामुळे किटक व बुरशी नाशक फवारणी चालु होती. २० फेब्रवारी रोजी अज्ञात व्यक्तीने पाण्याच्या बॅलरमध्ये ताणनाशक टाकले. त्यामुळे औषध फवारणी झाल्यानंतर दुसऱ्याच दिवशी २.५ एकरावरील कलिंगड व केळी सुकुन व उलमुडून पडु लागली. शेतकऱ्यांनी सांगितले की, जाणीवपूर्वक या बॅरलमध्ये तणनाशक टाकण्यात आले. हातातोंडाशी आलेला घास हिरावून घेतला गेला आहे. नवनाथ मगर यांचे बाजार भावाप्रमाणे कलिंगड प्रति किलो ३० रूपये २.५ एकरात ६० टन माल १८ ते २० लाख व केळीचे १०० टन उपन्न २० लाख रूपये असे ३५ ते ४० लाखांचे नुकसान झाले आहे. पिलीव व माळशिरस पोलीसांनी सदर बागेची पाहणी केली. पोलासांनीयाबाबत



तातडीने तपास करून कारवाई करावी व नुकसान भरपाई वसुल करावी अशी मागणी नवनाथ मगर यांनी केली आहे.



# भेंड गावाच्या विकासाला मिळणार गती

**पहाट उपक्रमांतर्गत जिल्हा प्रशासनाकडून सेंद्रिय शेती व शाश्वत विकासाचा मंत्र**

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि.२७ फेब्रुवारी -**

भेंड (ता. माढा) येथे पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्यासह जिल्हा प्रशासनाच्या वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांसह सदिच्छा भेट देऊन ‘पहाट’ उपक्रमांतर्गत गावाचा सर्वांगीण विकास, समाजकल्याण, गुन्हेगारीमुक्त गाव, सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन, वृक्ष लागवड आणि शेतकऱ्यांच्या पिकांना योग्य बाजारभाव मिळवून देणार असल्याचे सांगितले.

माढा तालुक्यातील भेंड मॉडेल गाव म्हणून विकसित करण्यासाठी पोलिस प्रशासनातर्फे भेंड गाव दत्तक घेण्याचे सूतोवाच केले. त्यामुळे गावाच्या विकासाला नवी दिशा मिळणार, असे डॉ. संतोष दळवी यांनी सांगितले. गावामध्ये पहाट उपक्रम संकल्पना राबवून भेंडमध्येही शाश्वत विकासासाठी मदत करण्याचे आश्वासन देऊन प्रशासन पूर्णपणे ग्रामस्थांच्या पाठीशी उभे राहील, असा विश्वास त्यांनी भेंड ग्रामस्थांना दिला.

यावेळी उपविभागीय पोलिस अधिकारी अंजली कृष्णा, कुडूवाडी पोलिस ठाण्याचे निरीक्षक अतुल मोहिते, सरपंच डॉ. मनीषा दळवी, उपसरपंच विमल गायकवाड, ग्राम पंचायत सदस्य राजमती जाधव, उषा मते, धनाजी जानराव, प्रभाकर दळवी, ग्रामसेवक रूपाली सुर्वे आदी उपस्थित होते.

# कॉरिडॉरच्या विरोधात सोमवारी पंढरपूर बंद

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२७ फेब्रुवारी -**

तीर्थक्षेत्र पंढरपूरात विकास आराखडा राबविण्यासाठी प्रशासनाकडून सर्व तयारी करण्यात आली असताना पंढरपूरात ज्या भागात विकास आराखडा राबविला जाणार आहे. त्या मंदिर परिसरात होणाऱ्या कॉरिडॉरसाठी शेकडो मालमत्ता बाधित होणार असल्याने याला विरोध होत आहे. प्रशासनाने विकास आराखडा राबविण्याची घोषणा करताच बाधितांनी पंढरपूर बंदची हाक दिली आहे. २ मार्च रोजी पंढरपूर बंद ठेवण्यात येणार आहे. त्याच दिवशी मोर्चाही निघणार आहे.

पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत पंढरपूर विकास आराखड्यास मान्यता देण्यात आली. यात मंदिर परिसरात दोन्ही बाजूने ४० ते ५० मीटर रुंदीकरण करण्यात येणार असल्याचे समजते. त्यामुळे मंदिर परिसरातील शेकडो मालमत्ता बाधित होणार आहेत.

दरम्यान या पाडापाडीस नागरिकांचा विरोध आहे. शासन दडपशाही पद्धतीने कॉरिडॉर राबविण्याचा प्रयत्न करीत असल्याच्या निषेधार्थ संविधानिक मार्गाने आंदोलन करण्याचा निर्णय या प्रकल्पा मध्ये बाधित होणाऱ्या संभाव्य बाधित मालमत्ताधारकांकडून घेण्यात आला. त्यानुसार २ मार्च रोजी मंदिर परिसर बंद ठेवणार आहे.

# मराठी साहित्यात सोलापूरचे वैभव अतुलनीय

**ज्येष्ठ पत्रकार अरविंद जोशी; शिवदारे महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिन साजरा**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ फेब्रुवारी -**

मराठी भाषा केवळ संवादाचे साधन नसून ती एक समृद्ध संस्कृती आहे. सोलापूरला साहित्याचा मोठा वारसा लाभला असून, मराठी साहित्यात सोलापूरचे वैभव अतुलनीय आहे. असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार अरविंद जोशी यांनी केले.

येथील दक्षिण सोलापूर तालुका शिक्षण मंडळ संचलित व्ही. जी. शिवदारे कॉलेज ऑफ आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स मराठी विभाग आणि महाराष्ट्र साहित्य परिषद जुळे सोलापूर शाखा यांच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या ‘मराठी भाषा गौरव दिनानिमित्त’ विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.



याप्रसंगी पत्रकार अरविंद जोशी बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संस्थेचे विश्वस्त भीमाशंकर शेटे होते. याप्रसंगी व्यासपीठावर महाराष्ट्र साहित्य परिषद जुळे सोलापूर शाखेचे अध्यक्ष पद्माकर कुलकर्णी, उपाध्यक्ष श्रीकांत कुलकर्णी, प्रमुख कार्यवाह गिरीश दुनाखे, प्रभारी प्राचार्य डॉ. अनमोल वळसंगे, मराठी विभाग प्रमुख डॉ.शुभदा उपासे, प्रा. वैशाली वराडे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविक पद्माकर कुलकर्णी यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. दामोदर बनसोडे यांनी केले. आभार डॉ. शुभदा उपासे यांनी मानले. याप्रसंगी वृत्तपत्र लेखक मंचचे अध्यक्ष फैय्याज शेख, अंजली तिवारी, प्रा. बावगे, डॉ. एम. बी. कांबळे, महेश स्वामी, प्रा. रुगी, डॉ. चाफळकर, डॉ. धनवे, प्रा. गोटे, प्रा. अश्विनी बिरोळी, प्रा. रेश्मा चिलका, नागशेट्टी उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांना जंक फूडपासून दूर ठेवा

**डॉ. अभिजीत जगताप; ग्लोबल व्हिलेजमध्ये आरोग्य तपासणी शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद**

**तभा वृत्तसेवा,**
**बोरामणी, दि. २७ फेब्रुवारी-**

साखर, मीठ आणि मैदा यांचा आहारात कमीत कमी वापर करा. संतुलित आहार, नियमित व्यायाम आणि योग्य जीवनशैली अंगीकारल्यास अनेक आजार टाळता येतात, विद्यार्थ्यांना जंक फूडपासून दूर राहण्याचे आवाहन विद्यापीठाचे आरोग्य विज्ञान संचालक डॉ. अभिजीत जगताप यांनी केले.

पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या पीएम-उषाच्या सॉफ्ट कॉम्पोनंट कम्युनिटी ऑटरिच ऍक्टिव्हिटी अंतर्गत कै. ब. ई. चनशेट्टी गुरुजी प्रतिष्ठान संचालित ग्लोबल व्हिलेज कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, बोरामणी येथे ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी आयोजित दोन दिवसीय आरोग्य तपासणी शिबिराचे उद्घाटन उत्साहात संपन्न झाले. त्यावेळी ते प्रमुख पाहुणे



म्हणून बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी होते. यावेळी व्यासपीठावर ग्लोबल व्हिलेज शिक्षण संकुलाचे समन्वयक प्रा. अनिकेत चनशेट्टी, प्राचार्य डॉ. वाय. डी. पुजारी, पब्लिक स्कुलच्या प्राचार्या आसमा नदाफ, अश्विनी हॉस्पिटल व मेडिकल कॉलेजचे डॉ. ओंकार व पोतदार लॅब्रेटरीचे शरणू इचगे उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या आरोग्य तपासणीसाठी अश्विनी रुरल मेडिकल कॉलेज व हॉस्पिटल येथील तज्ञ डॉक्टर तसेच पोतदार लॅबोरेटरी येथील तंत्रज्ञ उपस्थित होते. शिबिरामध्ये विद्यार्थ्यांची सर्वसाधारण आरोग्य तपासणी, रक्तगट तपासणी व आवश्यक वैद्यकीय सल्ला देण्यात आला. सूत्रसंचालन कुमारी सानिया खुरुसे हिने केले, तर आभार प्रदर्शन प्रा.सोमनाथ स्वामी यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. प्रदीप राठोड, प्रा. दीपाली कसबे, प्रा. सादिक नाईकवाडी, प्रा. राहुल काळे, जुबेर चौकी, महेश भासगी, सागर खंडाळकर, ओंकार स्वामी, लैला तांबोळी आदींनी परिश्रम घेतले.

# अधिक व्याज देण्याचे आमिष दाखवून फायनान्सकडून फसवणूक

**तभा वृत्तसेवा,**
**द. सोलापूर, दि. २७ फेब्रुवारी-**

सन २०२० पासून ते सन २०२३ दरम्यान प्रकाश संजय इटकर (मयत) व संजय प्रकाश इटकर यांनी श्री.आदिशक्ती फायनान्स बरूर संस्था स्थापन करून त्यामध्ये ठेवीदार यांना आकर्षक व्याजदराचे आमिष दाखविले.

त्यानंतर ठेवीदाराच्या ठेवी स्विकारण्याचे परवान्यातील अटीचा भंग करून अवैद्यरित्या मुदत ठेवीच्या रक्कमा स्वीकारून व त्यावर वार्षिक २४ टक्के असे आकर्षक व्याजदर देण्याचे अमीष दाखविले. त्यांचे फायनान्स मध्ये पिग्मी व रोख स्वरूपात वेगवेगळया रक्कमा फिर्यादी व इतर ४७ ठेवीदार यांच्याकडून घेऊन भरणा करून घेतले. भरणा केलेली एक कोटी ११ लाख १७ हजार ६३० रूपयाची रक्कम व त्यावरील व्याज फिर्यादीस परत दिले नाही . फिर्यादीला आर्थिक फसवणूक करून विश्वासघाताने, संगनमत करून रक्कमेचा अपहार केला आहे. म्हणून प्रकाश ईटकर (मयत) व संजय प्रकाश ईटकर रा. बरूर (ता.द. सोलापूर) यांच्या विरूध्द फिर्याद दाखल करण्यात आला आहे. निर्मला गणेश चौगुले वय ५० वर्ष, राहणार बरूर तालुका दक्षिण सोलापूर यांनी मंद्रूप पोलीसात फिर्याद दिली आहे.

# खग्रास (ग्रस्तोदित) चंद्रग्रहणानिमीत्त श्री वटवृक्ष स्वामींच्या दिनक्रमात बदल

**सायंकाळी ६ ते ८ या वेळेत स्वामी दर्शन व मंदीर बंद राहणार**

**तभा वृतसेवा,**
**अक्कलकोट दि. २७ फेब्रुवारी-**

फाल्गुन शुक्ल पक्ष पौर्णिमा मंगळवार दि.३ मार्च रोजी खग्रास (ग्रस्तोदीत) चंद्रग्रहण आल्यामुळे येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानच्या नित्यक्रमात व स्वामींच्या दिनक्रमात बदल करण्यात आल्याची माहिती मंदिर समितीचे चेअरमन व नगरसेवक महेश इंगळे यांनी दिली.

मंगळवार दि. ३ मार्च रोजी खग्रास (ग्रस्तोदीत) चंद्रग्रहणरोजी सुर्योदयापासून ग्रहणाचे वेध असल्याने मंदीरात स्वामी भक्तांच्या वतीने सकाळी नित्यनियमाने होणारे अभिषेक व सकाळी ११:३० ची महाराजांची नैवेद्य आरती होणार नाही, परंतू



ग्रहण पर्व काळात दिवसभर ते सायंकाळी ६ पर्यंत स्वामी दर्शन चालू राहील. सायंकाळी ६ ते रात्री ८ या वेळेत २ तास मंदीर बंद राहील. यानंतर पुन्हा नेहमीप्रमाणे दर्शनाकरीता मंदीर उघडण्यात येईल. यानंतर मंदीरात रात्री ७:४५ ते ८:४० यावेळेत नित्यनियमाने होणारी महाराजांची शेजारतीही होणार नाही.

# ‘ऑनर किलिंग’चा बनाव उघड; पित्यानेच केला पोटच्या मुलीचा गळा आवळून खून

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि.२७ फेब्रुवारी-**

समाजाला काळिमा फासणारी एक संतापजनक घटना बार्शी तालुक्यातील रुई येथे उघडकीस आली आहे. आपल्या १७ वर्षीय मुलीचे प्रेमसंबंध असल्याच्या संशयातून आणि रागातून, जन्मदात्या पित्यानेच तिची ओढणीने गळा आवळून हत्या केल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले आहे. हत्येनंतर हा प्रकार आत्महत्येचा वाटवा, यासाठी पित्याने केलेला बनाव वैराग पोलिसांनी तांत्रिक तपासाद्वारे खोडून काढला आहे.

**नेमकी घटना काय?**

मयत मुलगी श्रावणी राजेंद्र नरसुडे (वय १७ वर्षे ३ महिने) ही बार्शी येथे शिक्षण घेत होती. तिचे एका तरुणासोबत मैत्रीपूर्ण संबंध असल्याची कुणकुण तिचे वडील राजेंद्र लालासाहेब नरसुडे (वय ५४) यांना लागली होती. याच रागातून २७ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी १०:३० ते १२:३० च्या सुमारास राजेंद्र याने राहत्या घरी श्रावणीचा तिच्याच ओढणीने गळा आवळून खून केला.

पुरावे नष्ट करण्याचा आणि आत्महत्येचा बनाव करत आरोपी पित्याने अत्यंत क्रूरपणे हा प्रकार लपवण्याचा प्रयत्न केला. मुलीने आत्महत्या केली आहे असे वाटावे, यासाठी त्याने तिला बळजबरीने कीटकनाशक पाजले. मुलीच्या मोबाईलमधील महत्त्वाचे पुरावे आणि चॅट्स त्याने जाणीवपूर्वक डिलीट केले. त्यानंतर तिला तातडीने धाराशिव येथील रुग्णालयात नेले, जिथे तिला मृत घोषित करण्यात आले. सुरुवातीला वैराग पोलीस ठाण्यात याची नोंद 'अकस्मात मृत्यू' म्हणून करण्यात आली होती. पोलीस निरीक्षक कुंदन गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार संदेश पवार यांनी या प्रकरणाचा सखोल तपास सुरू केला. तपासादरम्यान काही महत्त्वाचे दुवे समोर आले. शवविच्छेदन अहवालात मुलीचा मृत्यू विषप्राशनाने नव्हे, तर 'गळा आवळल्यामुळे' झाल्याचे स्पष्ट झाले. सायबर तज्ज्ञांच्या मदतीने मोबाईलमधील डिलीट केलेला डेटा आणि तांत्रिक बाबी तपासल्यानंतर पोलिसांचा संशय बळावला.

पोलिसी खाक्या दाखवताच आरोपी पित्याने आपला गुन्हा कबूल केला. याप्रकरणी पोलीस हवालदार संदेश पवार यांनी सरकारतर्फे फिर्याद दिली आहे. आरोपी राजेंद्र नरसुडे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

न्यायालयाने आरोपीला २ मार्चपर्यंत पोलीस कोठडी सुनावली असून पुढील तपास पो.नि. कुंदन गावडे करत आहेत. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून, 'ऑनर किलिंग'च्या या प्रकारामुळे अल्पवयीन मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. पोलिसांनी नागरिकांना कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन केले आहे.

# ऊस उत्पादकांची ५०० कोटींची बिले थकली; स्वाभिमानी संघटनेचा आरोप



## साखर सहसंचालक कार्यालयाबाहेर आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२७ फेब्रुवारी-**

उसाचा गाळप हंगाम संपून दीड महिना उलटून गेला. शेतकऱ्यांचे जवळपास ५०० कोटी रुपयांची बिले थकली, असा आरोप स्वाभिमानी शेतकरी संघटनेने केला. संघटनेचे जिल्हाध्यक्ष विजय रणदिवे यांच्या नेतृत्वाखाली सोलापुरातील साखर सहसंचालक कार्यालयाबाहेर ठिय्या आंदोलन करत जोरदार घोषणाबाजी करण्यात आली

जिल्ह्यातील ऊस गाळप बंद होऊन काही दिवस लोटले असतानाही अनेक साखर कारखान्यांकडून एफआरपीची संपूर्ण रक्कम अदा करण्यात आलेली नाही. त्यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. कर्जफेड, शेतीची पुढील मशागत आणि घर खर्चाचे नियोजन कोलमडले, असे सांगण्यात आले.

जिल्ह्यातील सुमारे २२ कारखान्यांकडे १५ फेब्रुवारीपर्यंतची ४९६ कोटी रुपयांची एफआरपी थकली आहे. जाहीर केलेल्या पहिल्या हप्त्यानुसार ९५० कोटी रुपयांची थकबाकी शेतकऱ्यांच्या खात्यावर त्वरित जमा करण्यात यावी. ऊस उत्पादकांच्या प्रश्नांची दखल न घेणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

## महत्वाचे...



### कै.वि.मो. मेहता प्राथमिक शाळेत मराठी राजभाषा गौरव दिन साजरा

**सोलापूर, दि.२७ फेब्रुवारी-**

कै.वि.मो. मेहता प्राथमिक शाळेत मराठी राजभाषा गौरव दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. साहित्यिक शोभना सागर, मुख्याध्यापिका सीमा कोरवलीकर यांच्या ज्येष्ठ साहित्यिक कुसुमाग्रज उर्फ वि.वा.शिरवाडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. श्रुती कुलकर्णी यांनी मराठी भाषेवर आधारित गीत गायन केले. मयुरी दुरुगकर यांनी प्रमुख अतिथींचा परिचय करुन दिला. इयत्ता २ री शिवनेरी गटातील विद्यार्थ्यांनी हा रंग मराठी मातीचा या गीतावर नृत्य सादर केले. योगेश सरवदे यांनी मनोगत व्यक्त केले. शोभना सागर यांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांना मराठी गोष्टींचे वाचन करा. दररोज एक पान लेखन करा, असे सांगितले. सुनेत्रा मोहोळकर यांनी आभार मानले. शाळा समिती अध्यक्ष राजेश पटवर्धन यांनी शुभेच्छा दिल्या.




### आस्थाच्या वतीने ३०० जणांना अल्पोपहार

**सोलापूर, दि.२७ फेब्रुवारी-**

येथील राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम व जिल्हा अंधत्व नियंत्रण कार्यक्रमांतर्गत पुणे नेत्रसेवा प्रतिष्ठान रोटरी क्लब सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा रुग्णालयाच्या वतीने आयोजित तीन दिवसीय मोफत नेत्र शस्त्रक्रिया शिबिरात पहिल्याच दिवशी ३०० नेत्र रुग्णांची नोंदणी झाली आहे. या रुग्णांना व नातेवाईकांना सामाजिक कार्यात अग्रेसर असणारी आस्था सामाजिक संस्थेच्या वतीने मोफत फळे व अल्पोपहाराचे वाटप करण्यात आले व तसेच पुढील दोन्ही दिवशी सकाळी नाष्टा दुपारचे जेवण व सायंकाळचे जेवणाची सोय करण्यात येणार आहे. अतिरिक्त जिल्हा वैद्यकीय अधिकारी डॉ. श्रीकांत कुलकर्णी, रोटरी क्लबचे अध्यक्ष भालचंद्र राठी, सचिव रोहन भुतडा, विक्रम बेडबार, प्रमोद देशपांडे, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. श्रीकांत कुलकर्णी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. वर्षा डोईफोडे, डॉ. संतोष नवले, डॉक्टर भगवान पवार, आस्था सामाजिक संस्था अध्यक्ष आनंद तालिकोटी, संचालक योगेश कुंदुर, वेदांत तालिकोटी, पिंटू कस्तुरे, यांच्या उपस्थितीत याचे वाटप करण्यात आले.

### महाविधी सेवा शिबिरात शासकीय यंत्रणांचे ४० स्टॉल लागणार : आरडीसी अभिजित पाटील

**सोलापूर, दि. २७ फेब्रुवारी-**

शासनाच्या विविध कल्याणकारी योजना, कायद्याबाबत जागरूकता निर्माण व्हावी. पात्र लाभार्थ्यांना एकाच ठिकाणी लाभ मिळावी यासाठी दि.२८ फेब्रुवारी २०२६ रोजी उत्तर सोलापूर तालुक्यातील वडाळा येथे महा विधी सेवा शिबिराचे आयोजन करण्यात आलेले आहे, अशी माहिती निवासी



उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांनी दिली. या शिबिरासाठी सोलापूर न्यायिक जिल्ह्याचे न्यायमूर्ती एन.जे. जमादार मुंबई उच्च न्यायालय, न्यायमूर्ती फिरदोस पूनीवाला मुंबई उच्च न्यायालय मुंबई हे उपस्थित राहणार आहेत. जिल्हा परिषदेने त्यांच्या विविध यंत्रणाचे किमान १० स्टॉल तसेच इतर शासकीय यंत्रणांनी किमान एक याप्रमाणे वडाळा येथील महाविधी सेवा शिबिरात ४० स्टॉल लावण्याचे नियोजन केलेले आहे. शिबिरात लसीकरण, माती परीक्षण, विविध विमा योजना, दिव्यांगासाठी असणाऱ्या योजनांची माहिती, हेल्थ कार्ड, वय वर्ष ४ ते १४ वयोगटातील मुलां-मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात आणणे, लाभार्थ्यांना रेशन कार्ड, मतदान कार्ड वाटप करण्यात येणार आहे, असेही त्यांनी सांगितले.

# 'मराठी' ही आत्मीयता, नातेसंबंध, जाणीवता दृढ करणारी 'बोली'

## दैनिक 'तरुण भारत'चे संपादक प्रशांत माने यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर,दि. २७ फेब्रुवारी-**

मराठी भाषेला समृध्द वारसा लाभला आहे. 'मराठी' ही केवळ भाषा नसून मराठी माणसांमध्ये आत्मीयता, नातेसंबंध व जाणीवता दृढ करणारी 'बोली' आहे. मराठी भाषा ही गौरवशाली व वैभवशाली असून घरी व कामाच्या ठिकाणी मराठी भाषेचा आवर्जून वापर करावा, असे प्रतिपादन दैनिक तरुण भारतचे संपादक प्रशांत माने यांनी केले. ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त साहित्यिक कुसुमाग्रज यांची जयंती अर्थात मराठी भाषा दिननिमित्त जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय सोलापूरच्या वतीने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

सोलापूर जिल्हा ग्रंथालय अधिकारी सुनील हुसे यांनी मराठी भाषा गौरव दिनाचे महत्त्व व पार्श्वभूमी सांगून सर्वांनी यानिमित्त वेगवेगळे कार्यक्रम घेऊन हा दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्याचे आवाहन केले. मराठी भाषा अधिकारी प्रमोद पाटील यांनी सूत्रसंचालन केले. ग्रंथालय निरीक्षक संजय ढेरे यांनी आभार मानले. याप्रसंगी प्रदीप गाडे, यल्लप्पा घोडके, धोंडीराम जेऊरकर, नरसिंह मिसालोलू, कुमार जम्मा, अर्जुन जाधव यांच्यासह शहरातील ग्रंथालय पदाधिकारी, कार्यकर्ते व वाचक उपस्थित होते.



### ग्रंथ प्रदर्शनला भरभरुन प्रतिसाद

मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधून ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. त्यास वाचकांचा भरभरुन प्रतिसाद मिळाला. दैनिक तरुण भारतचे मुख्य संपादक प्रशांत माने यांनी या ग्रंथप्रदर्शनाची पाहणी करुन तेथील स्वच्छता आणि नेटनेटकेपणाचे कौतुक केले.

# लाचखोर वरिष्ठ सहाय्यक सुंदरराव नागटिळक निलंबित

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर,दि. २७ फेब्रुवारी-**

माळशिरस पंचायत समितीचे वरिष्ठ सहाय्यक सुंदरराव नागटिळक यांच्याविरुद्ध लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने यशस्वी सापळा रचत कारवाई केली होती. त्यांना अटक करण्यात आली. या प्रकरणाचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर नियुक्ती प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी कुलवीप जंगम यांनी तत्काळ कारवाई करत सुंदरराव नागटिळक यांना दि.२३ फेब्रुवारी २६ पासून जिल्हा परिषद सेवेतून निलंबित करण्याचे आदेश जारी केले आहेत.

निलंबन काळात त्यांचे मुख्यालय पंचायत समिती माहीळ असे निश्चित करण्यात आले असून गटविकास अधिकारी, पंचायत समिती मोहोळ यांच्या पूर्वपरवानगीशिवाय मुख्यालय सोडता येणार नसल्याचे सांगण्यात आले आहे. तसेच पंचायत समिती माळशिरस यांनी त्यांना मूळ सेवापुस्तकासह कार्यमुक्त करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. सदर आदेशाची नोंद त्यांच्या सेवापुस्तकात करण्यात येणार आहे.या कारवाईमुळे जिल्हा परिषद प्रशासनात खळबळ उडाली असून भ्रष्टाचाराविरोधातील कारवाईबाबत प्रशासनाची कठोर भूमिका अधोरेखित झाली आहे.

# जिल्हा प्रशासन आज देणार अध्यक्ष, उपाध्यक्ष निवड बैठकीची तारीख

## पालकमंत्री सोलापूर दौऱ्यावर आल्यावर गटनेता निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ फेब्रुवारी-**



जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुका पार पडल्यानंतर आता जिल्हा परिषद अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि पंचायत समितीचे सभापती, उपसभापती कोण होणार? याची चर्चा गेल्या काही दिवसांपासून राजकीय गोटात सुरू आहे. आता २० मार्चपूर्वी जिल्हा परिषद अध्यक्ष आणि पंचायत समिती सभापती निवडण्यासाठी पहिली बैठक घेण्याचे आदेश ग्रामविकास विभागाकडून जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत. यामुळे अध्यक्ष आणि उपाध्यक्ष निवडीच्या बैठकीची तारीख शनिवार, दि. २७ रोजी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद हे संबंधित पक्षप्रमुखांना देणार असल्याची माहिती उपजिल्हाधिकारी संतोषकुमार देशमुख यांनी दिली. पालकमंत्री जयकुमार गोरे हे अधिवेशनात व्यस्त असल्याने ते सोलापूर जिल्हा दौऱ्यावर आल्यावरच गटनेता ठरणार असल्याचे भाजपाच्या अधिकृत सूत्राकडून सांगण्यात आले.



जिल्हा परिषद आणि पंचायत समितीचे निकाल लागून तब्बल २० दिवस होत आले तरी अजून अध्यक्षपदाची निवड झाली नाही; याबाबत राजकीय गोटातून आणि सामान्य नागरिकांतून चर्चा सुरू झाली होती. मात्र आता हे अध्यक्ष-उपाध्यक्ष निवड करण्यासाठी ग्राम विकास खात्याकडून राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांकडे पत्र पाठविण्यात आल्याने जिल्हा परिषद अध्यक्ष, उपाध्यक्ष व पंचायत समिती सभापती, उपसभापती पदाच्या निवडीसाठी येत्या २० मार्चपूर्वी बैठक घेण्यात येणार असल्याने वरील सर्व चर्चेला पूर्णविराम मिळाला आहे.

पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी सोलापूर महापालिकेबरोबरच जिल्हा परिषदेवर भाजपची सत्ता आणली. भाजपच्या ६८ जागापैकी ३८ सदस्य भाजपचे निवडून आणले आहेत. जिल्हा परिषदेत भाजपची निर्विवाद सत्ता आली आहे. आता जिल्हा परिषदेत अध्यक्ष कोण होणार? याकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे. या चर्चेनंतर आता एक मोठी लक्षवेधी ठरत आहे ती म्हणजे पंचायत समिती व जिल्हा परिषदेत स्वीकृत सदस्यपदी कोणाची वर्णी लागणार? यासाठी ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांचाच नवीन पॅटर्न चर्चेचा ठरला आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या या निवडणुकीत नाराज झालेल्या इच्छुकांना स्वीकृत करण्याचा शब्द ना. गोरे यांनी दिला होता. आतापर्यंत जिल्हा परिषद व पंचायत समितीमध्ये स्वीकृत सदस्यपदच नव्हते. पण यावेळेस प्रथमच स्वीकृतची संधी पालकमंत्री गोरे यांच्यामुळे मिळणार आहे. जिल्हा परिषद व पंचायत समितीमध्ये स्वीकृत सदस्य निवडीसाठीचा प्रस्ताव त्यांनी तयार करून मंजुरीसाठी मंत्रालयाकडे सादर केल्याचे समजते. या प्रस्तावाची फाईल सध्या मंजुरीसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे गेली आहे. त्यांची सही झाल्यावर याबाबत अधिसूचना जारी होणार आहे. यानंतर जिल्हा परिषदेच्या तिकीटाबाबत नाराज झालेल्या काहीजणांची स्वीकृत सदस्यपदी वर्णी लागून त्यांनाही पालकमंत्री गोरे यांच्यामुळे सत्तेचा वाटा मिळणार आहे.

### पालकमंत्र्यांच्या दौऱ्याकडे लक्ष

जिल्हा परिषद गटनेता, अध्यक्ष, उपाध्यक्ष निवड आणि पंचायत समित्यांचे सभापती-उपसभापती निवडी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्यामुळे थांबल्या आहेत. सध्या पालकमंत्री गोरे हे अधिवेशनात व्यस्त आहेत. शनिवारी किंवा रविवारी पालकमंत्री सोलापुरात येणार आहेत. पालकमंत्री गोरे हे सोलापुरात आल्यावरच रखडलेल्या सर्व निवडींवर शिक्कामोर्तब होणार आहे. त्यामुळे पालकमंत्री गोरे यांच्या सोलापूर दौऱ्याकडे लक्ष लागले आहे.

# आवश्यकतेनुसार नवीन लाईट पोल, एलईडी दिव्यांची कामे प्राधान्याने करा



## विद्युत विभागाच्या कामकाजाचा महापौरांकडून सविस्तर आढावा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर,दि. २७ फेब्रुवारी-**

महानगरपालिकेकडे येणाऱ्या सर्व तक्रारींवर तात्काळ कार्यवाही करावी. ज्या ठिकाणी नवीन लाईट पोल उभारण्याची आवश्यकता आहे तसेच एलईडी दिव्यांची मागणी आहे, त्या ठिकाणी पाहणी करून प्राधान्याने कामे पूर्ण करावीत.यासोबत जुन्या व धोकादायक वायरिंगचे नूतनीकरण, सण-उत्सव काळातील विशेष प्रकाशयोजना, तसेच पावसाळ्यापूर्वी विद्युत यंत्रणांची तपासणी करण्याचे आदेश महापौर विनायक कोंड्याल यांनी दिले.

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले सभागृह येथे आज सोलापूर महानगरपालिकेच्या विद्युत विभागाची सविस्तर आढावा बैठक महापौर विनायक कोंड्याल यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, सभागृहनेते नरेंद्र काळे, आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे, अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, कार्यकारी अभियंता (विद्युत) राजेश परदेशी, सहाय्यक अभियंता महादेव इंगळे तसेच विभागीय कार्यालय क्रमांक १ ते ८ मधील संबंधित अभियंते व अधिकारी उपस्थित होते.

शहरातील एलईडी दिवे,देखभाल दुरुस्ती कामे तसेच नागरिकांकडून येणाऱ्या तक्रारींचा आढावा यावेळी घेण्यात आला.बैठकीत महापौर विनायक कोंड्याल यांनी विद्युत विभागातील अडीअडचणी जाणून घेत अधिकाऱ्यांना आवश्यक त्या उपाययोजना तत्काळ करण्याच्या सूचना दिल्या. विद्युत विभागाच्या वतीने सादरीकरणाद्वारे माहिती देण्यात आली. यावेळी शहरातील बंद दिवे, खराब लाईट पोल, उशिरा होणारी दुरुस्ती, नव्या वसाहतींमध्ये प्रकाशयोजनेची गरज आदी विषयांवर चर्चा करण्यात आली.

शहरातील अंधाऱ्या ठिकाणी सर्वेक्षण करून आवश्यक तेथे अतिरिक्त प्रकाशयोजना करण्यावरही भर देण्यात आला. शहरातील नागरिकांना सुरक्षित, दर्जेदार व अखंडित प्रकाश व्यवस्था उपलब्ध करून देणे ही महानगरपालिकेची जबाबदारी आहे. नागरिकांच्या तक्रारींना प्राधान्य देत कामकाजात गती आणावी व पारदर्शकता राखावी. शेवटी विभागनिहाय प्रलंबित कामांचा आढावा घेण्यात आला. ठराविक कालमर्यादेत कामे पूर्ण करण्याचे आदेश महापौर विनायक कोंड्याल यांनी दिले.

### एलईडी प्रकल्पामुळे दरवर्षी ५० लाख रुपयांची वीज बचत

सोलापूर शहरात एक्सेल कंपनीच्या माध्यमातून सुमारे ५० हजार एलईडी दिवे बसविण्यात आले आहेत. या एलईडी प्रकल्पामुळे दरवर्षी अंदाजे ५० लाख रुपयांची वीज बचत होत असून, पारंपरिक दिव्यांच्या तुलनेत देखभाल खर्चातही लक्षणीय घट झाली आहे. तसेच एलईडी दिव्यांमुळे शहरातील रस्ते अधिक प्रकाशमान झाले असून नागरिकांच्या सुरक्षिततेत वाढ झाली आहे.

# अवैध प्रवासी वाहतूक रोखा : परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

## १ मार्च पासून राज्यभर प्रभावी मोहीम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ फेब्रुवारी-**

राज्यभरात वाढत चाललेल्या अवैध प्रवासी वाहतुकीमुळे सार्वजनिक सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला असून, कायदेशीर वाहतूक व्यवस्थेलाही मोठा फटका बसत आहे. परवाना, फिटनेस प्रमाणपत्र, विमा किंवा नियमानुसार परवानगी नसताना प्रवासी ने-आण करणाऱ्या वाहनांमुळे अपघातांचा धोका वाढत असून, प्रवाशांचे जीव धोक्यात येत आहेत. अशा अवैध प्रवासी वाहतुकीवर निर्बंध आणावेत त्यासाठी १ मार्चपासून राज्यभर प्रभावी मोहीम राबवावी असे निर्देश परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी मोटार परिवहन विभागाला दिले.



ते या अनुषंगाने विधानभवनात बोलावलेल्या बैठकीत बोलत होते. या बैठकीला परिवहन आयुक्त राजेश नार्वेकर, व संबंधित अधिकारी उपस्थित होते. मंत्री सरनाईक पुढे म्हणाले की, क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी घेणे, वाहनांची नियमित तपासणी न करणे आणि सुरक्षाविषयक नियमांकडे दुर्लक्ष करणे या प्रकारांमुळे अपघातांच्या घटना वाढण्याची शक्यता अधिक असते. अशा वाहनांना वैध विमा नसल्यास अपघातानंतर प्रवाशांना नुकसानभरपाई मिळवणे कठीण होते. अनेक वेळा वाहनमालक किंवा चालक जबाबदारी टाळण्याचा प्रयत्न करतात, ज्यामुळे पीडितांना न्याय मिळण्यात विलंब होतो. तसेच अवैध वाहतुकीमुळे शासनाच्या महसुलालाही मोठे नुकसान सहन करावे लागते. नियम पाळणाऱ्या एसटी महामंडळासारख्या कायदेशीर वाहतूकदारांवर अन्यायकारक स्पर्धेचे ओझे येते. दरकपात आणि अनियमित बाजारपेठेमुळे अधिकृत सेवा आर्थिक अडचणीत सापडतात. एसटी सारख्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेतील प्रवासीसंख्या घटल्याने नियोजित मार्ग व वेळापत्रकावरही त्याचा परिणाम होतो.

मोटार परिवहन विभागाने कडक अंमलबजावणी, नियमित तपासणी मोहीम आणि व्यापक जनजागृती यावर भर देणे आवश्यक आहे. ऑनलाइन आणि पारदर्शक परवाना प्रक्रियेच्या माध्यमातून कायदेशीर वाहतूक सुलभ करणे, तसेच प्रवाशांनीही परवानाधारक सेवांचा वापर करण्याची जबाबदारी स्वीकारणे, ही काळाची गरज आहे. अवैध प्रवासी वाहतुकीवर कठोर कारवाई आणि जनसहभाग या दोनच मार्गांनी सुरक्षित, पारदर्शक आणि विश्वासार्ह वाहतूक व्यवस्था निर्माण होऊ शकते, असेही त्यांनी सांगितले.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT



## ▶▶ महत्वाचे...

### शासनाची फसवणूक; तिघा जणांविरुध्द गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. २७ फेब्रुवारी-**

महापालिका हद्दीतील व्यवहार करतेवेळी कार्यालयास कुलमुखत्यार नोंदविण्यात आलेला नसताना देखील, चुकीचे खोटे घोषणापत्र जोडून शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी तिघांविरोधात सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. दि.११ फेब्रुवारी पासून ते आजतागायत सहाय्यक निबंधक कार्यालय उत्तर सोलापूर यातील तक्रारी अर्जाच्या अनुषंगाने झालेली चौकशी व छाननीअंती हा प्रकार उघडकीस आला. महापालिका हद्दीतील जुना सर्व्हे नंबर १४३, नवीन सर्व्हे नंबर १४१ मधील २१,१५६ चौरस फूट ईशान्य क्षेत्राचे मिळकतीचे दस्त क्रमांक ६४६९/२००७ चे नोंदणीकृत दस्तातील लिहून देणारे जयराम नरसिंह शेरला, साईनाथ जयराम शेरला व लिहून घेणारे रमेश सत्यनारायण पसनूर हे दस्त व्यवहार करतेवेळी कार्यालयास कुलमुखत्यार दस्त क्रमांक १८०/२००२ चुकीचे खोटे घोषणापत्र जोडून शासनाची फसवणूक केली.



### कार्यालयास वाहन चिटकून लावल्याने मारहाण

**सोलापूर, दि. २७ फेब्रुवारी-**

चारचाकी वाहन कार्यालय जवळ चिटकून लावल्याची विचारणा केली तेव्हा एकाला लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यात आली. याबाबत चौघांविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. दि. २४ फेब्रुवारी रोजी बेगम पेठ येथील मुस्ताक मेहबूब शेख हे नमाज पठण करुन कार्यालयात आले असता अफसर हुसेनबाशा शेख यांनी त्याची चारचाकी वाहन कार्यालयजवळ चिटकून लावल्याचे मुस्ताक शेख यांनी विचारणा केली.तेव्हा अफसर शेख यांनी लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. तसेच अकमल शेख, साकिब शेख, इब्राहिम शेख यांनी मुस्ताक शेख व त्यांच्या पत्नीला शिवीगाळ व मारहाण केली, असे जेलरोड पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. पुढील तपास सय्यद करत आहेत.

### नीलमनगर येथून दुचाकी चोरी

**सोलापूर, दि. २७ फेब्रुवारी-**

नीलम नगर येथे पार्क केलेली एम.एच.१३ बी.डी.७४२१ या क्रमांकाची दुचाकी चोरट्याने चोरुन नेली. याबाबत मुस्तकीम रहिमबक्ष कामले (रा.अंबिका नगर भाग ३, मजरेवाडी, सोलापूर) यांनी एमआयडीसी पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली. पुढील तपास भांगे करत आहेत.



### खड्डा का खोदत आहात, अशी विचारणा केल्याने मारहाण

**सोलापूर, दि. २७ फेब्रुवारी-**

कसलीही परवानगी न घेता खड्डा खोदत असताना खड्डा का खोदत आहे असे विचारणा केली असता शिवीगाळ करत लाकडी दांडक्याने हातापायावर मारहाण केल्याने एकाविरुध्द जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. दि.२१ फेब्रुवारी रोजी चिराग अली कब्रस्तानजवळ खुद्दस याकूब कांबळे (रा.भारत नगर, ७० फूट रोड, सोलापूर) हे ट्रस्टच्या ऑफिसमध्ये असताना अब्दुल सत्तार जाफर शेख याने परवानगी न घेता खड्डा खोदत असताना खड्डा का खोदत आहे, असे कांबळे यांनी विचारले असता त्यांना शिवीगाळ व मारहाण करण्यात आली. पुढील तपास दुधाळे हे करीत आहेत.

### वाळू तस्करीप्रकरणी सुरज शिंदे स्थानबध्द

**सोलापूर, दि. २७ फेब्रुवारी-**

वाळू तस्करीप्रकरणी सुरज शिंदे यास येरवाडा कारागृहात स्थानबध्द करण्यात आले. अवैधरित्या वाळू उपसा करणे, वाळु चोरी करणे, चोरलेली वाळुची वाहतुक करून ती विक्री करणे यांसह इतर गुन्ह्यांसंदर्भात त्याच्यावर यापुर्वी गुन्हे दाखल असून त्यास तडीपारही करण्यात आले होते. पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलिस अधीक्षक प्रितम यावलकर यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलिस अधिकारी प्रशांत डगळे, वपोनि संजय जगताप, पोनि टी.वाय.मुजावर, सपोनि रेळेकर, पोसई भोसले, वडणे, सपोफौ गयकवाड, पोकॉ सागर गवळी, अनिस शेख, मोहन मनसावाले, उत्कर्ष देवकुळे, विलास म्हेत्रे यांनी ही कारवाई केली.



# घरकुलांचे स्वप्न साकार : दर मंगळवारी, शुक्रवारी मोफत स्वरुपात वाळू

## आत्तापर्यंत ६५३ लाभार्थ्यांना १८०० ब्रास वाळूचे वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ फेब्रुवारी-**

सर्वसामान्यजनांच्या स्वप्नातील घरकुल साकार होण्याच्या अनुषंगाने प्रधानमंत्री घरकुल योजनेतंर्गत दर मंगळवारी, शुक्रवारी मोफत स्वरुपात वाळू वाटप करण्यात येत आहे. आतापर्यंत ६५३ लाभार्थ्यांना एकूण १८०० ब्रास वाळूचे वितरण करण्यात आले, अशी माहिती सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी दिली.



सोलापूर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील घरकुल बांधणीस गती देण्यासाठी सोलापूर जिल्हा प्रशासनाकडून प्रधानमंत्री घरकुल योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांना मोफत वाळू उपलब्ध करून देण्याचा उपक्रम राबविण्यात येत आहे. या योजनेमुळे ग्रामीण भागातील सर्वसामान्य कुटुंबांना स्वतः चे घर उभारण्यासाठी शासनाच्या या निर्णयामुळे मोठा दिलासा मिळाला आहे. घरकुल बांधणी करताना वाळूचा खर्च हा ग्रामीण कुटुंबांसाठी मोठा आर्थिक बोजा ठरतो. यापार्श्वभूमीवर प्रशासनाने पारदर्शक आणि नियोजनबध्द पध्दतीने मोफत वाळू वितरणाची प्रक्रिया सुरू केली आहे. यामुळे अनेक कुटुंबांचे घराचे स्वप्न साकार होण्यास मोठी मदत होत आहे. या उपक्रमामुळे घरकुल बांधणीला वेग आला आहे



### ग्रामविकास अधिकाऱ्यांकडून प्रत्यक्ष तपासणी

ग्रामविकास अधिकाऱ्यांकडून लाभार्थ्यांच्या बांधकामाची प्रत्यक्ष पाहणी केली जात आहे. घरकुलाचे काम प्रत्यक्ष सुरु असल्याची खात्री करुनच वाळूचे वाटप करण्यात येते. अपात्र लाभार्थ्यांकडे वाळू वळवली जाणार नाही; याची दक्षता घेतली जात आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

### रमाई आवास योजना, जलजीवन मिशन

एकीकडे प्रधानमंत्री आवास योजना सुरळीत असताना दुसरीकडे रमाई आवास योजना तसेच जलजीवन मिशन बंद पडण्याच्या मार्गावर आहेत याकडे लक्ष वेधले असता मुख्य कार्यकारी अधिकारी जंगम यांनी सांगितले की, यासंदर्भात देखील शासन स्तरावर कामकाज सुरु आहे. लवकरच योजना कार्यान्वित केल्या जातील.

### वेळेत वाळू उपलब्ध करुन देण्याला प्राधान्य

बांधकाम साहित्याच्या वाढत्या दरामुळे अनेक लाभार्थ्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत होता. मोफत वाळू वितरणामुळे या अडचणी काही प्रमाणात कमी झाल्या आहेत. पात्र लाभार्थ्यांना वेळेत वाळू उपलब्ध करून देणे हे प्रशासनाचे प्राधान्य आहे, असेही त्यांनी सांगितले.

# वाढत्या उन्हाच्या पार्श्वभूमीवर शाळा सकाळ सत्रात घ्या

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ फेब्रुवारी-**

शहर व जिल्ह्यात दरवर्षीप्रमाणे यंदाही फेब्रुवारी अखेरपासून उन्हाची तीव्रता लक्षणीय वाढू लागली आहे. मार्च महिन्यात तापमानात मोठी वाढ होत असल्याने विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या पार्श्वभूमीवर १ मार्चपासून शाळा सकाळ सत्रात भरविण्याची गरज असल्याची मागणी विविध शिक्षक व पालक संघटनांकडून करण्यात येत आहे.



दरवर्षी वाढत्या तापमानामुळे प्राथमिक व माध्यमिक शाळांचे वेळापत्रक सकाळी करण्यात येते. दुपारच्या सत्रात विद्यार्थ्यांना उष्माघात, निर्जलीकरण, थकवा अशा समस्यांना सामोरे जावे लागते. विशेषतः इयत्ता पहिली ते चौथीतील लहान विद्यार्थ्यांना तीव्र उन्हाचा अधिक त्रास होतो. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने सकाळचे सत्र अधिक सुरक्षित व सोयीस्कर ठरते.यासंदर्भात विविध संघटनांनी शिक्षणाधिकारी कादर शेख यांच्याकडे निवेदन देऊन १ मार्चपासून शाळा सकाळी भरविण्याबाबत तातडीने आदेश काढावेत, अशी मागणी केली आहे. मात्र, अद्याप शिक्षण विभागाकडून कोणताही अधिकृत आदेश प्राप्त झालेला नाही. वाढत्या उन्हामुहे पालकवर्गातही याबाबत चिंतेचे वातावरण असून विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेता लवकरात लवकर निर्णय जाहीर करावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

शाळा सकाळी भरवल्यास विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढेल, आरोग्याच्या तक्रारी कमी होतील तसेच अभ्यासावरही सकारात्मक परिणाम होईल, असे शिक्षकांचे मत आहे.

# सोलापूर बाजार समितीत ३३३ ट्रक कांद्याची आवक

## २ कोटी ३३ लाखांची उलाढाल

- उत्पादन खर्चाच्या निम्म्या दरात विक्री
- निर्यात धोरणाचा बसतोय फटका

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ फेब्रुवारी-**

श्री सिध्देश्वर सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीत शुक्रवार, दि.२७ फेब्रुवारी रोजी ३३३ ट्रक कांदयाची आवक झाली होती. याद्वारे २ कोटी ३३ लाख २१ हजार २०० रुपयांची उलाढाल झाली. दरम्यान, कांदयाला प्रतिक्विंटल सर्वसाधारण ७०० रुपये, किमान १०० रुपये तर कमाल १६५० रुपये दर मिळाला. गेल्या तीन वर्षांपासून अपवाद वगळता कांद्याचे दर उत्पादन खर्चापेक्षा कमीच राहिल्याचे चित्र आहे.

कांद्याचा उत्पादन खर्च प्रतिक्विंटल १४०० ते १८०० रुपये इतका आहे. उत्पादन खर्चाच्या निम्म्या दराने माल विकण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे. जिल्ह्यातील कांदा उत्पादकांना मोठा आर्थिक फटका बसत आहे. केंद्र सरकारने कांदा उत्पादक शेतकरी पूर्णपणे उद्ध्वस्त केले आहेत. कांदा उत्पादकांना न्याय देण्यासाठी शेतकरी संघटना लढा उभारेल, असे माजी राजू शेट्टी यांनी सांगितले.

कांद्याच्या दरातील ही घसरण केवळ बाजारातील चढ-उतार नसून धोरणात्मक अनिश्चिततेचा परिणाम असल्याचे स्पष्ट होत आहे. उत्पादन खर्च, निर्यातबंदी, जागतिक बाजारातील बदलती समीकरणे आणि स्थानिक मागणी यांचा ताळमेळ साधला नाही, तर कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे आर्थिक संकट आणखी गडद होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. भारतातील ग्राहकांना स्वस्त कांदा उपलब्ध व्हावा या उद्देशाने केंद्र सरकारन काही वर्षांत कांदा निर्यातीवर वारंवार निर्बंध घातले.

मात्र, या धोरणाचा विपरीत परिणाम संपूर्ण कांदा व्यवसायावर झाल्याचे जाणकारांचे मत आहे. निर्यातीतील अनिश्चिततेमुळे जागतिक बाजारपेठेत भारतीय कांदा व्यापाराची विश्वासार्हता कमी झाली आहे. परिणामी देशांतर्गत बाजारात कांद्याची आवक वाढून दर कोसळत असल्याचे सांगण्यात आले.

### शेतकरी क्षीण; संघटना निष्प्रभ?

सध्या कांद्याचे दर तळाला पोहोचले असतानाही राजकीय पटलावर या प्रश्नाची ठोस दखल घेतली जात नसल्याची खंत व्यक्त होत आहे. आर्थिकदृष्ट्या कमकुवत झालेला शेतकरी आणि निष्प्रभ ठरलेल्या संघटनांमुळे केंद्राच्या धोरणांविरोधात प्रभावी लढा उभारला जात आहे.

**- अण्णा बनसोडे, शेतकरी**



# युवा संशोधक ओम इंगळे याच्या अभिनव मॉडेलला 'पेटंट ग्रँट'

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २७ फेब्रुवारी-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील रसायनशास्त्र संकुलामध्ये पदव्युत्तर शिक्षण घेत असलेले युवा संशोधक ओम इंगळे व त्यांच्या संशोधन समूहाने विकसित केलेल्या Self Cleaning Public Toilet या अभिनव मॉडेलला भारत सरकारच्या पेटंट कार्यालयाकडून अधिकृतरित्या पेटंट ग्रँट प्राप्त झाले आहे. सामाजिक जाणीव आणि वैज्ञानिक दृष्टिकोन यांचा संगम साधत त्याने हे संशोधन पूर्ण केले.

स्वच्छता, सार्वजनिक आरोग्य आणि पर्यावरणपूरक तंत्रज्ञान यांचा संगम साधणारे हे मॉडेल भविष्यातील स्मार्ट सिटी संकल्पनेत महत्त्वाची भूमिका बजावू शकते. रसायनशास्त्रातील तांत्रिक ज्ञान आणि सामाजिक गरज यांचा संगम साधत या मॉडेलची रचना करण्यात आली आहे. सार्वजनिक स्वच्छतेच्या समस्येवर वैज्ञानिक दृष्टिकोनातून शाश्वत उपाय देण्याचा हा प्रयत्न आहे.

हे मॉडेल पूर्णतः स्वयंचलित प्रणालीवर आधारित असून मानवी हस्तक्षेप कमी करत स्वच्छता सुनिश्चित करते. या प्रणालीमध्ये स्वयंचलित पाण्याची फवारणी व निर्जंतुकीकरण प्रक्रिया, सेन्सर-आधारित वापर ओळख प्रणाली, कमी पाण्यात प्रभावी स्वच्छता तंत्र, दुर्गंधी नियंत्रणासाठी वैज्ञानिक उपाययोजना, पर्यावरणपूरक रसायनांचा आदी अत्याधुनिक तांत्रिक वैशिष्ट्यांचा समावेश आहे. भारत सरकारच्या पेटंट कार्यालयाकडून पेटंट ग्रँट होणे ही अत्यंत प्रतिष्ठेची बाब मानली जाते. यामुळे संशोधनाची मौलिकता व नाविन्य सिध्द झाले आहे. कॉपीराईट नोंदणीमुळे या मॉडेलच्या डिझाइन आणि संकल्पनेचे कायदेशीर संरक्षणही प्राप्त झाले आहे. ही उपलब्धी युवा संशोधकांच्या क्षमतेचे आणि विद्यापीठातील संशोधनपर वातावरणाचे प्रतीक आहे, असे सांगण्यात आले.



### समाजोपयोगी तंत्रज्ञान विकसित मानस

स्वच्छता ही केवळ मोहीम नसून ती सामाजिक जबाबदारी आहे. विज्ञानाच्या माध्यमातून समाजातील मूलभूत समस्यांवर उपाय शोधण्याचा आमचा प्रयत्न आहे. भविष्यातही असेच संशोधन करून समाजोपयोगी तंत्रज्ञान विकसितचा मानस आहे.

**-ओम इंगळे**

**सामाजिक परिवर्तनाची दिशा**

ही संकल्पना केवळ एक मॉडेल नसून सार्वजनिक आरोग्य आणि स्वच्छतेसाठी एक क्रांतिकारी पाऊल आहे. भविष्यात महानगरपालिका, शासकीय संस्था, खासगी क्षेत्र यांच्या सहकार्याने या मॉडेलची व्यापक अंमलबजावणी होऊ शकते. स्वच्छ भारत अभियानाच्या उद्दिष्टांना पूरक ठरणारे हे संशोधन सामाजिक परिवर्तनाची नवी दिशा दर्शवणारे आहे.

# 'नूमवि'च्या वतीने स्वातंत्र्यवीर सावरकर पुण्यतिथी, मराठी भाषा दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ फेब्रुवारी-**

येथील नूमवि अर्थात नूतन मराठी विद्यालयच्या वतीने स्वातंत्र्यवीर वि.दा. सावरकर पुण्यतिथी व मराठी भाषा दिननिमित्त विविध उपक्रम राबविण्यात आले. प्रारंभी पत्रकार विक्रम पाठक यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले.

मुख्याध्यापिका अर्चना कुलकर्णी यांनी आपल्या प्रास्ताविकेतून मुलांना स्वातंत्र्यवीर सावरकरांचे देशप्रेम किती जाजवल्य होते याबद्दल माहिती सांगितली. त्यानंतर मुलांना प्रोजेक्टरवर सावरकरांची चित्रफीत दाखविण्यात आली. छोटा गट निशिगंध मधील मुलांनी 'ने मजसी ने परत मातृभूमीला...' या गीतावर नृत्य केले. यावेळी ग्रंथदिंडीही काढण्यात आली. छोटा गट चाफामधील मुलांनी गीतावर नृत्य सादर केले. पत्रकार विक्रम पाठक यांनी स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जीवनकार्याविषयीची माहिती विशद करताना मुलांच्या मनात देशभक्ती चेतविले. नूतन मराठी विद्यालयच्या वतीने दिल्या जाणाऱ्या शिक्षणाबरोबर विविध उपक्रमाचे त्यांनी कौतुक केले. पाल्यांना इंग्रजी शाळांतून शिक्षण देण्याचे प्रमाण वाढले आहेत. नूमविच्या पालकांनी आपल्या पाल्यांना मराठी शाळेत दाखल केले, ही कौतुकास्पद बाब म्हणावी लागेल, असेही त्यांनी सांगितले. अंकिता कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले.




# नान्नजमध्ये उद्या ह.भ.प. इंदुरीकर महाराजांचे कीर्तन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ फेब्रुवारी-**

उत्तर सोलापूर तालुक्यातील नान्नज येथे छत्रपती शिवाजी महाराज जन्मोत्सवानिमित्त रांगड्या भाषेतून आणि विनोदी शैलीतून समाज प्रबोधन करणारे महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कीर्तनकार, समाज प्रबोधनकार ह.भ.प. निवृत्ती देशमुख (इंदुरीकर) यांचे रविवार, दि. १ मार्च रोजी रात्री ८.३० वाजता कीर्तन आयोजित केले आहे.



सोलापूर बार्शी रस्त्यावरील जी. बी. घोडके विद्यालयाच्या प्रांगणात हा भव्य कीर्तन सोहळा प्रकाश बाबू चोरेकर (शेठजी) शिवजन्मोत्सव मंडळ आणि शिवकृपा ग्रुप मित्र परिवार, नान्नज यांच्या वतीने आयोजित केला आहे. या कार्यक्रमामुळे पंचक्रोशीतील भाविकांमध्ये मोठे उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे. वाढती महागाई, तरुणांमधील व्यसनाधीनता, सोशल मीडियाचा अतिवापर आणि ढासळत चाललेली संस्कारांची शिदोरी यावर निवृत्ती देशमुख इंदोरीकर महाराज आपल्या खास शैलीत प्रबोधन करणार आहेत. नान्नज गावासह परिसरातील पंचक्रोशीतील नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकाच्या वतीने करण्यात आले आहे. महिलासह, पुरुषांकरिता बसण्याची स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली. वाहतूक कोंडी होऊ नये म्हणून स्वयंसेवकाची नियुक्तीही करण्यात आली आहे.

# आदीला नदी : प्रलंबित बांधकाम, वापर परवान्यावर कार्यवाही करा : महापौर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ फेब्रुवारी-**

आदीला नदी परिसरातील प्रलंबित बांधकाम परवानग्या, पूर्ण झालेल्या बांधकामांचे वापर परवाने देणे आणि अंतिम लेआउट मिळालेल्याच्या अडचणी यावर नियमांनुसार कार्यवाही करावी, असा आदेश महापौर विनायक कोंड्याल यांनी दिले. आदीला नदी व आपत्ती व्यवस्थानसंदर्भात सावित्रीबाई फुले सभागृह येथे आयोजित केलेल्या आढावा बैठकीत ते बोलत होते.

नाल्यांची कामे करताना नागरिकांना कोणताही त्रास होणार नाही याची विशेष दक्षता घ्यावी. कामे दर्जेदार, नियोजनबध्द व वेळेत पूर्ण करुन शहरातील पूरस्थिती टाळण्यासाठी प्रशासनाने समन्वयाने कार्य करावे, असेही त्यांनी सांगितले. दरम्यान, महापालिकेकडून अंतिम लेआउट मिळालेल्या नागरिकांनीही आपल्या अडचणी मांडल्या. या बैठकीत आदीला नदीसंदर्भात ब्ल्यू लाईन व रेड लाईन निश्चिती, योग्य मार्किंग, हिप्परगा तलावातील पाण्याची स्थिती, पूर आल्यानंतरची परिस्थिती तसेच नदी व नाल्यांचे खोलीकरण व रुंदीकरण यासंदर्भातही चर्चा करण्यात आली.



यावेळी उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, सभागृह नेते नरेंद्र काळे, आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे, अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, नगररचना संचालक मनीष भीष्णूरकर, नगर अभियंता सारिका आकुलवार, नगरसेवकद्वय भारतसिंग बडूरवाले, अजय पोन्नम, यांच्यासह प्रकाश दिवाणजी, नीलकंठ मठपती, शकील शेख, मनोज जाधव, चंद्रकांत गुंडे, नरेश पोबत्ती, अभिषेक टोणपे, अमीर शेख, सचिन लकारे, राहुल याटकर आदी उपस्थित होते.

**या १९ नाल्यांचे आहे काम सुरु**

आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत शहरातील ७४ नाल्यांच्या कामांचे सादरीकरण करण्यात आले. त्यापैकी मुरारजी पेठ (उमानगरी) नाला, एमआयडीसी वज्रेश्वरी नगर नाला (भाग १ व २), अक्कलकोट रोड ते पोगुल विहीर नाला, पोगुल विहीर ते हैदराबाद रोड नाला, हैदराबाद रोड ते आदर्श नगर नाला, आदर्श नगर ते शेळगी नाला, रिंग रोड ते रघोजी ट्रान्सपोर्ट ते शेळगी नाला, आरती नगर जमादार वस्ती ते नक्का वस्ती नाला, विश्रांती चौक ते अंतर्गत रिंगरोड ते राष्ट्रीय महामार्ग (रुपाभवानी मागे) नाला, कलावती नगर, आशा नगर, नेताजी शाळा, नवले नगर, कलप्पाण्णा नगर नाला, जयभवानी शाळा ते विश्रांती चौक नाला, नीलम नगर, शांती नगर नाला, सुमय्या नगर स्वागत नगर देसाई नगर नाला (भाग १ व २), विजय नगर, दीक्षित नगर, शोभा नगर नाला, होटगी रोड (युगंधर हॉस्पिटल डाव्या बाजूचा) नाला, मुलतानी बेकरी होटगी रोड क्रॉसिंग ते दक्षिण मध्य रेल्वे कल्व्हर्टपर्यंतचा नाला, वळसंगकर हॉस्पिटल मागील बाजू रामवाडी एरिया नाला अशा १९ नाल्यांचे काम सुरु आहे. यासाठी सुवर्ण जयंती योजनेतून निधी उपलब्ध झाला आहे, असे यावेळी सांगण्यात आले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी - १३६९

**जें अपत्य थानीहूंनि निगे। तयाची भूक ते मायेसीच लागे ।**
**एऱ्हवी तें शब्दें काय सांगे । मग स्तन्य दे येरी ।।**

अर्जुनाने मोहातून बाहेर पडून तात्काळ हे धर्मयुध्द करावे म्हणून भगवंत प्रयत्नशिल आहेत. पण अर्जुन युध्द करण्याच्या विचाराकडे न वळता, जास्तीत जास्त नवीन विषय श्रीकृष्णाकडून समजावून घेऊ इच्छित आहे. आपण युध्दभूमीत उभे आहोत हे पण अर्जुन ज्ञान जाणून घेण्याच्या लालसेत विसरला आहे. श्रीकृष्णाकडून सांगण्याचा एक विषय संपला की लगेच अर्जुन दुसरा विषय प्रश्नरुपाने विचारीत आहे. खरे म्हणजे प्रश्न विचारायला सुध्दा शहाणपण लागते. आपले लक्ष एकाग्र असेल तर कांही शंका, प्रश्न मनात येऊ शकतात. त्यासाठी लालसा, जिज्ञासा असावी लागते. अर्जुनाकडे हे सर्व आहे, म्हणूनच एखादा विषय संपत येताच तो दुसरा प्रश्न त्या विषयाच्या अनुषंगाने विचारतो आहे. अर्जुनाने आठव्या अध्यायाच्या प्रारंभी एका पाठोपाठ अनेक प्रश्न एकदम विचारले आहेत. तो म्हणतो आहे, हे पुरुषोतमा, ब्रम्ह म्हणजे काय ? कर्म कशाचे नाव आहे ? अध्यात्म ज्याला म्हणतात ते नेमक काय आहे ? अधिभूत ते कसे ? या विषयात आधीदैव ते कोण आहे ? अध्यात्म ते काय आहे ? या देहात तो कोण आहे ? एकाग्रचित्ताच्या पुरुषाकडून देहावसनाच्या वेळी तू कसा जाणला जातोस ? ते जाणणे कशा पध्दतीने घडते ? असे अनेक प्रश्न तो विचारीत आहे. आपल्या मुलाने आपणाला एकापेक्षा जास्त प्रश्न एकाच वेळी विचारले तर आपण त्याच्यावर रागावतो. त्याला म्हणतो, एक-एक प्रश्न विचार, नाहीतर विचारुच नकोस. पण अर्जुनाने अनेक प्रश्न एकदम विचारले असतांनाही, भगवंत रागावले नाहीत. ते हसत-हसत म्हणाले, व्वा अर्जुना तुझी जिज्ञासा पाहून मला आनंद वाटत आहे. मी तुझे समाधान होईल असे तुझ्या प्रश्नाचे उत्तर देतो.



माऊलींना या दोघांच्या एकमेकांवरील अधिकाराचे, प्रेमाचे कौतुक करावेसे वाटते. वक्ता आणि श्रोत्याचे असेच संबंध चोहीकंडे निर्माण झाले तर आनंदाला अंतच असणार नाही. अर्जुनाच्या मनातील विचार अगोदरच जाणून घेऊन भगवंतानी त्याच्यासमोर उत्तररुपी पक्वान्नाचे ताट वाढून ठेवले आहे. अर्जुनाच्या प्रश्नाचे उत्तर देण्याची भूक श्रीकृष्णालाच अगोदर कशी लागली आहे हे सांगतांना माऊली म्हणतात, जें अपत्य थानीहूंनि निगे । तयाची भूक ते मायेसीच लागे । ए-हवी तें शब्दें काय सांगे । मग स्तन्य दे येरी ।।. अर्थात, जे बाळ स्तनापासून दूर निघाले आहे, त्यावेळी त्या बाळाची भूक मातेला लागते. ए-हवी मला भूक लागली आहे, म्हणून मला दूध पाज असे बाळ मातेला सांगते काय ? बाळाने भूक लागल्याचे सांगीतले म्हणून माता नंतर दूध पाजते काय ? बाळ मातेला भूक लागल्याचे सांगत नाही, बाळाच्या अगोदरच त्याला पाजण्याची भूक मातेला लागत असते. तसे अर्जुन श्रीकृष्णाचे नाते आहे. अर्जुन प्रश्न विचारण्यापुर्वीच भगवंत त्याचे समाधान करण्यास उत्सुक आहेत. माऊलींनी येथे आई आणि बाळाच्या संबंधाची आठवण करुन दिली आहे. लहानपणी बाळाला एवढे जपणा-या मातेला मोठेपणी हे बाळ जपते का ? आईच्या दुधाची किंमत कशानेही चुकविता येत नसली तरीही आईची मन:पुर्वक सेवा करुन आनंदाने तिच्या ऋणात जगण्याचा प्रयत्न प्रत्येकांनी करावा अशी अपेक्षा. आपण आपल्या मुलांना प्रश्न विचारु दयावेत. त्याच्याशी समर्पक चर्चा करीत जावी.

**जय जय राम कृष्ण हरी।**


**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : शनिवार,**
**दि. २८ फेब्रुवारी २०२६**
**विक्रम संवत् २०८२ । शके -१९४७**
**संवत्सर - विश्वावसु**
**मास - फाल्गुन शु. द्वादशी**
**ऋतु - वसंत ।**
**नक्षत्र- पुनर्वसू(०९.३४)**
**योग -सौभाग्य (१७.०२)**
**करण - बव (०९.३६)**
**राहू काल : शनिवार**

**शनिवार : स. ९ ते १०.३०**
**दिनविशेष : राष्ट्रीय विज्ञान दिन. १९२८: सर सी. व्ही. रामन यांनी भौतिकशास्त्रातील महत्त्वपूर्ण रामन इफेक्ट चा शोध लावला १९३५: शास्त्रज्ञ वॅलेस कॅरोथर्स यांनी नायलॉनचा शोध लावला १९४०: पहिल्यांदा बास्केटबॉलचा खेळ टेलिव्हिजनवर प्रक्षेपित करण्यात आला.**



# ए.आय. युगात नैतिक जबाबदारीची जाणीव अनिवार्य

## राष्ट्रीय तांत्रिक महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी एंडवा इंडियाच्या व्हाइस प्रेसिडेंट संगीता भरत यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ फेब्रुवारी -**

ए.आय. ही मानवाने निर्माण केलेली प्रणाली आहे; ती 'ह्यूमन बिल्डिंग'चाच एक भाग आहे. तंत्रज्ञान आपल्यासाठी आहे, आपण तंत्रज्ञानासाठी नाही. त्यामुळे स्वत:वर नियंत्रण ठेवत जबाबदारीची जाणीव जपणे अत्यंत आवश्यक आहे, असे प्रतिपादन एंडवा इंडियाच्या व्हाइस प्रेसिडेंट संगीता भरत यांनी केले.

डब्ल्यू.आय.टी.मध्ये विज्ञान दिनानिमित्त आयोजित राष्ट्रीय तांत्रिक महोत्सव 'विचार-२०२६'च्या उद्घाटनप्रसंगी त्या प्रमुख मार्गदर्शक म्हणून त्या बोलत होत्या. कार्यक्रमाला वालचंद शिक्षण समूहाचे विश्वस्त इंजि. वैभव गांधी अध्यक्षस्थानी होते. प्राचार्य डॉ. विजय आठवले तसेच समन्वयक डॉ. सतीशकुमार काशीद यांची प्रमुख उपस्थिती होती.



डब्ल्यू.आय.टी.च्या सिव्हिल-मेकॅनिकल इमारतीतील सभागृहात झालेल्या या उद्घाटन सत्रात संगीता भरत यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता (ए.आय.) युगातील संधी, आव्हाने आणि नैतिक जबाबदाऱ्या यावर सखोल मार्गदर्शन केले. त्या म्हणाल्या, ए.आय.चा वापर करताना नैतिक मूल्ये जोपासणे, माहितीची पडताळणी करणे आणि विवेकबुद्धी जागृत ठेवणे ही काळाची गरज आहे. केवळ तांत्रिक कौशल्य पुरेसे नाही; त्यासोबत सामाजिक भान, संवेदनशीलता आणि प्रामाणिकपणा आवश्यक आहे. नाविन्यपूर्ण आणि समाजोपयोगी कल्पनांशिवाय तंत्रज्ञानाचा विकास अपुरा ठरतो.

वाद-विवाद आणि मतभिन्नता यांना सकारात्मक दृष्टीने स्वीकारण्याचे आवाहन करत त्या पुढे म्हणाल्या, बौद्धिक परिपक्वता म्हणजे समोरच्या मतांचा आदर राखत सन्मानपूर्वक संवाद साधणे. विज्ञान हा केवळ प्रयोगशाळेपुरता मर्यादित विषय नसून तो मानवाच्या सर्वांगीण विकासाचा पाया आहे. अभियांत्रिकी शिक्षण हे विज्ञानाचे प्रभावी अंग असून आज आपण ए.आय. जनरेशनमध्ये जगत आहोत. या क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर संशोधन सुरू असून नवनवीन आवृत्त्या सातत्याने विकसित होत आहेत.

अध्यक्षीय भाषणात इंजि. वैभव गांधी यांनी विद्यार्थ्यांना अशा संशोधनात्मक मंचावर आत्मविश्वासाने सहभागी होण्याचे आवाहन केले. वालचंद शिक्षण समूह विद्यार्थ्यांच्या संशोधनवृत्तीला चालना देण्यासाठी आधुनिक सुविधा आणि संसाधने उपलब्ध करून देत आहे. या संधींचा लाभ घेत विद्यार्थ्यांनी आत्मनिर्भर भारताच्या निर्मितीत सक्रिय योगदान द्यावे, असे त्यांनी सांगितले.

विज्ञान दिनाचे औचित्य साधून आयोजित 'विचार-२०२६'मध्ये ए.आय., नवतंत्रज्ञान, संशोधन आणि स्टार्टअप संधी यांवर विविध चर्चासत्रे घेण्यात आली. उद्घाटन सत्रातून विज्ञानाधिष्ठित दृष्टिकोन, संशोधनवृत्ती आणि नैतिकतेचा समन्वय साधण्याचा संदेश देण्यात आला.

'विचार-२०२६' अंतर्गत सिव्हिल, संगणक, इलेक्ट्रॉनिक्स, मेकॅनिकल व प्रथम वर्ष अशा पाच गटांमध्ये २३ स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. इनोव्हेशन, हॅकाथॉन, डिझाइन चॅलेंज, क्विझ, प्रोजेक्ट एक्झिबिशन व शॉर्ट फिल्म मेकिंग यांसारख्या उपक्रमांतून विद्यार्थ्यांच्या तांत्रिक कौशल्याला व्यासपीठ मिळणार आहे. 'ऑटोडेस्क स्पॉन्सर्ड डिझाइन चॅलेंज' ही विशेष आकर्षणाची स्पर्धा ठरणार आहे. स्वर्गीय भाऊसाहेब गांधी यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त महोत्सवाला विशेष उत्साह लाभला आहे.



# कुचन प्रशालेचे एनएमएमएस परीक्षेत यश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ फेब्रुवारी-**

पद्मशाली शिक्षण संस्था संचलित कुचन प्रशालेतील इयत्ता आठवीच्या ५ विद्यार्थ्यांनी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये घेण्यात आलेल्या राष्ट्रीय दुर्बल घटक शिष्यवृत्ती परीक्षा (एन.एम.एम.एस.) परीक्षेत घवघवीत यश मिळवले आहे. या विद्यार्थ्यांना प्रशालेतील सहशिक्षक शरीफ चिखळ्ळी , शुभांगी माने, सपना मोरे, शिवशंकर स्वामी यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थ्यांचे पद्मशाली शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ॲड श्रीनिवास क्यातम, उपाध्यक्ष प्रा. श्रीनिवास कोंडी, सचिव दशरथ गोप, सहसचिव मल्लिकार्जुन सरगम, खजिनदार गोवर्धन कमटम, शालेय समिती अध्यक्ष विजयकुमार गुल्लापल्ली, प्राचार्य युवराज मेटे, उपप्राचार्य अनिल निंबाळकर, उपमुख्याध्यापक मधुकर धर्मसाले, पर्यवेक्षक दत्तात्रय मेरगु, प्रणिता सामल,मल्लिकार्जुन जोकारे यांनी कौतुक केले.

**यशस्वी विद्यार्थी :** श्रेयस सुनील उदगिरी, सुनील अमर गुंजाळ, राजवीर संतोष पवार, ऋषिकेश गिरीष पोला, श्रीहर्ष अंबादास गोडबरलू.

# उद्यापासून रुक्मिणी महोत्सव; मिनी सरस प्रदर्शन

## ग्रामीण उत्पादने, खाद्य मेजवानी आणि सांस्कृतिक कार्यक्रमांची पर्वणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२७ फेब्रुवारी-**

उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान यांच्या माध्यमातून महिला स्वयंसहाय्यता समूहांचे सामाजिक व आर्थिक सबलीकरण करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून रुक्मिणी महोत्सव मिनी सरस विक्री व प्रदर्शन आयोजन करण्यात आल्याची माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी दिली आहे.

या प्रदर्शनाचा उद्घाटन समारंभ दि. १ मार्च रोजी दुपारी वाजता महाराष्ट्र राज्याचे ग्रामविकास व पंचायत राज मंत्री तथा पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते संपन्न होणार आहे. याप्रदर्शन दि.१ ते ५ मार्च या कालावधीत नॉर्थकोट मैदान, महानगरपालिका समोर, सोलापूर येथे भरविण्यात येणार आहे. सोलापूर जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमधून सुमारे ७५ स्टॉल्स तसेच इतर जिल्ह्यांतील ५ स्टॉल्स सहभागी होणार आहेत. प्रदर्शनात सोलापुरी कडक भाकरी, शेंगाचटणी, दुग्धजन्य पदार्थ, हस्तकला वस्तू, लाकडी बैलगाडी व खेळणी, कापडी पिशव्या, लोकरी जेन धोंगडी, मिलेट पदार्थ व कुकीज, मसाले, कोल्हापुरी चप्पल, सेंद्रिय डाळी, बजारा आर्ट, फळे व भाजीपाला उत्पादने आदी नाविन्यपूर्ण उत्पादने उपलब्ध असणार आहेत. जिल्ह्यात खाद्यप्रेमींसाठी विशेष मेजवानीची व्यवस्था करण्यात आली आहे.

### सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन

प्रदर्शन कालावधीत दररोज सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दि. १ मार्च रोजी सकाळी ११ ते १ या वेळेत येडवे-बिदरकर यांचा प्रबोधनात्मक कार्यक्रम होणार आहे. २ मार्च रोजी तुळजाभवानी महिला स्वयं सहाय्यता समूह, टेभूर्णी यांचा भारुड कार्यक्रम सादर केला जाणार आहे. ३ मार्च रोजी सायंकाळी ५ ते ८ या वेळेत 'खेळ पैठणीचा' हा कार्यक्रम होईल. ४ मार्च रोजी सायंकाळी ५ ते ८ या वेळेत ए.एस.म्युझिक ऑर्केस्ट्राचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. ५ मार्च रोजी दुपारी ३ ते ५ या वेळेत उमेद अभियानातील महिलांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी विशेष सांस्कृतिक कार्यक्रम होणार असून सायंकाळी ५ वाजता समारोप समारंभ संपन्न होणार आहे.

# 'सिद्धेश्वर वुमन्स'मध्ये आग सुरक्षा व्यवस्थापनाचा मॉक ड्रिल



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ फेब्रुवारी-**

सिद्धेश्वर वुमन्स पॉलिटेक्निक सोलापूर मध्ये ''आग सुरक्षा व्यवस्थापनाच्या मॉक ड्रिल'' चे आयोजन करण्यात आले होते. आग लागल्यावर वेगाने कार्यवाही करणे आणि योग्य सुरक्षा उपाय योजनेचे महत्त्व लक्षात घेत, आग सुरक्षा व्यवस्थापन कार्यशाळा आयोजित केली गेली.

कार्यशाळेत अग्निशामक यंत्रणा, अग्निसंवेदनशील क्षेत्र, आपत्कालीन सूचना प्रणाली आणि अग्निशमनासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानावर सखोल माहिती देण्यात आली.

सहभागींच्या सुरक्षिततेसाठी, पॅटर्न आणि प्रत्यक्ष परिस्थितीत कार्यप्रदर्शन करण्यासाठी विविध प्रात्यक्षिके देखील आयोजित केली गेली. प्रात्यक्षिक मध्ये मॉक ड्रिल चा उद्देश आग लागल्यावर तत्परतेने आणि प्रभावीपणे प्रतिक्रिया देण्याची तयारी तपासणे होते.

सोलापूर अग्निशमन दलाचे प्रमुख अधिकारी राकेश साळुंखे , श्रीकांत भडके व अग्निशामक दलाचे इतर कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

या मॉक ड्रिलला कॉलेजचे प्राचार्य गजानन धरणे, एनएसएस युनिटचे प्रमुख प्रा. प्रतिभा पाटील व सर्व विभाग प्रमुख उपस्थितीत होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्युत विभागातील प्रा. प्रवीण गौडा, प्रा. गायत्री लंगोटे, प्रा. संग्राम माने, प्रा. कोमल कांबळे, प्रा. वृषाली अंदेली, मधुमती किनीकर, धोंडप्पा कोळी आदींनी परिश्रम घेतले.

# ए.जी. पाटील इन्स्टिट्यूटमध्ये 'क्लाउड इंटिग्रेटेड एम्बेडेड सिस्टिम्स'वर कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ फेब्रुवारी-**

येथील शांती एज्युकेशन सोसायटी संचलित, ए. जी. पाटील इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी मधील इलेक्ट्रॉनिक्स अ‍ॅण्ड टेलिकम्युनिकेशन अभियांत्रिकी विभागातर्फे 'क्लाउड इंटिग्रेटेड एम्बेडेड सिस्टिम्स' या विषयावर तीन दिवसीय राज्यस्तरीय फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम उत्साहात पार पडला.

दि इन्स्टिटयूशन ऑफ इंजिनिअर्स (इंडिया), सोलापूर लोकल सेंटर आणि अर्णव इन्फोटेक यांच्या सहकार्याने या उपक्रमाचे आयोजन केले होते. याचे उद्घाटन डॉ. श्रीकांत जोशी यांच्या हस्ते झाले. कार्यशाळेत डॉ. वैभव डी. बचुवार आणि डॉ. प्रसन्न एम. गव्हाणे यांनी मार्गदर्शन केले. समारोप प्रसंगी इंजि. ओम प्रकाश दरक उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष सिद्धेश्वर ए. पाटील, सचिव शिवानंद एस. पाटील, डॉ. एम. ए. चौगुले, प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. पोतदार, डॉ. आर. व्ही. दरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम यशस्वी झाला. सूत्रसंचालन प्रा. पी. बी. साबळे यांनी केले. पाहुण्यांची ओळख प्रा. आर. डी. मैत्री, प्रा. एस. एन. कांबळे व प्रा. एम. एस. बिराजदार यांनी करून दिली.

एफडीपीचे समन्वयक प्रा. एस. जे. लिगाडे यांनी कार्यशाळेच्या उद्दिष्टांची माहिती दिली. आभार डॉ. आर. व्ही. दरेकर यांनी मानले. आयोजन समितीतील प्रा. एस. आर. साखरे, प्रा. एस. पी. कटके, प्रा. एस. एस. मेटागर, प्रा. आर. बी. बिराजदार तसेच तांत्रिक सहाय्यक एन. एस. अळगी, पी. बी. वालिकर आणि विद्यार्थी समन्वयक प्रथमेश रामपोगु यांनी परिश्रम घेतले.



# एसपीएम स्कूल येथे मराठी दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ फेब्रुवारी-**

एसपीएम इंग्लिश स्कूल, येथे मराठी भाषा दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमासाठी सीमा दुधगी व श्रीधर खेडगीकर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने व सरस्वती वंदनेने झाली. विद्यार्थ्यांनी विविध सादरीकरण केले. कार्यक्रमात कुसुमाग्रज यांची कविता गार्विक मुळे याने सादरीकरण केले, भाषण , मराठी गीते आणि प्रश्नमंजुषा अशा विविध कार्यक्रमांमध्ये उत्स्फूर्त सहभाग घेतला.

प्राचार्या संगीता कोळी यांनी आपल्या मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल शाळेचे अध्यक्ष माननीय राजेश पटवर्धन यांनी शुभेच्छा दिल्या. सूत्रसंचालन प्रिशा भांगे या विद्यार्थ्यांनीने उत्कृष्टरीत्या केले व शेवटी सृष्टी दांडगे हिने मानले. तसेच विद्यार्थ्यांनी मराठमोळा पोशाख परिधान करून शाळेच्या परिसरात मराठी हे अक्षर साकारले. कार्यक्रमाचे नियोजन मराठी विषय शिक्षिका अश्विनी जानराव व सर्व शिक्षक वर्ग यांनी केले होते.

# मुलींना घडवण्याचे स्वप्न

## टेनिसपटू संध्याराणी बंडगरचा संकल्प

आंतरराष्ट्रीय लॉन टेनिस खेळाडू संध्याराणी बंडगर हिचा क्रीडा प्रवास अत्यंत रंजक आणि प्रेरणादायी आहे. एका योगायोगातून सुरू झालेला हा प्रवास आज भारतीय संघाच्या नेतृत्वापर्यंत पोहोचला आहे.

बऱ्याचदा आयुष्यात आपण एखादी गोष्ट एका ध्येयाने करायला जातो आणि नियती आपल्याला दुसऱ्याच एका मोठ्या यशाकडे घेऊन जाते. भारताची आंतरराष्ट्रीय टेनिस खेळाडू संध्याराणी बंडगर हिच्या बाबतीतही नेमके असेच घडले. आज टेनिस कोर्टवर आपल्या बॅकहँड आणि फोरहँडने प्रतिस्पर्ध्याला जेरीस आणणाऱ्या संध्याराणी यांचा टेनिसमधील प्रवेश एका योगायोगातून झाला.



**२४ मोठ्या स्पर्धांतून ३९ पदकांची कमाई**

२०१७ पासून सुरू झालेला हा प्रवास २०२५ पर्यंत यशाच्या शिखरावर पोहोचला आहे. गेल्या आठ वर्षांत तिने राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. भारत आणि महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व करत एकूण २४ मोठ्या स्पर्धांमध्ये सहभागी होत आपल्या कौशल्याच्या जोरावर तिने आतापर्यंत १७ सुवर्ण १३ रौप्य व ९ कास्य अशी तब्बल ३९ पदके पटकावली आहेत. या कामगिरीमागे तिचे प्रशिक्षक सुधीर सालगुडे आणि मार्गदर्शक राजीव देसाई यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या कडक शिस्तीमुळे आणि मार्गदर्शनामुळेच संध्याराणी आज या टप्प्यावर पोहोचू शकली.

### स्पर्धा तपशील व प्राप्त पदके

मास्टर्स इंटरनॅशनल टेनिस फेडरेशन : १४
ऑल इंडिया सिव्हिल सर्विसेस टेनिस टूर्नामेंट : १२
ऑल इंडिया फॉरेस्ट स्पोर्ट्स मीट: १३

**एका बंद दरवाजातून मिळालेली नवी दिशा**

सोलापुर येथील सामाजिक वनीकरण विभागात २०१७ मध्ये सेवेत लागलेल्या संध्याराणीने सुरुवातीला केवळ स्वतःच्या फिटनेससाठी कुमठा नाका जिल्हा क्रीडा संकुल येथील बॅडमिंटन हॉलमध्ये बॅच लावण्यासाठी पाऊल टाकले होते. मात्र, तो हॉल दुरुस्तीसाठी काही काळ बंद होता. वेळ वाया घालवण्याऐवजी त्यांनी बाजूलाच असलेल्या सोलापूर डिस्ट्रीक्ट लॉन टेनिस असोसिएशनमध्ये टेनिस खेळण्यास सुरुवात केली. तोपर्यंत केवळ वेळ घालवण्यासाठी सुरू केलेला हा खेळ त्यांना इतका आवडू लागला की, बॅडमिंटन हॉल सुरू झाल्यावरही त्यांनी टेनिसची साथ सोडली नाही. याच आवडीचे रूपांतर पुढे एका जागतिक स्तरावरील करिअरमध्ये झाले.

**अविस्मरणीय क्षण: भारताचे नेतृत्व**

प्रत्येक खेळाडूचे स्वप्न असते की आपल्या देशाच्या जर्सीमध्ये मैदानात उतरावे. संध्याराणीसाठी २०२५ सालची टर्की येथील वर्ल्ड चॅम्पियनशिप ही सर्वात मोठी स्पर्धा ठरली. या स्पर्धेत केवळ तिची ४५ वर्षांवरील भारतीय संघात निवडच झाली नाही, तर तिला भारतीय संघाचे कर्णधार म्हणून जबाबदारी सोपवण्यात आली. तिरंग्याचे नेतृत्व करतानाचा तो क्षण तिच्या आयुष्यातील सर्वात मानाचा आणि अविस्मरणीय ठरला.



**स्ट्रेट ड्राईव्ह**
**अजितकुमार संगवे**
**मो.9881133103**

**भविष्यातील ध्येय: सामाजिक बांधिलकी**

सामाजिक वनीकरण विभागात मुख्य लेखापाल या पदावर संध्याराणी कार्यरत आहेत. ही जबाबदारी सांभाळून केवळ स्वत:साठी न खेळता, आपल्या खेळाचा फायदा समाजातील इतर मुलींना व्हावा, अशी संध्याराणीची धारणा आहे. भविष्यात आपल्यासारखेच दर्जेदार खेळाडू घडवण्यासाठी मुलींना टेनिसचे मोफत मार्गदर्शन देण्याचे तिचे ध्येय आहे. खेळाडू म्हणून मिळालेले अनुभव आणि तंत्रज्ञान नव्या पिढीपर्यंत पोहोचवून भारतासाठी आणखी संध्याराणी तयार करण्याचा त्यांचा मानस कौतुकास्पद आहे.

**''जिथे जिद्द असते, तिथे संधी आपोआप चालून येते. संध्याराणी बंडगर हिचा प्रवास हेच सिद्ध करतो की, प्रयत्न प्रामाणिक असतील तर यश नक्कीच मिळते.''**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### एमआयटी कॉलेजमध्ये शिवजयंतीनिमित्त सांस्कृतिक सप्ताह

**बार्शी, दि. २७ फेब्रुवारी-**

माईर्स एमआयटी पुणे संचालित बार्शी येथील एमआयटी आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालयात छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त सांस्कृतिक सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. सांस्कृतिक सप्ताहात रेट्रो डे, बॉलीवूड डे आणि पारंपरिक वेशभूषा दिन असे विविध उपक्रम आयोजित करण्यात आले. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आपल्या कलागुणांची प्रभावी झलक सादर केली. या सप्ताहाचा बक्षीस वितरण समारंभ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सचिन चव्हाण यांच्या हस्ते संपन्न झाला. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी कार्यक्रम प्रमुख प्रा. जगनाडे तसेच प्रा. अनिकेत कारंडे, प्रा. सोनवणे, क्रीडा शिक्षक प्रा. अमोल मिरगणे यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन विद्यार्थिनी नम्रता भालेराव, आभार प्रा. बोंडगे यांनी मानले.



### शंकरलिंग प्रशालेचे एनएमएमएस परीक्षेत यश

**वळसंग, दि. २६ फेब्रुवारी-**

वळसंग (ता.द. सोलापूर) शासनातर्फे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता डिसेंबर २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती म्हणजे एन.एम.एम.एस.परीक्षेस श्री शंकरलिंग प्रशालेतील इयत्ता आठवीमधील एकूण ३३ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी २३ विद्यार्थी उत्तीर्ण होऊन प्रशालेस घवघवीत यश मिळवून दिले आहेत. या यशस्वी विद्यार्थ्यांना संजयकुमार धनशेट्टी, विजयालक्ष्मी थळंगे, सिध्दाराम भैरामडगी, शैला निंबाळ, निलकंठ कवटगी, श्रीमंत भोसले, सिद्धारूढ हिरेमठ, स्नेहा हळगोदे, गंगाधर बिराजदार, विजय प्याटी, शिवराज अष्टगी, मल्लिनाथ गौडगाव यांचे मार्गदर्शन लाभले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थाध्यक्ष श्रीशैल दुधगी, चेअरमन शिवशरण थळंगे, उपाध्यक्ष विश्वनाथ थळंगे, सदस्य शिवशरण प्याटी, प्रकाश दुधगी, मल्लिनाथ थळंगे, रमेश दुधगी, शंकर केशट्टी, संजय दुधगी, प्राचार्य विरेश थळंगे, पर्यवेक्षक शिवानंद घोडके आदींनी अभिनंदन केले. परीक्षेच्या कामकाजासाठी परीक्षा विभाग प्रमुख बाळकृष्ण गुंड यांना कनिष्ठ लिपिक गौरीशंकर चनशेट्टी व शिक्षक बसवराज दुधगी यांचे सहकार्य लाभले.



### पंढरपुरात मुद्रण व्यावसायिकांचा सन्मानचिन्ह देवून गौरव

**पंढरपूर, दि. २७ फेब्रुवारी-**

पंढरपूरची मुद्रण परंपरा खूप जुनी, अगदी देशाच्या स्वातंत्र्यापूर्वीची आहे. मुद्रण क्षेत्रात नवनवीन बदल झाले तरी नव्या-जुन्याचा संगम साधत होतकरु तरुणांनी ही परंपरा सांभाळून ठेवल्याचे प्रतिपादन येथील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ पदाधिकारी रमेश घळसासी यांनी केले. जागतिक मुद्रण दिनानिमित्त पंढरपूर युवा मुद्रक संघटनेच्या वतीने नव्या पिढीच्या कष्टाळू, प्रामाणिक मुद्रण-व्यावसायिकांच्या गौरवपूर्ण सन्मानचिह्न देवून सन्मान घळसासी यांच्या हस्ते केला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी, पंढरीच्या डीटीपी क्षेत्राचे यशस्वीकर्ते अतुल बहिरट होते. याप्रसंगी युवा मुद्रक संघाचे जनक अध्यक्ष दत्ताजी पाटील, सचिव रामकृष्ण बिडकर, बबनराव सुरवसे, श्रीराम रसाळ उपस्थित होते. सूत्रसंचालन संघटनेचे आधारस्तंभ मंदार केसकर यांनी केले. मुद्रण दिना निमित्त येथील सुरज कोठारी, अमोल चव्हाण, श्रीनाथ साळुंखे, मंदार केसकर, रामकृष्ण बिडकर, शिवम पाटील, सुरज सुरवसे, स्वप्नील यादव, शुभम परदेशी, श्रीराम रसाळ, संतोष गोंजारी, विधेंद्र मोरे, गणेश वायचळ, शितल कोठारी, आकाश साळुंखे आदींचा सन्मान करण्यात आला.



### विष्णुपंत कुलकर्णी स्कूलमध्ये अंगत-पंगत नाईट कॅम्प उत्साहात

**माळशिरस, दि. २७ फेब्रुवारी-**

विष्णुपंत कुलकर्णी इंग्लिश स्कूल येथे विद्यार्थ्यांसाठी 'अंगत-पंगत' हा नाईट कॅम्प सायंकाळी पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजन व मारुती स्तोत्र पठणाने करण्यात आली. उपक्रम यशस्वी करण्यासाठी प्राचार्य इनामदार, सर्व शिक्षक-शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. या उपक्रमाबद्दल संस्थेचे अध्यक्ष ॲड. माधव मिरासदार, कार्याध्यक्ष ॲड. मिलिंद कुलकर्णी, कार्यवाह राम दोशी, सहकार्यवाह राजाराम ढाले तसेच संचालक मंडळातील सर्व पदाधिकाऱ्यांनी शाळेचे कौतुक केले. कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये टीमवर्क, नेतृत्वगुण, आत्मविश्वास, स्वयंशिस्त व संस्कारांची जडणघडण होण्यास मदत झाली असून सर्व स्तरांतून समाधान व्यक्त करण्यात आले.

# कुर्डूवाडी नपाकडून करवाढ नसलेला शिलकी अर्थसंकल्प सादर

**आरोग्य व स्वच्छतेसाठी भरीव तरतूद**

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डूवाडी,दि.२७ फेब्रुवारी-**

कुर्डूवाडीच्या नगराध्यक्षा जयश्री भिसे यांनी सन २०२६-२७ या वर्षासाठी नगरपालिकेच्या के.एन.भिसे सभागृहात अर्थसकल्प मांडला. कोणतीही करवाढ नसलेला, स्वच्छता व आरोग्यसाठी ५ कोटी ५३ लाख ४१ हजार ८०० रूपये एवढी भरीव तरतूद असलेला ४ लाख ७५ हजार १०९ रूपयांचा हा शिलकीचा अर्थसंकल्प मंजूर करण्यात आला.

नगराध्यक्षा भिसे यांच्या अध्यक्षतेखाली उपनगराध्यक्षा सविता जगताप, मुख्याधिकारी सचिन तपसे यांच्या उपस्थीतीत सन २०२५- २०२६ चा सुधारीत अर्थसंकल्पीय अंदाज व सन २०२६-२०२७ अर्थसकल्पीय अंदाज मुख्याधिकारी यांनी तयार केला. नगराध्यक्षा भिसे यांनी तो सभागृहात माडून मंजूर करून घेतला. बजेटची मिटींग असताना विरोधकाकडून मात्र विषय भरकटत नेण्याचा प्रयत्न करून जूनेच पण तेही राज्य सरकारच्या अखत्यारीत असणारे विषय पुढे केले जात होते. त्यावर बजेटवर बोला असे नगराध्यक्षांनी सुनावले. अर्थसकल्प मंडत असताना माजी नगराध्यक्ष गटनेते समिर मुलाणी यांनी महात्मा फुले शाँपिंग सेंटरचे तसेच पं.स.समोरचे जब्बारशेठ मुलाणी शाँपिंग सेंटरचे गाळे का बद आहेत असा जाब विचारला. वास्तविक मुलाणी




यांचा विषय, प्रश्न योग्यच होता. कारण ते गाळे पाच ते पंधरा वर्ष झाले पडून आहेत. त्या-त्या वेळच्या नगराध्यक्षांनी यावर तोडगा काढणे गरजेचे होते. पण ते झाले नाही. तोच प्रश्न सभाग्रहात मुलाणी यांनी लावून धरला. यावर कार्यालयीन अधिक्षक बापू चोभे यांनी तो विषय अधिकचे डीपाँझीट व भाडे यामुळे निर्माण झाला असून राज्यसरकारच्या अखत्यारीत विषय येतो. तरीही आपण त्रिस्तरीय समितीपुढे ठेवून तोडगा काडण्याचा प्रयत्न करू असे सांगीतले. या गाळ्यापोटी न.पा.ला मिळणारे पाच वर्षात ३ कोटी रूपयांचे नुकसान झाले आहे. यावेळी मुलाणी यांनी नगरसेवकांना वार्डातील कामे करण्यासाठी तांत्रीक फंडाची रक्कम वाढवण्याचीही मागणी केली. काल झालेल्या नगरपालीकेतील भांडणात बिले काढण्यासाठी खटके या कर्मचा-याला शिवीगाळ करण्यात आली याचा निषेध मुलाणी यांनी सभाग्रहात केला. मात्र मुलाणी यांच्या प्रत्येक प्रश्नावर सत्ताधारी एकाही नगरसेवकासह नगराध्यक्षा भिसे यांनीही उत्तर देणे महत्वाचे समजले नाही. नगरसेवक अमर माने यांनी मुख्याधिकारी तपसे रेग्यूलर येत नाहीत. फाईली पाहत नाहीत. त्यामुळे सह्यांची अडचण येते. खुद्द कर अधिकारी यांनी भर सभागृहात मुख्याधिकारी आले नसल्याने सह्या झाल्या नसल्याचे सांगीतले. तर एक नळ कनेक्शन असताना दोन कनेक्शनचे बील दिले जाते अशी खंत आरोग्य समिती सभापती मोहसिन मकनू यांनी व्यक्त केली. सर्वात महत्वाचा मुद्दा नगरसेविका वृशाली गांधी यांनी मांडला. रेल्वे व पं.स.कडून नगरपालिकेस ८५ लाख रू.पाणीपट्टी येते. बार्शी नगरपालिका पाईपलाईनचा देखभाल दुरूस्ती पाहते. जर रेल्वे प्रशासन स्वतःसाठी पर्याय तयार करणार आहे आणी बार्शी न.पा.स्वतंत्र पाईपलाईन करत आहे तर पुढे प्रश्न गंभीर आहे. आपले काय पर्याय आहेत या प्रश्नावर मात्र अधिका-यांकडे समावेशक उत्तर नव्हते. नागरीकांच्या थकीत शास्ती कर रद्द करण्यात यावा अशी मागणी आर.पी.आयचे चद्रकांत वाघमारे यांनी पत्राद्वारे केली होती. याचाही विचार करून दोन टक्के शास्ती कर भरून घेतला जाणार नसल्याचे नगराध्यक्ष भिसे यांनी सांगीतले. सर्वात शेवटी उपनगराध्यक्षा सविता जगताप यांनी आपण शहर स्वच्छ करण्यास निघालो आहोत मात्र अगोदर पालिका स्वच्छ करावी शहरात महीलांसाठी स्वच्छतागह उभा करावीत असे सांगीतले. यावेळी सर्व आरोग्य समिती सभापती मेहसिन मकनू यांच्यासह सर्व समिती सभापती, नगरसेवक धनंजय डिकोळे, शकीलभाई तंबोळी, वृशाली गांधी, अंजली गावडे,अबोली चौधरी,रेश्मा गोरे यासह सर्व अधिकारी, कर्मचारी उपस्थीत होते.



### संगीत विशारद परीक्षेत पोतदार यांचे यश

**नरखेड, दि. २७ फेब्रुवारी-**

अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळ मुंबई यांच्या वतीने घेण्यात आलेल्या संगित विशारद परिक्षेमध्ये डिकसळ ता. मोहोळ येथील प्रथमेश ज्ञानेश्वर पोतदार यांनी प्रथम क्रमांक मिळवून यश संपादन केले आहे. प्रथमेशला गुरुवर्य अण्णासाहेब सुरवसे यांचे मार्गदर्शन लाभले. प्रथमेश हा सुरवसे कडे मागील सात ते आठ वर्षापासून सुगम संगीत, शास्त्रीय संगीत, या प्रकारचे संगीताचे धडे घेत आहेत. प्रथमेश यांना पिता पुत्र ऋषिकेश अण्णासाहेब सुरवसे (भोयरेकर) यांचे मार्गदर्शन लाभत आहे.

## लोकवर्गणीतून उभा राहिला वाळूज-साखरेवाडी मार्ग



**तभा वृतसेवा,**
**वाळूज, दि. २७ फेब्रुवारी-**

मोहोळ तालुक्यातील वाळूज-साखरेवाडी दरम्यानचा सुमारे दोन किलोमीटरचा रस्ता पूर्णतः उखडल्याने नागरिकांचे हाल होत होते. रस्त्याच्या कडेला काटेरी झाडे व झुडपे वाढल्याने हा मार्ग वाहतुकीस अत्यंत धोकादायक बनला होता. अनेक वर्षांपासून दुरुस्तीच्या प्रतीक्षेत असलेल्या या रस्त्यावर दुचाकी, चारचाकी तसेच पायी जाणाऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. जागोजागी पडलेल्या मोठमोठ्या खड्ड्यांमुळे प्रवास जिकिरीचा झाला होता आणि अपघातांचाही धोका वाढला होता.

जाधववस्ती येथे मोठी लोकवस्ती असल्याने या परिसरातील नागरिक सातत्याने रस्त्याची मागणी करत होते. मात्र स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाकडून या समस्येकडे दुर्लक्षच करण्यात आले. वारंवार तक्रारी करूनही त्याची दखल घेतली गेली नाही.

या परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी जाधववस्तीतील नागरिकांनी एकत्र येत लोकवर्गणी गोळा केली. जमा झालेल्या रकमेतून रस्त्यावरील खड्ड्यांत दगड टाकून मुरूम अंथरण्यात आला. जेसीबी व ट्रॅक्टरच्या साहाय्याने जाधववस्ती ते साखरेवाडी असा २ किलोमीटरचा कच्चा रस्ता तयार करण्यात आला. तसेच रस्त्याच्या कडेला वाढलेली काटेरी झाडे व झुडपेही स्वखर्चाने काढण्यात आली. या लोकसहभागातून साकारलेल्या कामामुळे शेतकरी, वाहनधारक व नागरिकांमधून समाधान व्यक्त केले जात आहे. या उपक्रमासाठी धनाजी मोटे, लालचंद मोटे, प्रवीण मोटे, आबासाहेब कादे, ज्ञानेश्वर कादे यांनी सहकार्य केले. लोकप्रतिनिधींनी दुर्लक्ष केल्यावर नागरिकांनीच पुढाकार घेत स्वतःच्या मेहनती व वर्गणीतून रस्ता उभारल्याने हा उपक्रम ग्राम एकजुटीचे उदाहरण ठरत आहे.



## स्वेरीमध्ये संत गाडगे बाबांची जयंती साजरी

**पंढरपूर, दि. २७ फेब्रुवारी-**

स्वेरी इंजिनिअरिंग कॉलेज मध्ये राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) विभागाच्या वतीने संत गाडगेबाबा यांची १५० वी जयंती साजरी करण्यात आली. स्वेरीचे प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम. पवार यांच्या सहकार्याने व उपप्राचार्या डॉ.मिनाक्षी पवार यांच्या नेतृत्वाखाली याचे आयोजन करण्यात आले. यावेळी स्वेरीज् कॉलेज इंजिनिअरिंगचे वरिष्ठ प्रा. डॉ. पी.आर. कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी मेकॅनिकल इंजिनिअरिंगचे वरिष्ठ प्रा. डॉ. पी.आर. कुलकर्णी हे मार्गदर्शन करत होते. प्रारंभी संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी विद्यार्थी अधिष्ठाता डॉ. एम. एस. मठपती, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. अमोल चौंडे यांच्यासह सर्व अधिष्ठाता, पाचही विभागांचे विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, पालक व विद्यार्थी आदी उपस्थित होते. डॉ. नीता तळवलकर यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले.



## जि.प. व पंचायत समितीमध्ये निवडून आलेल्या सदस्यांचा श्रीपूरमध्ये सत्कार

**श्रीपूर, दि. २७ फेब्रुवारी-**

नुकत्याच झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत माळशिरस तालुक्यात वेळापूर जिल्हा परिषद गटात मिनाक्षी सरतापे, जांबूड जिल्हा परिषद गट नागेश भोसले, तर पंचायत समिती जांबूड गणातून अप्पासाहेब पाटील हे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार निवडून आले.

या विजयी नूतन सदस्यांचा सत्कार श्रीपूर येथे डॉ. सुहास बनसोडे यांचे परिवाराचे वतीने श्री सेवा रुग्णालय मध्ये करण्यात आला. याप्रसंगी नंदकुमार केंगार, किरण धाईंजे, मिलिंद सरतापे, शामराव भोसले, भारत आठवले, दशरथ नवगिरे, बापूसाहेब पोळके, संजय भोसले, गणेश सावंत, अशोक चव्हाण, संजय खरे, रमेश भोसले, प्रथमेश लोंढे, विश्वजीत भालशंकर, अजित भोसले, संदीप घाडगे, नितीन घाडगे, शहाजी चंदनशिवे, भारत काळे उपस्थित होते. आभार शामराव भोसले यांनी मानले.

### 'सीग्राम्स एक्सक्लेमेशन' चा थाटात शुभारंभ

**सोलापूर, दि. २७ फेब्रुवारी-**

पर्नोड रिकार्ड इंडिया ने महाराष्ट्रात सीग्राम्स एक्सक्लेमेशन या नव्या ब्रँडचा शुभारंभ जाहीर केला आहे. गेल्या ३० वर्षांतील कंपनीची ही सर्वात महत्त्वाकांक्षी आणि नाविन्यपूर्ण घोषणा मानली जात आहे. सिग्राम्स एक्सक्लेमेशन हा भारतातील एकमेव असा ब्रँड पोर्टफोलिओ आहे, ज्यामध्ये एकाच ब्रँडअंतर्गत पाच वेगवेगळ्या स्पिरिट्स प्रकारांचा समावेश आहे. व्हिस्की, व्होडका, जिन, रम आणि ब्रँडी. हे सर्व प्रकार प्रीमियम ॲडमिक्स सेगमेंटमध्ये समान किंमत श्रेणीत उपलब्ध असतील.

## सृजनरंग स्पर्धेत 'सिंहगड'चे यश



**पंढरपूर, दि. २७ फेब्रुवारी-**

येथील सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या चार विद्यार्थ्यांनी विद्यापीठस्तरीय नियतकालिक स्पर्धा-सृजनरंग मध्ये उल्लेखनीय यश संपादन केले आहे. ही स्पर्धा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्या वतीने दरवर्षी आयोजित केली जाते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कैलाश करांडे यांनी ही माहिती दिली.

इंग्रजी भाषा ललित गद्यात्मक लेखनासाठी वैष्णव कुलकर्णी याला प्रथम पारितोषिक तसेच भारतीय भाषा संस्कृत वैचारिक लेखनासाठी प्रगती कोरे हिला द्वितीय पारितोषिक, तसेच चित्रकला विभागात प्रियांका जाधव हिला द्वितीय पारितोषिक, व मराठी भाषा काव्यात्मक लेखनासाठी रुपाली बोडरे हिला तृतीय पारितोषिक मिळाले. पारितोषिक वितरण समारंभ विद्यापीठाच्या सभागृहात पार पडला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे कवी प्रशांत मोरे, कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक व प्र-कुलसचिव यांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले. यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन प्राचार्य डॉ. कैलाश करांडे, उपप्राचार्य डॉ. स्वानंद कुलकर्णी, प्रकाशन विभागाचे अधिष्ठाता डॉ. संपत देशमुख, सह-संपादक डॉ. दिपक गानमोटे यांनी केले.

## आयटकच्यावतीने बांधकाम कामगारांचा मेळावा

**बांधकाम कामगार फेडरेशन राज्य कौन्सिलची बैठक**

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २७ फेब्रुवारी-**

आयटक संलग्न महाराष्ट्र राज्य बांधकाम कामगार संघटना सोलापूर जिल्हा कौन्सिल यांच्यावतीने बांधकाम कामगारांचा मेळावा संपन्न झाला. मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी आयटकचे ज्येष्ठ नेते कॉ. तानाजी ठोंबरे होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून आयटकचे राज्य सरचिटणीस कॉ. शाम काळे, बांधकाम कामगार संघटना राज्याध्यक्ष कॉ. विजय बचाटे, कार्याध्यक्ष कॉ. विजय कांबळे, कॉ. भीमा पाटील, कॉ. प्रविण, सुरेखा शितोळे हे उपस्थित होते. मेळाव्यात सर्व राज्य कौन्सिल सदस्य, जिल्हा पदाधिकारी तसेच विविध तालुक्यातील बांधकाम कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते.



यावेळी आयटकचे राज्य सरचिटणीस कॉ. शाम काळे म्हणाले, शासनाच्या विविध योजना, कामगार नोंदणी, विमा योजना, शिक्षण सहाय्य, आरोग्य सुविधा आदी योजना या आयटकच्या नेतृत्वाखाली कम्युनिस्ट डाव्या चळवळीने मिळवून दिलेल्या आहेत. ज्यांना प्रत्यक्ष लाभ मिळाला पाहिजे तो लाभ मिळत नाही ही खेदाची बाब आहे. शासन वेगवेगळ्या योजना आणून बांधकाम कामगारांचे मूलभूत जगण्याचे प्रश्न बाजूला टाकत आहेत. बांधकाम क्षेत्रातील असंघटित कामगारांनी संघटित होऊन आपल्या हक्कांसाठी लढा द्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

बांधकाम कामगार संघटनेचे राज्याध्यक्ष विजय बचाटे यांनी यावेळी मनोगत व्यक्त केले. मेळाव्यात प्रामुख्याने बालाजी शितोळे, नानासाहेब ठाकरे, राजू ढेंबरे, अनिरुद्ध नखाते, भारत चव्हाण, ऋषिकेश शितोळे, सुयश शितोळे, अण्णासाहेब ठाकरे, दादासाहेब गंगाधर, अतुल ठाकरे, परमेश्वर नागटिळक, महादेव कसबे, कॉ. दशरथ भालके, बालाजी ठाकरे, अतुल ठाकरे, संतोष आखाडे, नाना माने, वाल्मिक आखाडे, रामचंद्र मस्के, परशुराम यादव, दत्तात्रेय लेडवे, संतोष पाटील, संतोष चव्हाण, मंगुराज नलावडे, नितीन गायकवाडे, शितल गायकवाड, शितल भंडारी, सोनाली गायकवाड, उज्वला चंदनशिवे, नंदिनी किनकर, मंजुळा गवळी, बाबा कांबळे, साईनाथ झांबरे उपस्थित होते.



### स्वातंत्र्यवर सावरकर पुण्यतिथीनिमित्त जामगाव येथे एकता मंचकडून अभिवादन

**वैराग, दि. २७ फेब्रुवारी-**

जामगाव (आ) येथील एकता महिला मंचच्या वतीने स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. येथील जय मल्हार सार्वजनिक वाचनालय येथे हा कार्यक्रम संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला.

यावेळी उपस्थित महिलांनी सावरकरांचे विचार आजही समाजाला आणि तरुण पिढीला दिशा देणारे आहेत, अशा भावना यावेळी व्यक्त करण्यात आल्या. यावेळी रेश्मा मुकटे, कल्पना वाघमोडे, सुनीता नवले, शामबाला सुतार, सुचिता कुटे, रुक्मिणी पायगन, सुकमल खंडागळे, सोनल जाधव, बसेराबी रंगरेज उपस्थित होते.

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## साहित्यिक इंद्रजीत पाटील यांना राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान

**वैराग, दि. २७ फेब्रुवारी-**

फलटण येथील ॲग्रोन्यूज परिवार चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलनात वैरागचे हरहुन्नरी कवी प्रा. इंद्रजीत पाटील यांना 'धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज राज्यस्तरीय साहित्य पुरस्कार-२०२६' देऊन गौरवण्यात आले. त्यांच्या 'चिबाड' या बहुचर्चित कवितासंग्रहास हा बहुमान मिळाला आहे.



फलटणच्या नवलबाई मंगल कार्यालयात झालेल्या संमेलनात स्वागताध्यक्ष श्रीमंत अनिकेतराजे निंबाळकर, संमेलनाध्यक्ष प्रा. विजय काकडे, ज्येष्ठ साहित्यिक जगन्नाथ शिंदे, अशोक मेहता यांच्या प्रमुख उपस्थितीत या पुरस्काराचे वितरण झाले. सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, शाल, श्रीफळ आणि मानाचा फेटा असे पुरस्काराचे स्वरूप आहे. कार्याध्यक्ष प्रा. महादेव गुंजवटे, संयोजक प्रकाश सस्ते, निमंत्रक ज्ञानेश्वर देशमुख यांनी संयोजन केले. प्रा.पाटील यांच्या 'चिबाड' या कवितासंग्रहाने साहित्य क्षेत्रात अल्पावधीतच आपली मोहोर उमटवली आहे. या यशाबद्दल माधवराव कुतवळ, चंद्रकांत पाटील, रावसाहेब पाटील, संजय भड, अमोल देशमुख, जीवराज गरड यांसह विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी त्यांचे विशेष अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

## महत्त्वाचे

### कुर्डुवाडी नगरपरिषदेतील अभियंत्याला धमकी; विकासकामाच्या बिलांमुळे वाद?

**कुर्डूवाडी, दि.२७ फेब्रुवारी -**

विकास कामाची पाहाणी करण्यासाठी निघालेल्या कुर्डुवाडी नगरपरिषदेतील नगर अभियंत्याची गाडी अडवून त्याला शिवीगाळ व जिवे मारण्याची धमकी देऊन सरकारी कामात अडथळा निर्माण केल्याप्रकरणी इर्षाद कुरेशी याच्यावर कुर्डुवाडी पोलिसांत गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत नगर अभियंता अक्षय खटके यांनी फिर्याद दिली आहे. याबाबत पोलिसांनी दिलेली अधिक माहिती अशी की फिर्यादी नगर अभियंता हे दि.२५ रोजी दु.३ वा. करमाळा रोड येथील विकासकाम पाहाणीसाठी मोटारसायकलवरुन नगरपरिषदेच्या पार्किंगम धून जात असताना इर्शाद कुरेशी याने अभियंत्याला अडवून तुम्हाला किती पैसे पाहिजेत, पैशासाठी माझी विकास कामाची बिले अडवू नका असे म्हणत शिवीगाळ करत नगरपरिषद काय तुझ्या बापाची आहे का? तु इथे काम कस करतोस ते बघतो असे म्हणून अंगावर येऊन जिवे मारण्याची धमकी दिली व सरकारी कामात अडथळा निर्माण केला.



### कर्मवीर सार्वजनिक ग्रंथालयात मराठी राजभाषा गौरव दिन साजरा

**बार्शी, दि.२७ फेब्रुवारी,**

येथील कर्मवीर सार्वजनिक ग्रंथालयात ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कविश्रेष्ठ कुसुमाग्रज तथा पद्मभूषण वि.वा.उर्फ तात्यासाहेब शिरवाडकर यांच्या जयंती दिनाचे औचित्याने मराठी राजभाषा गौरव दिन म्हणून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. प्रमुख मान्यवरांचे हस्ते प्रतिमेचे पुष्पहार अर्पण करुन पूजन करण्यात आले. यावेळी सेवानिवृत्त फूड निरीक्षक भागवत बोबडे, विजयसिंह देशमुख, बशीर पठाण आदी उपस्थित होते. मराठी राजभाषा गौरव दिनाच्या अनुषंगाने मराठी भाषेचे महत्व प्रमुख मान्यवरांनी आपल्या मनोगतातून विषद केले. यावेळी अमित कदम, प्रेम अग्रवाल, प्रेम लोंढे यांचेसह वाचक व सभासद उपस्थित होते, कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन ग्रंथपाल विनोद गायकवाड यांनी केले.



### वेळापूर इंग्लिश स्कूलमध्ये मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा

**वेळापूर, दि.२७ फेब्रुवारी,**

वेळापूर येथील इंग्लिश स्कूल, वेळापूर प्रशालेत २७ फेब्रुवारी हा दिवस मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा करण्यात आला. प्रारंभी यावेळी शब्दसम्राट विष्णू वामन शिरवाडकर व दलितमित्र कदम गुरुजी यांच्या प्रतिमांचे पुजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रशालेचे उपमुख्याध्यापक पठाण शिवशरण हे होते. यावेळी व्यासपीठावर प्रशालेचे मुख्याध्यापक रमेश पवार, पर्यवेक्षक बापूसाहेब सावळे व सर्व मराठी विषय शिक्षक उपस्थित होते. विद्यार्थी व अध्यक्षीय मनोगतांमध्ये मराठी भाषेबद्दल विचार व्यक्त केले . कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सतिश कदम व सौ जयश्री देवकते यांनी केले तर आभार नागणे सर यांनी मानले.



### प्राईड ऑफ महाराष्ट्र पुरस्काराने चित्रकार रत्नदिप बारबोले सन्मानित

**माढा, दि.२७ फेब्रुवारी,**

भारत आणि अमेरिका कार्यक्षेत्र असलेल्या इन्साईट सक्सेस या संस्थेचा मानाचा प्राईड ऑफ महाराष्ट्र हा पुरस्कार दारफळ सीना येथील प्रसिद्ध चित्रकार रत्नदिप बारबोले यांना काल पुणे येथील रेडिसन ब्ल्यू पंचतारांकित हॉटेलमध्ये, मराठी आणि हिंदी चित्रपट सृष्टीतील प्रसिद्ध अभिनेत्री प्रार्थना बेहेरे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. दारफळ सीना येथील प्रसिद्ध चित्रकार रत्नदिप बारबोले यांना मागील महिन्यात प्राईड ऑफ महाराष्ट्र २०२६ या पुरस्कार जाहीर झाला होता. आज तो मानाचा पुरस्कार रत्नदिप बारबोले यांना प्रदान करण्यात आला. भारत आणि अमेरिका मध्ये कार्यरत असलेल्या इन्साईट सक्सेस या संस्थेचा हा पुरस्कार असून पुणे येथील रेडिसन ब्ल्यू या हॉटेल मध्ये दिमाखदार सोहळ्यात या पुरस्काराचे वितरण झाले. आजपर्यंत देशविदेशात चित्रकार बारबोले यांचे चित्रप्रदर्शन झाले आहेत. अनेक आंतरराष्ट्रीय, राष्ट्रिय तसेच राज्यस्तरीय पुरस्कार बारबोले यांना मिळाले आहेत. त्यांच्या कलाक्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल बारबोले यांना हा पुरस्कार देऊन सन्मानीत करण्यात आले. रोख रक्कम, सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे. विविध क्षेत्रातील मान्यवरांचा याठिकाणी पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी इन्साईट सक्सेस चे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

## कॉरडॉरसाठीच्या दहा कोटीच्या तरतूदीला स्थगिती
# पंढरपूर नगरपरिषदेचा शिलकी अर्थसंकल्प सादर

**सर्वसाधारण सभेत २७३ कोटी ४७ लाखांच्या मांडणीला मंजूरी**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२७ फेब्रुवारी -**

पंढरपूर नगरपरिषदेच्या शुक्रवारी झालेल्या सर्वसाधारण सभेत एकीकडे प्रशासकीय स्तरावर पालिकेच्या अर्थसंकल्पात पंढरपूर कॉरिडोरसाठी दहा कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली तर दूसरीकडे याच सर्वसाधारण सभेत पालिकेतील सदस्यांकडून पंढरपूर कॉरिडोरसाठी करण्यात आलेल्या दहा कोटींच्या तरतूदीला स्थगिती देण्यात आली. पंढरपूर कॉरिडोरचा विषय स्थगित ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. दरम्यान पालिकेचे मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी २७३ कोटी ४७ लाख रुपयाचा अर्थसंकल्प मांडला. सर्वसाधारण सभेत यास नगरसेवकांनी मंजुरी दिली.

लोकनियुक्त नगराध्यक्ष डॉ.प्रणिता भालके यांच्या अध्यक्षतेखाली सर्वसाधारण सभा घेण्यात आली. या सभेमध्ये मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी सन २०२६-२७ चा नगरपरिषदेचा अर्थसंकल्प सादर केला. यामध्ये २७३ कोटी ४७ लाख



५६ हजार रुपये जमा तर २७३ कोटी ४४ लाख खर्च तर ३ लाख ५६ हजार शिलकी अंदाजपत्रक सादर केले. सर्वसाधारण सभेमध्ये मंजुरी देण्यात आली.

**नगराध्यक्षांनी घेतलेला तघुलकी निर्णय अखेर मागे**

पंढरपूर नगरपरिषदेच्या अर्थसंकल्पीय सभेस पंढरपुरातील पत्रकार उपस्थित राहिले होते. तेव्हा नगराध्यक्ष डॉ.प्रणिता भालके यांनी मुख्याधिकारी महेश रोकडे यांच्यामार्फत पत्रकारांनी सभागृहात थांबू नये, असा तघलुकी फतवा जारी केला. नगराध्यक्षांच्या या तघलुकी फतव्यामुळे उपस्थित पत्रकारांकडून संताप व्यक्त करण्यात आला. दरम्यान ही माहिती उपनगराध्यक्ष महादेव धोत्रे व नगरसेवक लक्ष्मण पापरकर यांना कळताच या दोघांनीही नगराध्यक्षांच्या भूमिकेचा विरोध केला. गेल्या २५ वर्षापासून पत्रकार सभागृहांमध्ये बसून वार्तांकन करत आहेत. मात्र ही नवीन पद्धत आम्ही सुरू करू देणार नाही, अशी भूमिका धोत्रे तसेच पापरकर यांनी घेतली. यावरून सत्ताधारी व विरोधी गटामध्ये खडाजंगी झाली. अखेर नगराध्यक्षांनी घेतलेला तघुलकी फतवा मागे घेत पत्रकारांना सभागृहात बसण्यास परवानगी द्यावी लागली.

**विविध कामांसाठीच्या तरतूदी**

या अर्थसंकल्पामध्ये स्मशानभूमीतील गॅस दाहिनी सुविधेमधून एक लाख रुपये जमा होणार आहेत.उद्यान फी मधून पाच लाख रुपये, जलतरण तलाव मधून पाच लाख रुपये, भंगार विक्री मधून ३० लाख रुपये जमा होणार आहेत.

तर जलतरण तलाव दूरुस्तीसाठी १० लाख रुपये खर्च, गटारी, कचराकुंडी दुरुस्ती १५ लाख रुपये खर्च, यमाई तलाव देखभाल १० लाख रुपये खर्च, अग्निशामक दल १ लाख रुपये खर्च, भूसंपादन ७५ लाख रुपये खर्च, इमारत देखभाल दूरुस्ती ७५ लाख रुपये खर्च, अतिथीग्रह दुरुस्ती १० लाख रुपये खर्च, स्मशानभूमी सुधारणा २५ लाख रुपये खर्च, गटारी, नाले बांधणे ५० लाख रुपये खर्च अशा प्रकारे विविध कामांसाठी आर्थिक तरतूद करण्यात आली आहे.

**✔ कॉरिडोरबाबत खुलासा करण्याची मागणी**

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा ड्रीमप्रोजक्ट असलेल्या पंढरपूर कॉरिडोर प्रकल्प मार्गी लावण्याची जबाबदारी निश्चितपणे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यावर आहे. नुकतीच पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली या प्रकल्पा संदर्भातील बैठक मुंबई येथे पार पडली. त्यामुळे हा प्रकल्प होणार हे निश्चित झालेले आहे. या कॉरिडोर प्रकल्पासाठी प्रशासकीय स्तरावर पंढरपूर नगरपरिषदेच्या अर्थसंकल्पामध्ये १० कोटी रुपयाची तरतूद करण्यात आली आहे. याचा खुलासा करावा, अशी मागणी अपक्ष नगरसेवक ओंकार जोशी तसेच नगरसेवक शिंदेनाईक यांनी केली.

**✔ झोपडपट्टी व अतिक्रमणावरून खडाजंगी**

पंढरपूर शहरामध्ये झोपडपट्टी वाढत आहे. तसेच अनेक रस्त्यावर अतिक्रमण झाले आहे. यामुळे पंढरपुरातील नागरिक तसेच भाविकांना त्रास सहन करावा लागत आहे. अतिक्रमण व झोपडपट्टीवरून सत्ताधारी व विरोधकांमध्ये खडाजंगी उडाली.

## पिलीव येथे मोटारसायकलच्या धडकेत दोघांचा मृत्यू

### समोरासमोर झाली जोरदार टक्कर; दोघे गंभीर जखमी

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि.२७ फेब्रुवारी-**

पिलीव (ता. माळशिरस) येथील बागवान टेकाजवळ दि.२६ फेब्रुवारी रोजी रात्री ८.३० च्या सुमारास पिलीवहून राजवर्धन बापु शिरतोडे (वय १८) हे आपल्या स्प्लेंडर गाडीवरून (एम.एच ११ सिई ५८२८) हे आपल्या खडकी (ता.माण जि सातारा) गावाकडे जात असताना पिलीव नजीक बागवान टेकाजवळ सुळेवाडी गावाकडून एच.एफ. डिलक्स (एम. एच.४५ एजी ६७९०) या गाडीवरून स्वप्नील (समाधान) शिंगु सुळे ,साईराज सत्यवान सुळे व गणेश रामचंद्र माने (तिघांचेही वय-१८ वर्ष) हे स्वप्नीलचा २७ फेब्रुवारी रोजी वाढदिवस असल्यामुळे कपडे घेण्यासाठी पिलीवकडे येत असताना चार चाकी गाडीला ओव्हरटेक करुन पुढे येण्याच्या नादात या दोन मोटारसायकलची समोरासमोर जोरावर धडक झाली.

यामध्ये राजवर्धन शिरतोडे याचे चार ठिकाणी फ्रॅक्चर तसेच जिभ तुटुन बाहेर आली. तर स्वप्नील सुळेला जोरदार मार बसुन तो बेशुद्ध झाला. राजवर्धन शिरतोडे यास अकलूज येथे दवाखान्यात नेत असतानाच वेळापूर जवळ त्याचा मृत्यू झाला. स्वप्नील सुळे याचेवर अकलूज येथील डॉ. इनामदार यांच्या आश्विनी हॉस्पीटलमध्ये उपचार सुरु होते. रात्री १.३० वाजण्याच्या सुमारास त्याचा मृत्यु झाला. यामध्ये साईराज सुळे याचा पाय मोडला आहे तर गणेश माने हाही या अपघातात गंभीर जखमी झाला आहे. त्या दोघांवर ही डॉ. इनामदार यांच्या



मयत स्वप्नील सुळे | मयत राजवर्धन शिरतोडे | जखमी गणेश माने | जखमी साईराज सुळे

हॉस्पीटल मध्ये उपचार सुरु आहेत. स्वप्नील सुळे, साईराज सुळे व गणेश माने हे तिघेजण एकाच गावातील ते म्हसवड येथे बारावीत शिकत आहेत. सध्या बारावीची परीक्षा अंतीम टप्प्यात आहे. पुढे ते एम.एच.सिईटीची परीक्षा देऊन पुढे शिक्षण घेण्यासाठी तयारी करीत असताना आपला मित्र मयत स्वप्नील याचा २७ फेब्रुवारी रोजी वाढदिवसानिमित्त आनंदोत्सव साजरा करण्याच्या तयारीत असताना त्यांच्यावर काळाने घाला घातला. वाढदिवस साजरा करण्याऐवजी अंत्यसंस्कार करण्याची वाईट वेळ स्वप्नीलच्या कुटुंबावर व मित्र परिवारावर आली. अकलूज येथे शवविच्छेदन करून त्याच्यावर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

## परतावा द्या; नाहीतर रेशन बंद

### ग्रामीण महासंघाची मंत्रालयात धडक

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.२७ फेब्रुवारी-**

अखिल महाराष्ट्र राज्य स्वस्त धान्य दुकानदार व केरोसीन परवानाधारक महासंघ सोलापूर ग्रामीण जिल्हा संघटनेच्या वतीने अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या मंत्रालयातील अधिकाऱ्यांची भेट घेऊन प्रलंबित परताव्याबाबत निवेदन सादर करण्यात आले. परतावा तात्काळ न मिळाल्यास सोलापूर ग्रामीण जिल्ह्यातील धान्य वाटप बंद करण्याचा इशारा संघटनेने दिला.



संघटनेच्या निवेदनानुसार, सोलापूर ग्रामीण जिल्ह्यातील रेशन दुकानदारांनी नोव्हेंबर २०२२ व डिसेंबर २०२२ मध्ये चलनाद्वारे रोख भरणा केला होता. मात्र १ जानेवारी २०२३ पासून केंद्र शासनाकडून मोफत धान्य वाटपाची घोषणा झाल्यानंतर दुकानदारांची भरलेली हक्काची रक्कम गेल्या तीन वर्षांपासून प्रलंबित आहे. या रकमेच्या परताव्यासाठी जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालयापासून मंत्रालय स्तरापर्यंत वारंवार पाठपुरावा करण्यात येत असूनही अद्याप परतावा मिळालेला नाही, असा आरोप संघटनेने केला आहे. या



संदर्भात अन्न व नागरी ग्राहक संरक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव अनिल डिग्गीकर यांची मंत्रालयात भेट घेऊन त्यांना निवेदन देण्यात आले. तसेच विभागाचे सहसचिव संतोष गायकवाड यांच्याशीही चर्चा करण्यात आली.

दरम्यान,ई-पॉस मशीन संदर्भातील अडचणीही निवेदनात मांडण्यात आल्या. मागील चार महिन्यांपासून बसविण्यात आलेल्या नवीन 'एल-वन' स्कॅनरमुळे अनेक ग्राहकांचे बोटांचे ठसे उमटत नसल्याची तक्रार करण्यात आली आहे. परिणामी, ओटीपीच्या माध्यमातून धान्य वितरण करावे लागत आहे. सर्व्हर डाऊन असल्यास ग्राहकांना तासन्तास प्रतीक्षा करावी लागते. वयोवृद्ध ग्राहकांकडे मोबाईल नसल्याने त्यांना धान्य देताना मोठ्या अडचणी येत असल्याचेही संघटनेने नमूद केले आहे. या तांत्रिक अडचणींवर तत्काळ तोडगा काढण्याची मागणी करण्यात आली.ग्रामीण महासंघ जिल्हा संघटनेचे जिल्हाध्यक्ष विजय मंडलिक यांच्या नेतृत्वाखाली अरुण जाधव व अक्षय मिले उपस्थित होते.

हक्काचा परतावा मिळेपर्यंत लढा सुरू ठेवणार असून गरज पडल्यास धान्य वितरण बंद करण्याचा इशारा संघटनेने दिला आहे.

## बार्शी तालुक्यात तीन महिने असणार महाराजस्व अभियान

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.२७ फेब्रुवारी-**

बार्शी तालुक्यात ग्रामीण भागातील व शहरातील सर्व नागरिकांकरीता, महसूल विभागामार्फत ग्रामीण व नागरी स्तरावरील सर्वसामान्य जनता, शेतकरी, विद्यार्थी, महिला तसेच विविध घटकांच्या महसूल विषयक दैनंदिन प्रश्नांचे तात्काळ व प्रभावी निराकरण करण्याच्या उद्देशाने छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानाचा टप्पा क्रमांक १ अंतर्गत तालुक्यातील प्रत्येक महसूल मंडळ स्तरावर तसेच नगरपरिषद, नगरपंचायत स्तरावर एक दिवसीय समाधान शिबिरांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती तहसीलदार शेख यांनी दिली.

**मार्च, एप्रिल, मे महिन्यात शिबिरांचे आयोजन**

या उपक्रमाचा मुख्य उद्देश महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, पारदर्शक, कार्यक्षम व गतिमान करणे हा आहे.

| शिबिरांचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे | |
|---|---|
| ७ मार्च | पांगरी, आगळगांव मंडळ |
| १४ मार्च | नारी, पानगाव व सुर्डी मंडळ |
| १० एप्रिल | गौडगांव व उपळे दुमाला |
| १७ एप्रिल | खांडवी व सौंदरे मंडळ. |
| ८ मे | बार्शी नगरपालिका. |
| १५ मे | वैराग नगरपंचायत. |

नागरिकांच्या तक्रारी, प्रलंबित प्रकरणे व विविध दाखल्यांबाबतच्या अडचणी थेट शिबिरातच निकाली काढण्यावर भर देण्यात येणार आहे. प्रत्येक मंडळासाठी संबंधित मंडळ अधिकारी यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे. महसूल विभागाच्या या महत्त्वपूर्ण उपक्रमाचा लाभ तालुक्यातील जास्तीत जास्त नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन तहसीलदार एफ.आर. शेख यांनी केले आहे. नागरिकांनी संबंधित तारखेला आपल्या मंडळ, नगरपरिषद, नगरपंचायतीच्या ठिकाणी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहून आपली प्रलंबित कामे पूर्ण करुन घ्यावीत, असेही तहसीलदार यांनी आवाहन केले आहे. महसूल प्रशासन आपल्या सेवेसाठी कटिबद्ध असून, जनतेच्या प्रश्नांचे त्वरित व पारदर्शक निराकरण करण्यासाठी हे अभियान प्रभावीपणे राबविण्यात येणार असल्याचे तहसीलदार एफ आर शेख यांनी सांगितले आहे.

**शिबिरात सेवा उपलब्ध**

१) प्रलंबित फेरफार प्रकरणे निकाली काढणे. २) अभिलेख दुरुस्ती डेस्कद्वारे कागदपत्रे दुरुस्ती. ३) लोकसेवा हक्क कायद्यांतर्गत तात्काळ सेवा-उत्पन्न प्रमाणपत्र, रहिवासी प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र, नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र वितरण. ४) संपादन व अकृषक परवानगी प्रकरणांतील कमी-जास्त पत्रके तयार करुन गाव दप्तर अद्ययावत करणे. ५) नागरी सुविधा पुरविणे (एक खिडकी प्रणालीद्वारे सेवा).६) ई-मोजणी सुविधा. ७) ग्रीस्टॅक संबंधित सेवा. ८) पीएम किसान योजनेविषयी मार्गदर्शन व प्रलंबित बाबींचे निराकरण. ९) तक्रार निवारण कक्ष. १०) इतर शासकीय विभागामार्फत विविध योजनांचा लाभ वितरण.

## विद्युत मोटारीसह केबल चोरीमुळे शेतकरी हवालदिल

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि. २७ फेब्रुवारी-**

माळखंबी तालुका माळशिरस येथे सातत्याने शेतकऱ्यांच्या विहिरीवरील मोटारी व केबलच्या चोऱ्या होत असल्याने शेतकरी वर्ग हवालदिल झाला असून पोलिस प्रशासनाने या गंभीर प्रकरणात लक्ष घालून चोरट्यांचा बंदोबस्त करावा अशी मागणी होत आहे.

रात्रीच्या सुमारास अंधार व निर्जन परिस्थितीचा फायदा घेत माळखांबी येथिल शेतकऱ्याच्या विहिर, बोअर, सोलार पॅनल वरिल तांब्याच्या धातूच्या केबलच्या चोरीच्या सातत्याने घटना घडत असून शेतकऱ्यांचे पिकां बरोबर आर्थिक नुकसान होत आहे . या बाबत पोलिस स्टेशनला तकारी दाखल असून पोलिसांनी पंचनामेही केले आहेत. परंतू चोरट्यांचा बंदोबस्त होत नाही तो पर्यंत चोऱ्यांचे प्रमाण कमी होणार नाही. एक तर शेतकरी वर्ग नैसर्गिक आपत्ती वर मात करत रानातील पिके जपत आहे. सद्य परिस्थितीत उन्हाची तीव्रता वाढत असताना सातत्याने विद्युत मोटारी व केबलची चोरी होत असल्याने जीवापाड जपत असलेल्य पिकांचे उघडया डोळ्यांनी होत असलेले नुकसान शेतकऱ्यांना पाहावे लागत आहे. यात शेखर भास्कर गमे हे मोटार रिवायडिंगचा व्यवसाय करतात



यांच्या वस्तीवरही तीन वेळा चोरीचा प्रकार झाला यामध्ये शेतीतील तांब्याची केबल, गॅस, शेगडी लायटर, शेतातील शेतमाल मोजायचा इलेट्रिक वजन काटा १२५ किलो ताब्याची तार चोरट्यांनी चोरली त्यामुळे रानातील वस्ती असल्याने शेखर भास्कर गमे आणि त्याचे कुटुबिय रोज रात्र भर जागुन काढत आहेत. पोलिस प्रशासन यावर तपास चालू असल्याचे कारण सांगून वेळ मारून नेत आहे. तसेच तानाजी गमे यांच्या डि पी मधील सुमारे १० हजार रु.चे ऑईल चोरांनी लांबविले आहे. तर आत्तापर्यंत कमीत कमी १०० शेतकऱ्यांच्या शेतातील ताब्याच्या केबल चोरीला गेल्या आहेत. शेतकरी व नागरिक कमालीचे त्रस्त असून पोलिस प्रशासनासमोर चोरट्यांना पकडण्याचे आव्हान उभे आहे.